सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, २१ डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६७ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महाराष्ट्रात रस्ते बांधकामातील दिरंगाईमुळे २०३ कोटींचे नुकसान

### कॅगच्या अहवालात रस्ते कंत्राटदारांना फायदा मिळाल्याचा ठपका!

नवी दिल्ली : संसदेच्या हिवाळी अधिवेशनादरम्यान लोकसभेत कॅगचा अहवाल सादर करण्यात आला. या अहवालामध्ये महाराष्ट्रातील रस्ते बांधकाम व या कामातील दिरंगाई याच्या परिणामस्वरूप निर्माण झालेल्या परिस्थितीत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे तब्बल २०३ कोटींचे नुकसान झाल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे. प्रामुख्याने नांदेड व ठाणे जिल्ह्यातील रस्ते बांधकाम प्रकल्पांसंदर्भात या अहवालात माहिती देण्यात आली असून कंत्राटदारांकडून अपेक्षेपेक्षा अत्यल्प प्रमाणात नुकसान भरपाई वसूल झाल्यामुळे हे नुकसान झाल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

केंद्रीय दक्षता आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन न करता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने उल्लंघन केल्याचा ठपका कॅगच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. एनएचएआय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अखत्यारीत येते, आणि कॅगचा संबंधित अहवाल ४ नोव्हेंबर २०२४ रोजी मंत्रालयाकडे पाठविण्यात आला आहे.

अहवालानुसार, मार्च २०१८ मध्ये एनएचएआयने चार राष्ट्रीय महामार्गांच्या रुंदीकरणाचे काम 'बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा' या तत्त्वावर कंत्राटदारांना दिले होते. या प्रकल्पाचा एकूण अंदाजित खर्च ४,१०४.७० कोटी रुपये होता. ज्यामध्ये औसा-चाकूर, चाकूर-लोहा, लोहा-वारंगा आणि वडापे-ठाणे या राष्ट्रीय महामार्गांचा समावेश होता. छक-ख च्या नांदेड आणि ठाणे येथील प्रकल्प कार्यान्वयन युनिट्सने याचे निरीक्षण केले.

संबंधित कंत्राटदार कंपन्यांनी ४ जुलै २०१८ रोजी एनएचएआयसोबत करार केला, पण पहिल्या टप्प्याच्या कामात अपेक्षेप्रमाणे २० टक्के काम पूर्ण होण्याऐवजी शून्य टक्केच झाले. परिणामी, जुलै २०२० मध्ये एनएचएआयच्या प्रकल्प संचालकांनी कंत्राट रद्द करण्याची शिफारस केली. त्याच वेळी, कंत्राटदार कंपन्यांनी प्रकल्पाच्या मालकीत बदल करण्याची विनंती केली, ज्याला एनएचएआयने मंजुरी दिली.

# बीड हत्याकांडातील आरोपीवर मोक्का तर जिल्हा पोलीसप्रमुखाची बदली

### मुख्यमंत्र्यांची विधानसभेत घोषणा; बीड प्रकरणात एसआयटी दुप्पट, परभणी घटनेची न्यायालयीन चौकशी

### दोन्ही मृतांच्या कुटुंबीयांना १० लाख रुपयांची मदत

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, २० डिसेंबर :- बीड, परभणी जिल्ह्यात झालेल्या हिंसाचार आणि पोलिसांच्या अत्याचाराच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली असून, या मुद्द्यावरून नागपुरात सुरू झालेल्या हिवाळी अधिवेशनात गेल्या चार दिवसांपासून सत्ताधारी व विरोधी पक्षाने हा विषय लावून धरला असताना शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्याबाबत सरकारची भूमिका स्पष्ट केली. बीड जिल्ह्यातील खून प्रकरणाचा न्यायालयीन व एसआयटीकडून दुहेरी तपास, तर परभणी प्रकरणात बीडचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा न्यायालयीन तपास करण्यात येणार आहे. त्यांच्या कुटुंबियांसह परभणीतील घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना दहा लाखांची मदत देण्यात येणार आहे.

बीड प्रकरणाच्या न्यायालयीन व एसआयटी तपासाबरोबरच जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची तत्काळ बदली करण्यात येणार आहे.

परभणीचे पोलिस निरीक्षक अशोक घोरबांड यांना निलंबित करण्यात येणार असून त्यांनी पोलिस बळाचा अतिरेक केला का, याचा तपास केला जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली.

बीड आणि परभणी येथील घटनेबाबत विधानसभेत झालेल्या संक्षिप्त चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, परभणी जिल्ह्यातील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. भारतीय राज्यघटनेचा अपमान हा सर्व भारतीयांचा अपमान आहे. त्यामुळे हा अपमान सहन केला जाणार नाही. हे कृत्य परभणीत एका मनोरुग्णाने केले. तसेच तो मनोरुग्ण असल्याचे वैद्यकीय अहवालात स्पष्ट झाले आहे. अशा स्थितीत सर्वच राजकीय पक्ष तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न करतील, अशी अपेक्षा आहे. या प्रकरणात कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले नाही. मात्र पोलिसांनी अवाजवी बळाचा वापर केला का, याचा तपास केला जाईल. पोलीस अधिकारी अशोक घोरबांड यांना निलंबित करून हा तपास केला जाणार आहे. परभणीत समन्यायी हिंदू समाज मोर्चा हे सर्वपक्षीय आंदोलन होते. या मोर्चात बांगलादेशातील हिंदूंबाबत मागण्या करण्यात आल्या. त्यामुळे ही हिंदू विरुद्ध दलित दंगल नाही. परभणमध्ये झालेल्या तोडफोडीत दुकाने, वाहने, शासकीय कार्यालयांचे नुकसान झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

बीडमधील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी मोहीम राबविण्यात येणार असून तपासात जो दोषी आढळेल, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. आवडा ग्रीन एनर्जी कंपनीने बीडमध्ये गुंतवणूक केली आहे. एकतर आम्हाला या कंपनीचे काम द्या किंवा खंडणी द्या, अशी मानसिकता काही लोकांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे बीड प्रकरणाचा सूत्रधार जो कोणी असेल त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या प्रकरणात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असलेल्यांवरही मोक्का अंतर्गत कारवाई केली जाईल. बीड जिल्हा पोलिसांनीही योग्य ती कारवाई करावी. गुन्हा नोंदवताना वस्तुस्थिती तपासली पाहिजे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

## जयपूर टँकर दुर्घटनेतील मृतांचा आकडा ११वर, १४ जण अद्याप बेपत्ता



जयपूर : राजस्थानच्या जयपूरमध्ये आज, शुक्रवारी पहाटे झालेल्या टँकर स्फोट दुर्घटनेतील मृतांची संख्या वाढलीये. हा मृतांचा आकडा ११ वर पोहोचला आहे. तर या अपघातात ३५ जण गंभीर जखमी झालेत. या दुर्घटनेत १४ जण अद्याप बेपत्ता आहेत.

जयपूरच्या भांकरोटा येथे हा भीषण अपघात घडला. यामुळे हा संपूर्ण परिसर हादरून गेला.दिल्ली पब्लिक स्कूलजवळ एलपीजी टँकर आणि ट्रकची धडक होऊन भीषण स्फोट झाला. या अपघातात आतापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाला असून ३५ जण होरपळले आहेत. अपघातानंतर बसमधील १४ प्रवासी आणि चालक-कंडक्टर बेपत्ता आहेत. आगीत वाहनांचे मोठे नुकसान झाल्याची माहिती जयपूर पोलिसांनी दिली आहे.

या आगीत ३७ वाहने जळून खाक झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. यामध्ये बस, ट्रेलर, ट्रक, कार आणि मोटारसायकल यांचा समावेश असून वाहनांची माहिती मिळण्यासाठी पोलिसांनी ९१६६३४७५५१, ८७६४६८८४३१, ७३००३६३६३६ हे हेल्पलाइन क्रमांक जारी केले आहेत. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेतील प्रत्येक मृताच्या नातेवाईकांना पंतप्रधान राष्ट्रीय मदत निधीमधून २ लाख रुपयांची आणि जखमींना ५० हजार रुपयांची मदत देण्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. यासंदर्भात पंतप्रधान कार्यालयाने एक्सवर पोस्ट शेअर करत माहिती दिली. एलपीजी टँकर अजमेरहून जयपूरला येत होता.

## अहमदनगर बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी राजू कातोरे विक्रमी मतांनी विजयी

### उपाध्यक्षपदी वैभव आघाव व सचिवपदी संदीप बुरके विजयी

नगर - जिल्ह्य नायायालायातील अहमदनगर बार असोसिएशनच्या २०२५ वर्षासाठी शुक्रवारी झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी राजू कातोरे विक्रमी मतांनी विजयी झाले आहेत. तसेच उपाध्यक्षपदी वैभव आघाव व सचिवपदी संदीप बुरके हे निवडून आले आहेत. शुक्रवारी सकाळी सुरु झालेल्या मतदानाची सायंकाळी उशीराने मतमोजणी संपल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी अॅड.अरुण भालसिंग यांनी निवडणुकीचा अंतिम निकाल जाहीर केला. या निवडणुकीत १६९४ पैकी ११४७ मतदान झाले. या निवडणुकीत महिला सहसचिव, खजिनदार, महिला व पुरुष कार्यकारीणी



सदस्य आदी पदांची निवडणूक याआधीच बिनविरोध झाली आहे.

अहमदनगर बार असोसिएशनच्या निवडणुकीच्या अध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत उमेदवार राजू कातोरे यांना ८९९ मते मिळाली तर विरोधी उमेदवार संदीप काळे यांना अवघे २२४ मते मिळाल्याने तब्बल ६७५ मतांनी राजू कातोरे यांनी संदीप काळेंवर विजय मिळवला. उपाध्यक्षपदाकरता झालेल्या चुरशीच्या निवडणुकीत वैभव आघाव यांना ५८२ तर विरोधातील संदीप पाखरे यांना ५५९ मतेमिळाली. वैभव आघाव यांनी केवळ २४ मतांनी संदीप पाखरेंवर मात केली. सचिव पदाकरता झालेल्या निवडणुकीत संदीप बुरके यांना ५७९ तर विरोधातील विनोद शेटे यांना ५५५ मते मिळाली संदीप बुरके यांनी विनोद शेटे यांचा २४ मतांनी पराभव केला. अहमदनगर बार असोसिएशनचे निवडणूक निर्णय अधिकारी अरुण भालसिंग यांनी जाहीर केलेली अंतिम कार्यकारणी मंडळ पुढीलप्रमाणे, अध्यक्ष राजू कातोरे, उपाध्यक्ष वैभव आघाव, सचिव संदीप बुरके, सहसचिव मनिषा केळगंद्रे, खजिनदार अनुराधा येवले, महिला सहसचिव जया पाटोळे, कार्यकारणी सदस्य अभिजीत देशमुख, निखिल ढोले, दीपक आडोळे, विजय केदार, रामेश्वर कराळे, शिवाजी शिंदे व ज्योती हिमणे.

निवडणुकीचा निकाल जाहीर होताच वकिलांसह सर्व विजयी व बिनविरोध निवडून आलेल्या वकिलांनी गुलालाची उधळण करीत विजयोत्सव साजरा.

## अमेरिकेकडून पाकिस्तानच्या ४ क्षेपणास्त्र कंपनीवर बंदी

वॉशिंग्टन : पाकिस्तान नवीन बॅलेस्टिक क्षेपणास्त्र बनवत आहे. या क्षेपणास्त्राबाबत अमेरिकेने पाकिस्तानला जोरदार झटका देत चार कंपन्यांवर बंदी घातली आहे.लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांची निर्मिती करण्याच्या पाकिस्तानच्या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने गुरुवारी पाकिस्तानवर नवीन निर्बंध लादले आहे. अण्वस्त्रधारी पाकिस्तानने लांब पल्ल्याचे क्षेपणास्त्र विकसित केल्यास ते जगासाठी धोकादायक ठरू शकते, असे अमेरिकेचे मत आहे. त्यामुळे पाकिस्तानला आता मोठा धक्का बसला आहे.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यू मिलर म्हणाले कि, 'हे निर्बंध पाकिस्तानच्या राष्ट्रीय विकास संकुल आणि तीन कंपन्यांना लागू होतील. या निर्बंधांचा उद्देश मोठ्या प्रमाणात होणारी जीवितहानी रोखणे हा आहे. निर्बंध लागू झाल्यानंतर अमेरिकेतील बंदी घातलेल्या कॉम्प्लेक्स आणि कंपन्यांची मालमत्ता जप्त केली जाईल आणि त्यांना अमेरिकेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यवसाय करता येणार नाही.याप्रमाणे त्यांच्याशी संबंधित असलेले लोकही अमेरिकेला जाऊ शकणार नाहीत. छऊ व्यतिरिक्त, अमेरिकेच्या निर्बंधांच्या कक्षेत आलेल्या तीन कंपन्यांची नावे एफिलिएट्स इंटरनॅशनल, अख्तर अँड सन्स प्रायव्हेट लिमिटेड आणि रॉकसाइड एंटरप्राइझ आहेत. या तीन कंपन्या कराची येथील आहेत.

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाच्या माहितीनुसार, इस्लामाबादस्थित छऊ लांब पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्राच्या निर्मितीमध्ये गती देण्यासाठी आणि त्याच्या चाचणीसाठी आवश्यक उपकरणे मिळवण्याचा प्रयत्न करत आहे.

अमेरिकेचे उप राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जोनाथन फाइनर यांनी याबाबत भीती व्यक्त केली आहे. जोनाथन फाइनर म्हणाले, 'पाकिस्तान जे क्षेपणास्त्र बनवत आहे ते दक्षिण आशियाबाहेर अमेरिकेवर हल्ला करण्यात यशस्वी ठरेल. त्यामुळे पाकिस्तानच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित होणे स्वाभाविक आहे आणि त्यांना ही क्षमता मिळण्यापासून रोखण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे.

## बिडकीन येथे कल्याण नगर रस्त्यावर कोयता हल्ला : तीन जण जखमी

तभा वृत्तसेवा बिडकीन दि २० डिसेंबर

पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोमपूरी येथील काही युवकांना जुन्या वादाच्या कारणावरून तुंबळ हाणामारी करत नंतर कोयत्याने हल्ला केला या प्रकरणी बिडकीन पोलीस पुढील तपास करीत आहे हल्ल्यात तीन जण जखमी झाले

असून. या प्रकरणी दोन्ही गटाकडून कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. मात्र या घटनेचा सीसीटीव्ही व्हिडीओ समोर आला असून व्हिडीओ सोशल मीडियावर वेगानं व्हायरल होत आहे.व्हायरल झालेल्या व्हिडीओत काही तरुण बिडकीन येथील कल्याणनगर रस्त्यावर दबा धरून बसल्याचं दिसत आहे. यावेळी घटनास्थळी दोन तरुण दुचाकीवरून दाखल झाले. तेव्हा दबा धरून बसलेल्या गटाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. ऊस तोडण्याचा कोयता आणि लोखंडी रॉडने मारहाण करायला सुरुवात केली. या वेळी दुचाकीवरील तरुणांनी तातडीने दुचाकी घटनास्थळी टाकून पळ काढला आणि समोरच्या दुकानात शिरले.या नंतर हल्ला झालेल्या तरुणांनी दुकानातून काही लोखंडी रॉड आणि लाकडी दांडा घेत प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न



केला. या वेळी घटनास्थळी असलेल्या लोकांनी दोन गटातील हा वाद मिटवण्याचा प्रयत्न केला. दोन्ही बाजुने बाचाबाची झाली. संतापलेला एक तरुण कोयत्याने दुसऱ्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न करत होता. मात्र समोरील तरुणाने हे वार हुकवले, यात एक जन गंभीर जखमी असून छत्रपती संभाजीनगर शासकीय घाटी रुग्णालयात उपचार घेत आहे या घटनेमुळे काही काळ तणाव पूर्ण शांतता होती यात असद रशीद शेख हा गंभीर जखमी असून. तोफिक रशीद शेख ,नाजेर नजीर शेख, हे पण जखमी आहेत विरुद्ध गटातील काही लोक जखमी असल्याचे बोलले जात आहे मात्र या घटनेमुळे बिडकीन मध्ये काही काळ तनाव पूर्ण शांतता होती,बिडकीन पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद प्रक्रिया चालू आहे

## कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही : देवेंद्र फडणवीस

### कल्याण मराठी कुटुबियांना मारहाण प्रकरण

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. २० - कल्याण येथील सोसायटीमध्ये मराठी माणसांवर झालेल्या हल्ल्या प्रकरणी राज्य शासनाने गंभीर दखल घेतली असून दोषींवर गुन्हा दाखल करून कारवाई सुरू आहे. मुंबई ही मराठी माणसांची आहे. कुठल्याही परिस्थितीत मराठी माणसांवर अन्याय होऊ देणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी विधानपरिषदेत सांगितले.

कल्याणमधील योगिधाम सोसायटीत एका मराठी कुटुंबावर एमटीडीसीतील अखिलेश शुक्ला नावाच्या अधिकाऱ्याकडून झालेल्या मारहाणी प्रकरणी तीव्र संताप व्यक्त होत आहे .त्याबाबतचे व्हिडिओ सोशल मीडियावर काय व्हायरल झाले आहेत. त्याबाबतचा प्रश्न विधानपरिषद सदस्य ड. अनिल परब यांनी मांडलेल्या विधानपरिषद नियम २८९ अन्वये मांडला या चर्चेत सर्वश्री परब, शशिकांत शिंदे, भाई जगताप, सचिन अहिर यांनी सहभाग घेतला. त्यावर उत्तर देताना फडणवीस म्हणाले की, कल्याण येथील एका सोसायटीत अखिलेश शुक्ला व त्याच्या पत्नीने भांडणात मराठी माणसाचा अवमान केला. या प्रकरणी खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आले आहे. शुक्ला हा एमटीडीसीचा कर्मचारी असून त्याला निलंबित करण्याची कारवाई सुरू आहे. महाराष्ट्र, मुंबई ही मराठी माणसाची आहे. मुंबई ही आर्थिक राजधानी असल्याने येथे देशभरातील टॅलेंट येथे येत असते आणि ते येथे शांततेने राहतात. उत्तर प्रदेशातून आलेले अनेक मराठी भाषा उत्तमपणे बोलतात, अनेक मराठी सण साजरे करतात. मात्र, अशा काही लोकांमुळे या सामाजिक सलोख्याला गालबोट लागते, असे सांगून ते म्हणाले की, 'एखाद्याला काय खायचे याचे स्वातंत्र्य संविधानाने दिले आहे. पण अशा प्रकारे रोखण्याचा कोणालाही अधिकार नाही. या आधारावर भेदभाव मान्य नाही. अश्या तक्रारी आल्यास त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

देशातील वैविध्य टिकले पाहिजे, आपली जबाबदारी आहे. क्षेत्रिय अस्मिता म्हणजे मराठी असल्याचा आम्हाला अभिमान आहे, त्यावर घाला घातल्यास सहन करणार नाही, त्याच्यावर कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**'तो' अधिकारी कितीही मोठ्या बापाचा असलातरी कारवाई करणार : अजित पवार**

झालेली मारहाण आणि अन्यायाच्या घटनेची गंभीर दखल घेत महाराष्ट्र हा 'शिव-शाहू-फुले आंबेडकरां'चा आहे. इथे कुणी मराठी माणसावर अन्याय करत असेल तर ते चालणार नाही. 'तो' अधिकारी कितीही मोठ्या बापाचा असला, तरी त्याची गय केली जाणार नाही. त्याच्यावर कठोर कारवाई केली जाईल. अशा कठोर आणि रोखठोक शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार विधानसभेत राज्य सरकारची भूमिका मांडली.

योगीधाम सोसायटीत मराठी माणसाला मारहाण आणि अन्याची बाब 'पॉईंट ऑफ इन्फॉरमेशन'च्या माध्यमातून ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी विधानसभेत मांडली. त्यावर उत्तर देताना महाराष्ट्रातल्या प्रत्येक मराठी माणसाचा मान-सन्मान राज्यात ठेवला जाईल, अशाच पद्धतीने प्रशासन वागेल, याप्रकरणी तातडीने कारवाई करण्याचे आदेशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात दिले.

## धनंजय मुंडे आणि वाल्मिकींना वाचवण्याचा मुख्यमंत्र्यांकडून प्रयत्न

### 'माविआ' नेत्यांचा आरोप

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

नागपूर दि २० डिसेंबर : बीड आणि परभणीतील घटनाबाबत मुख्यमंत्री ठोस कारवाई करतील अशी अपेक्षा असताना त्यांनी केवळ गोल गोल गोमविले आहे ते मंत्री धनंजय मुंडे , सिरीयल किलर वाल्मिकी कराड व परभणीतील मारहाण करणाऱ्या पोलिसांना वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत असा आरोप, असा आरोप महाविकास आघाडीच्या आमदारांनी केला आहे.

मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत याबाबत दिलेल्या उत्तराला पॉईंट ऑफ रिप्लाय अंतर्गत बोलण्यास न दिल्याने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा निषेध करीत विरोधकांनी सभात्याग केला. त्यानंतर प्रवेशद्वाराच्या पायऱ्याजवळ पत्रकारांची बोलताना काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार नितीन राऊत, राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड ,आणि उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी सरकारवर आरोप केले. नितीन राऊत म्हणाले, परभणीतील सूर्यवंशी या दलित तरुणांच्या पोलिसांकडून मारहाणीत मृत्यू झाला असल्याचे पीएम रिपोर्ट मधून स्पष्ट झाले आहे त्याबाबत चे व्हिडिओ व्हायरल झाले आहेत मात्र मुख्यमंत्री पोलिसांना वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. दलित आंदोलकांना खोटे ठरवित आहेत. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जचा व्हिडिओ उपलब्ध आहे, तरीही मुख्यमंत्र्यांनी याबाबत चुकीचे वक्तव्य करून पोलिसांना वाचवण्याचा प्रयत्न केला. बीडमध्येही त्यांनी तसेच उत्तर द्यायचे होते पण विधानसभा अध्यक्षांनी त्यांना बोलू दिले नाही.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, हे सर्वकाही सरळ आणि स्पष्ट असतानाही मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे स्पष्टता नसल्याचा टोला लगावला, मुख्यमंत्री, मंत्री धनंजय मुंडे, त्यांचे गुंड साथीदार वाल्मिकी कराड, वाल्मिकींना वाचवत आहेत. तो मारेकरी आहे आणि मुख्यमंत्री असे म्हणतात, या प्रकरणात त्यांचा आणि धनंजय मुंडेंचा काही सहभाग नाही का?

पण त्याविरोधात आम्ही रस्त्यावर उतरून लढू!

आदित्य ठाकरे म्हणाले की, सरकारचा हेतू काय आहे, मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट होते की, त्यांना आरोपी वाचवायचे आहेत, पण आम्ही अन्यायाविरुद्ध लढत राहू, महाराष्ट्र वाचवण्याचा लढा सुरूच राहील.

सत्ताधारी भाजपचे बीडचे आमदार सुरेश धस म्हणाले की, याप्रकरणी मंत्री मुंडेंवर आरोप होत आहेत, ते शांत बसले आहेत, त्यांनी पुढे येऊन उत्तर द्यायला हवे.'

## पतसंस्था मल्टीस्टेट कडे लक्ष देण्याचे मुख्यमंत्र्यांचे आश्वासन : डॉ. प्रशांत पाटील

बीड : महाराष्ट्राचे नवनियुक्त लोकप्रिय मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना नागपूर येथे भेटून भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारिणी सदस्य डॉ. प्रशांत पाटील यांनी माजलगाव तालुक्यासह बीड जिल्ह्यात व मराठवाड्यात सहकार क्षेत्रातील अनेक पतसंस्था मल्टीस्टेट व सहकारी बँक वेगवेगळ्या कारणांनी बंद पडत आहेत व अनेक लोकांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांचे संसार उघड्यावर येत आहेत तरी आपण याकडे लक्ष द्यावे व जनतेचे नुकसान होऊ देऊ नये असे निवेदन दिले.

यावर नक्कीच लक्ष देऊन लवकरात लवकर उपाय योजना करुत असे आश्वासन माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. प्रशांत पाटील यांना दिले यावेळी उपस्थित नगरसेवक विनायक रत्नपारखी, भाजपा सोशल मीडियाचे दत्ता महाजन मा. सरपंच प्रल्हाद दळवी व रवींद्र पांडे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# करिश्मा की सिंघम कारवाई

## हातभट्टी दारूचा अड्डा केला डिवायएसपी चौधरींनी उध्वस्त

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

प्रो.डि.वाय.एस.पी. चौधरी यांनी शुक्रवारी ९ वाजण्याच्या सुमारास पोलीस ठाणे चंदनझिरा हद्दीतील सुंदरनगर भागात अवैध रित्या गुप्तपने सुरु असलेल्या गावठी हातभट्टीच्या अड्यावर छापा टाकुन तब्बल ३ हजार लिटर सडवा व २ हजार लिटर गावठी हातभट्टीची दारु एकुण ३ लाख ५० हजार रुपयाचे मुद्देमालावर त्यांचे पथकासह कारवाई करुन सदरचा मुद्देमाल नष्ट करुन पोलीस ठाणे चंदनझिरा येथे सपोनि सुशिल चव्हाण यांचे फिर्यादीवरुन आरोपी राम तेजराव जाधव वय-२३ वर्षे रा. सुंदरनगर, चंदनझिरा जालना याचेवर गुन्हा दाखला असुन गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवलदार जारवाल हे करीत आहेत.



सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल साहेब, अपर पोलीस अधिक्षक अयुष नोपाणी साहेब, उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब यांचे मागदर्शनाखाली प्रो.डि.वाय.एस.पी. करिश्मा चौधरी मॅडम, सपोनि चव्हाण, पोहेकॉ/प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रवि देशमुख, राजु पवार, नवनाथ पाटील यांचे पथकानी केली आहे.



## तलवार हल्ला प्रकरणी दोघांना ठोकल्या चंदनझिरा पोलीसांनी बेड्या

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

पोलीस ठाणे चंदनझिरा हद्दीतील खादगाव परीसरात नविन रुट पाईप कंपनीचे कामगार व वाचमन लोकांवर तलवारीने वार करुन जखमी करुन दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांन विरुध्द पोलीस ठाणे चंदनझिरा जालना गुरनं, ४६१/२०२४ कलम १८९ (२), १९१ (२),१९१ (३), १९०, १०९, ११८(१), ३५२, ३५१(२), ३२४(४), ३२४(५) भान्यास सह क. ४/२५ भा.ह. का प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणातील आरोपी हे गुन्हा केल्यापासून फरार होते आरोपी नामे- १) पवन शंकर पिल्लालु रा. म्हाडा कॉलनी जालना २) नंदु अशोक भानुसे रा. शिवनगर जालना यांचा शोध घेवून चंदनझिरा पोलीसांनी अटक केली असुन आरोपीतांना मा.न्यायालयात हजर केले असता दि.२३/१२/२०२४ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर झाली आहे. यापूर्वी सदर हल्ला प्रकरणातील मुख्या आरोपी पप्पु कचरु घोरपडे व त्याचे इतर तिन साथीदार यांना चंदनझिरा पोलीसांनी अटक केलेले आहे.. सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल साहेब, अपर पोलीस अधिक्षक अयुष नोपाणी साहेब, मा. उप विभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी साहेब यांचे मागदर्शनाखाली प्रो.डि.वाय.एस.पी. करिश्मा चौधरी मॅडम, सपोनि चव्हाण, पोहेकॉ / प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, रवि देशमुख, राजु पवार, अभिजीत वायकोस, नवनाथ पाटील, दिपक डेहंगल यांचे पथकानी केली आहे.

# संक्षिप्त

## नॅशनल उर्दु शाळेत आनंदनगरी मेळावा, विद्यार्थ्यांनी जाणून घेतले व्यावहारिक ज्ञान



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

शहरातील नॅशनल उर्दु प्राथमिक ,माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय जिवनासोबतच व्यवहारीक ज्ञान देखील मिळावे, माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव सिल्लोड नगरीचे उपनराध्यक्ष अब्दुल समीर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.यात विद्यार्थ्यांनी ४५ स्टॉल उभारले होते.दिवसभरात विविध पदार्थाच्या विक्रीतून ३० हजार रुपयां ची कमाई केली.यावेळी आनंद मेळाव्याचे उद्घाटन पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नॅशनल एज्यूकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी रईस खान होते विद्यार्थ्यांना शिक्षणसोबत व्यवहारीक ज्ञान मिळणे देखील गरजेचे असते.यासाठी विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यवसाय कसा करावा लागतो व त्यातुन दोन पैसे मिळविताना कशाप्रकारे अडचणीला तोंड द्यावे लागते याचा अनुभव यावा म्हणून नॅशनल शाळेत आनंद नगरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात शाळेतील तब्बल ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवीत आपली कला सादर करण्याचा प्रयत्न केला.मेळाव्यात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी घरुनच साहित्य बनवून आणुन शालेय आवारात स्टॉल लावले.यात विद्यार्थ्यांनी गुलाब जामुन, भेळ,पाणीपुरी,कचोरी,गाजर हलवा,रगडा , बिर्याणी , ताहारी,समोसे,रगडा,पोहे,पापड,सडविच,ढोकळा,बडापाव,मिसळ,चहा, चॉकलेट,पान स्टोल फूट स्टोल,चाट पुरी,शो पुरी,कोल्ड ड्रिंक स्टॉल आदी खाद्यपदार्थांचे स्टॉल लावले होते.शाळेतील व इतर शाळांच्या विद्यार्थ्यांनी येऊन कॅन्टीनचा आनंद लुटला व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पालकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी

प्रमूख पाहुणे म्हणुन केंद्रप्रमुख आर एच सोनवणे ,मराठवाड़ा अल्पसंख्यक प्रमुख शेख नजीर, भुषण शर्मा, विशाल गाडे, नानासाहेब वानखेड़े,शेख रिजवान , अब्दुल कदीर बापू , मुजीब हाजी , कलीमुद्दीन सिद्दीकी, नसीम पठान, हमदू चाउस , शेख रईस, हाजी अख्तर बेग , मुख्याध्यापक अब्दुल वहीद खान, यूनुस खान, सय्यद जलील, सय्यद शाकेर,शेख हारून , शिक्षक सलीम शाह,शेख वहीद ,सादेक कुरैशी, परवेज कुरैशी, शेख शाहरुख, कादर कुरैशी , संदीप भूतेकर आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्राथमिकचे मुख्याध्यापक शेख इरफान,माध्यमिक चे मुख्याध्यापक शेख जाफर,शिक्षक अनीस खान,शेख वाजेद ,शेख नईम,सैयद यूसुफ,शेख जाफर,शेख इद्रीस,अबरार देशमुख,मुख्तार कुरैशी,पठान अनसार,शिक्षिका शेख अलमास,पठान फरहाना ,शेख इरम, शेख जमील,शेख जुबेर,रेशमा सिद्दीकी यांनी परिश्रम घेतले.

## शास्त्री विद्यालयात एनएमएमएस सराव परीक्षा संपन्न



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

येथील शिवाजीनगर भागातील लालबहादूर शास्त्री विद्यालयात गुरुवारी एनएमएमएस सराव परीक्षा घेण्यात आली. दरम्यान, विद्यालयाच्या या निर्णयाचे पालकवर्गातून स्वागत होत आहे.

येत्या रविवारी दि. २२ डिसेंबर रोजी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी एनएमएमएस परीक्षा घेण्यात येणार आहे. शहरातील दोन परीक्षा केंद्रावार ही परीक्षा घेतली जाणार आहे. विदयार्थ्यांची परीक्षेची भीती दूर व्हावी या दृष्टीकोनातून ही परीक्षा घेण्यात आली. विद्यालयाचे सहशिक्षक संतोष साळवे, रवींद्र आकणीकर, प्रमोद कामठे, अच्युत मगर, नितीन खरात यांच्या पुढाकारातून ही परीक्षा संपन्न झाली.

आमच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयातून दरवर्षी एनएमएमएस परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. निकालही चांगला असतो.विद्यालयाचे अनेक विद्यार्थी आतापर्यंत शिष्यवृत्ती धारक झाले आहेत. मागील वर्षी देखील आमच्या विद्यालयाने चांगले यश मिळविले होते.विद्यार्थ्यांना परीक्षेचा सराव व्हावा,परीक्षेबद्दलची भिती दूर व्हावी या दृष्टिकोनातून ही सराव परीक्षा घेण्यात आली. - एल. के. बिरादार, मुख्याध्यापक.

# अपार आयडीसाठी ५३ हजार विद्यार्थ्यांची माहिती अपलोड; माहिती अपलोड करण्यात अडचणी

### लवकरच काम पूर्ण होईल

अपार आयडीचे काम चालू आहे. विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख हे काम पाहत आहेत. शाळेतील शिक्षक काम करत आहेत. गटशिक्षण कार्यालयाकडून त्याचे प्रयत्न चालू आहेत. ३० डिसेंबर पर्यंत पूर्ण विद्यार्थ्यांचे अपार आयडी लवकरच पूर्ण होईल.
- दिलीप शहागडकर गटशिक्षणाधिकारी, भोकरदन

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी




विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती डिजिटल स्वरुपात सुरक्षित रहावी, यासाठी अपार आयडी काढण्याचे काम सुरू आहे. भोकरदन तालुक्यात ४६८ शाळा आहे, यामध्ये ७१०५८ विद्यार्थ्यां संख्या असून आतापर्यंत तब्बल ५३३८२ विद्यार्थ्यांचे म्हणजेच ७५.१२ टक्के विद्यार्थ्यांचे अपार आयडीसाठी त्यांची माहिती अपलोड करण्यात आले असून जालना जिल्ह्यात भोकरदन येथील शाळा तिसऱ्या क्रमांकावर असल्याचे येथील गट शिक्षण अधिकारी दिलीप शहागडकर यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना माहिती दिली.

दरम्यान अपार आयडीसाठी माहिती अपलोड करताना शिक्षकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शिक्षकांची दमछाक होताना दिसत आहे ,राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० नुसार अनेक आवश्यक बदल करण्यात येत आहेत. अभ्यासक्रमातील बदलापासून ते कार्यपद्धतीत बदलापर्यंतचा यात समावेश आहे. यातीलच अपार उपक्रम कार्यान्वित झाला आहे. याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्याला त्याचा स्वतंत्र ओळख क्रमांक व डिजिलॉकरची सोय उपलब्ध करून दिली जात आहे. 'एक देश, एक विद्यार्थी ओळख' या संकल्पने अंतर्गत हा उपक्रम आहे. शाळांमध्ये शिक्षण विद्यार्थ्यांची केंद्र शासनाच्या निर्देशानुसार युनिक आयडी ऑटोमेटेड परमनंट अकॅडमिक अकाउंट रजिस्ट्री (अपार आयडी) आयडी तयार करण्याचे काम शिक्षण विभागाने शिक्षकांवर सोपवली आहे.

### यू-डायसवर एक तर आधारवर दुसरेच नाव

यू-डायस प्लस पोर्टलवर शालेय विद्यार्थ्यांचे नाव, त्याचे मूळनाव अशा नोंदी आहेत. परंतु काही विद्यार्थ्यांच्या नावापुढे आडनाव नाही तर पोर्टलवर एक नाव आणि आधार कार्डवर दुसरेच नाव असल्याने हा प्रकार घडत आहे. काही ठिकाणी आडनाव जुळत नसल्याने अपार आयडी तयार करण्यात अडचणी येत असल्याचे शिक्षक सांगताहेत. परंतु यामध्ये अडचणी येत असल्याने 'अपार'च्या कामाला गती मिळत नसल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे अपार आयडीचे काम करावे, तर शिकवावे कधी आणि इतर शालेय काम करायचे कधी, असा प्रश्न अनेक गुरुर्जींना पडला आहे. शिक्षण विभागाकडून विद्यार्थ्यांच्या अपारची प्रक्रिया पूर्ण करून लवकरात लवकर ओळखपत्र तयार करण्यासाठी माहिती अपलोड करण्याचे काम सध्या सुरू आहे. तपशील आणि पालकांचे आधार कार्ड तपशील जुळत नाहीत. त्यामुळे ही प्रक्रिया पूर्ण होण्यात अडचणी येत आहे.

### सर्व्हर, इंटरनेटची अडचण, आधार कार्डवर चुका

ही माहिती अपलोड करताना अनेक ठिकाणी सर्व्हरमुळे अडचणी येत असल्याचे शिक्षकाकडून सांगण्यात येत आहेत. तसेच काही ठिकाणी इंटरनेटची अडचण येत असल्याचे सांगण्यात आले. काही जणांनी सांगितले की, आधार कार्डवर अनेक चुका आहेत. त्यामुळे माहिती जुळत नाही. परिणामी अपार कार्डसाठी आवश्यक माहिती अपलोड करता येत नाही. शाळाबाह्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाचा तपशील, गुणपत्रिका, विद्यार्थ्यांना शासनाकडून मिळणाऱ्या सोयीसुविधा पाहण्यासाठी व विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आता 'अपार' आयडी महत्त्वपूर्ण आहे. 'डिजिलॉकर'च्या मदतीने 'अपार'मधून सर्व शैक्षणिक वर्षातील विद्यार्थ्यांच्या नोंदी पाहता येतील. पण सध्या ही माहिती अपलोड करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना कधी शिकवायचे आणि हे अपार आयडीचे काम कधी करायचे हा प्रश्न आता निर्माण झाला आहे.



नागपूर येथे विधिमंडळ अधिवेशनादरम्यान माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी शेतकऱ्यांसाठी सरसकट कर्जमाफीचा मुद्दा मांडून शेतकऱ्यांचा आवाज विधिमंडळात बुलंद केल्याबद्दल जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे प्रशासकीय संचालक प्रा सहदेव मोरे पाटील व सहकाऱ्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यांवर पुष्पगुच्छ देऊन आमदार लोणीकर यांचा सत्कार केला.



भारतीय कपास निगम ली. (CCI) MD स्वप्नील ददमाळ यांनी जालना उउख कापूस सेंटर येथे भेट दिली असता त्यांचा सत्कार करताना माजी मंत्री तथा आमदार व जालना बाजार समितीचे मुख्य प्रशासक अर्जुन भाऊ खोतकर व प्रशासक माजी आमदार अरविंदराव चव्हाण. यावेळी सोबत रा.कॉं.चे तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे,जालना बाजार समितीचे सचिव मोहन राठोड व सहाय्यक सचिव अनिल खंडाळे यांच्यासह आदी.

## भांबेरी ग्रामपचांयतच्या उपसरपंच पदाची निवड झाली बिनविरोध

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी



अबंड भांबेरी येथे ग्रामपचांयतच्या उपसरपंचाची निवड बिनविरोध करण्यात आली.

याबाबत अधिक माहीती अशी की भांबेरी ग्रामपचांयत चे माजी उपसरपंच रमेश काकासाहेब केजभट यांच्या राजीनाम्यामुळे रीक्त झालेल्या उपसरपंचाच्या निवडीचा कार्यक्रम आज घेण्यात आला. यावेळी निर्धारीत वेळेमधे उपसरपंच पदासाठी केदारनाथ भाउसाहेब तरमाळे यांचा एकच अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली . यावेळी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन ग्रामसेवक समिना शेख व सरपंच सपना अन्नासाहेब कनके यांनी काम पाहीले. त्यांच्या निवडीबद्दल श्री भाउसाहेब कनके ( चेअरमन खरेदी विक्री संघ अबंड ) भगवानजिजा कनके ( चेअरमन वि.वि.का.से.सोसायटी चदंनापुरी ) अन्नासाहेब कनके, शिवसेना विभाग प्रमुख साष्ट पिंपळगाव रजनिश कनके रमेश केजभट ग्रामपचांयत सदस्य , परमेश्वर ठोबंरे , बाबासाहेब ठोबंरे,राजेंद्र कनके, मुरलीधर केजभट,रघुनाथ ठोबंरे,गजानन कनके,बाबा शेख, गगांधर ठोबंरे , आसाराम गायकवाड, सतांराम कनके, , आसाराम गायकवाड यांनी अभिनंदन केले.

## मोबाईलमुळे तरुणाईची विनाशाकडे वाटचाल, मुलांना मोबाईल बंदी आवश्यक -निवृत्ती महाराज इंदोरीकर

तभा वृत्तसेवा
माहोरा/प्रतिनिधी



आजची तरुण पिढी ही दारूचे व्यसन , मोबाईलवरील जुगार , आणि त्यामुळे होणारे कर्ज , अशिक्षित पणा यामुळे विनाशाकडे वाटचाल करीत असून मुलांना शाळेत मोबाईल बंदी करणे आवश्यक आहे , आज प्रत्येक आई वडिलाची अपेक्षा हीच की आपला मुलगा चांगला शिकला पाहिजे खरं पण तो कोणत्या शाळेत शिकला पाहिजे हे फार महत्त्वाचे आहे , आज प्रत्येक ठिकाणी कॉंटेटी वाढली पण क्वालिटी नाही , आजही जिल्हा परिषदेच्या शाळेची चांगली क्वालिटी असून आजही उच्चपदावर सर्वांत जास्त नोकरी करणारे हे जिल्हा परिषद शाळेत शिकलेले आहेत . आज मुलांना चांगल्या शिक्षणाची आणि चांगल्या संस्काराची गरज असल्याचे मत ह.भ प निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी आ . संतोष पाटील दानवे यांच्या वाढदिवसानिमित्त माहोरा येथे आयोजीत किर्तनात व्यक्त केले .

जाफ्राबाद तालुक्यातील माहोरा येथे दि .१९ डिसेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज आश्रम शाळेच्या प्रांगणात किर्तनाचा भव्य कार्यक्रम पार पडला. माणसाने पैशावर प्रेम केल्या पेक्षा माणसांवर प्रेम केले तर आपला समाज मोठा होईल , देव आहे का तर आहे पण तो कोठे आहे , माणसाचे निस्वार्थ कर्म , गोरगरिबांची सेवा , ईश्वर सेवेपेक्षा आई वडीलांची सेवा , केल्याने ईश्वर प्राप्ती होईल , उपवास केल्याने आजपर्यंत देव कोणला भेटला नाही पण जर प्रत्येकाने मी पणा सोडून निस्वार्थ कर्म केल्यास निश्चित देव भेटल्या शिवाय राहणार नाही . मोह मायेत न अडकता सर्वांशी मिळून मिसळून प्रेमाने रहा , तरुणांनी व्यसनापासून दूर राहण्याचा संदेश निवृत्ती महाराजांनी किर्तनाला उपस्थित हजारो माहिला -पुरुष - तरुणांना दिला. यावेळी मा . केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे , निर्मलाताई दानवे , मतकर यांची प्रमुख उपस्थिती होती. आजच्या काळात शिक्षणाशिवाय पर्याय नाही , शिकेल तो टिकेल , म्हणून विद्यार्थ्यांनी शालेय जिवनात फक्त आपल्या शिक्षणाकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे शिक्षण ही काळाची गरज आहे . तसेच तरुणांनी व्यसनांपासून दूर राहण्याचा मोलाचा सल्ला यावेळी मा . केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी दिला. यावेळी माहोरा जि. प सर्कल मधील तसेच तालुक्यातील सर्व पदाधिकारी तसेच माहोरा पंचक्रोशीतील हजारोच्या संख्येने माहिला -पुरुष -तरुण उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजक राजेश पाटील म्हस्के व त्यांचे सहकारी यांच्या वतीने मा. केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे , निर्मलाताई दानवे , ह.भ. प . निवृत्ती महाराज इंदोरीकर त्यांचें सहकारी यांचा भव्य सत्कार करण्यात आला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची जेईएफ शिष्यवृत्ती-प्रा.लाहोटी चार वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना १ कोटी १५ लाखाची शिष्यवृत्ती

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जेईएफ शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिक दुर्बल घटकातील वैद्यकीय, अभियांत्रिकी, वाणिज्य आदी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली असून, शिष्यवृत्ती प्रदान सोहळा रविवार दि. २२ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्रीमती दानकुंवर महिला महाविद्यालयात आयोजित करण्यात आला आहे. प्रमुख वक्ते म्हणून निर्माण युवा उपक्रम व सर्च फाउंडेशन गडचिरोलीचे सहसंचालक अमृत अभय बंग तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी यांनी दिली.

जेईएफ शिष्यवृत्ती योजनेची माहिती देण्यासाठी जालना एज्युकेशन फाउंडेशनच्या कार्यालयात शुक्रवार दि. २० डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत प्रा. लाहोटी बोलत होते. यावेळी फाउंडेशनचे सचिव सुरेश कुलकर्णी-केसापूरकर, मार्गदर्शक प्रा. ओमप्रकाश झांजरी, प्रा. राहुल लाहोटी, प्रा. स्वप्निल सारडा, मोफत जेईएफ कोचिंग प्रकल्पाचे विभाग प्रमुख प्रा. संतोष जाधव, दिलीप केंद्रे, रुक्मिणीकांत दीक्षित यांची उपस्थिती होती.



यावेळी प्रा. लाहोटी पुढे म्हणाले की, आर्थिक दुर्बल घटकातील गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या आड आर्थिक अडचण येऊ नये म्हणून गेल्या ४ वर्षापासून जेईएफ शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. पहिल्यावर्षी १२४ विद्यार्थ्यांना १७ लाख २५ हजार रुपये, दुसऱ्या वर्ष १९० विद्यार्थ्यांना २६ लाख ११ हजार ३५१ रुपये, तिसऱ्यावर्षी २७१ विद्यार्थ्यांना ३१ लाख १७ हजार शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. यावर्षी ३०५ विद्यार्थ्यांना ३३ लाख १७ हजार रुपयाची शिष्यवृत्ती येत्या रविवारी प्रदान करण्यात येत आहे. चार वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना १ कोटी १५ लाख रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली असून, महाराष्ट्रात जिल्हा पातळीवर राबवली जाणारी ही सर्वात मोठी शिष्यवृत्ती योजना ठरत असून, दानदात्यांच्या योगदानामुळे प्रत्येकवर्षी या योजनेचा विस्तार होत चालला आहे. यावर्षी पॉलिटेक्निकच्या २५२, इंजिनिअरिंगच्या १३, एमबीबीएसच्या ३, बीएससी नर्सिंगच्या ८, बी. फार्मसीच्या २, कॉमर्सच्या ११, बीएससी ॲग्रीच्या ४ तर स्टाफच्या विविध अभ्यासक्रमाचे पाल्य अशा १२ जणांची शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड करण्यात आली. शिष्यवृत्तीची रक्कम अभ्यासक्रमानुसार १० हजार ते २५ हजारापर्यंत आहे. गेल्या ४ वर्षात ९०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. जालना शहरातील दानशुरांच्या आर्थिक सहयोगामुळेच हे सर्व शक्य झाले आहे. त्यामुळे आम्ही या सर्वांचे शतशः आभारी आहोत, असे ते म्हणाले. यावेळी सचिव सुरेश कुलकर्णी यांनी जालना फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या पायाभूत साक्षरता अभियान पढो जालना, मोफत कोचिंग प्रकल्प, मोफत बेसिक कम्प्युटर, टॅली व इंग्लिश स्पीकिंग कोर्स, सायन्स सेंटर (विज्ञान शोधवाटीका), विद्यार्थ्यांना सायकल वाटप, इंग्रजी-मराठी शब्दकोश कार्यक्रम, अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेशासाठी निशुल्क कौन्सिलिंग, मध्यान्ह भोजन आदी उपक्रमांची विस्तृत माहिती दिली. शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यासाठी सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन फाउंडेशनचे अध्यक्ष सुनीलभाई रायठठ्ठा, उपाध्यक्ष प्रा. सुरेश लाहोटी, सचिव सुरेश कुलकर्णी, विश्वस्त सुनील गोयल, दिलीप कुलकर्णी, डॉ. हितेश रायठठ्ठा, गोविंद काबरा यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## विश्व

सोनाली मिश्रा

# मुस्लिमबहुल किर्गिस्तानलाही जिहादी कट्टरवाद्यांची भीती

**किर्गिस्तानच्या राज्यघटनेनुसार सर्व धर्म आणि धार्मिक गट समान आहेत. एका धार्मिक गटाचे दुसऱ्या धार्मिक गटात जबरदस्तीने धर्मांतर करण्यास प्रवृत्त करण्यांना आणि बेकायदेशीरपणे धर्मांतर करणाऱ्या घटकांना येथील संविधान प्रतिबंधित करते.**

मुस्लिमबहुल सेक्युलर देश असलेल्या किर्गिस्तानला आता स्वत:च्याच देशातील वाढत्या जिहादी कट्टरवादाची भीती वाटत आहे. धर्मांध जिहादींच्या वाढत्या धुमाकुळामुळे तेथील सरकार चिंताग्रस्त आहे. किर्गिस्तान सरकारने धर्मावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक पावले उचलली आहेत. किर्गिस्तानला ३१ ऑगस्ट १९९१ रोजी स्वातंत्र्य मिळाले होते आणि त्यानंतर अमलात आलेल्या संविधानात त्या देशाला सेक्युलर अर्थात धर्मनिरपेक्ष घोषित करण्यात आले. तेथील सुमारे ९०-९१ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे आणि त्यातही सुन्नी मुस्लिम अधिक आहेत.

तेथील राज्यघटनेने सर्वांना धार्मिक स्वातंत्र्य दिले आहे. परंतु सरकारने त्या सर्व कट्टरवादी इस्लामिक गटांवर बंदी घातली आहे, जे समाजासाठी धोकादायक आहेत, असे सरकारला वाटते. तेथील संविधान धर्म आणि सरकार या दोन्हींना वेगळे करते.

किर्गिस्तानच्या राज्यघटनेनुसार सर्व धर्म आणि धार्मिक समूह एक आहेत. एका धार्मिक गटातून दुसऱ्या धार्मिक गटात जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणणाऱ्या आणि बेकायदेशीरपणे धर्मांतर घडवून आणण्याच्या सर्व प्रयत्नांना येथील संविधान प्रतिबंधित करते. आई-वडिलांच्या लिखित परवानगीशिवाय मुलांना धार्मिक समूहात पाठवता येत नाही. तेथील कायद्यानुसार कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी कुठल्याही प्रकारचे धार्मिक साहित्य, मग ते छापील असो, ऑडिओ असो अथवा व्हिडीओ, त्याचे वितरण करण्याची परवानगी नाही. यामध्ये रस्ते, इमारती, अपार्टमेंट्स, मुलांच्या संस्था आणि शाळा यांचाही समावेश आहे.

या पावलांवरून असे दिसते की इस्लामिक देश असूनही धर्मांधतेपासून किर्गिस्तानचा बचाव झाला आहे. कारण याच कट्टरवाद व धर्मांधतेने बहुतेक मुस्लिम देशांना वेठीस धरले आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि आता बांगलादेश देखील इस्लामिक कट्टरवादाने भरलेले देश बनले आहेत.

## नियंत्रणासाठी केले कठोर कायदे

इराण, इराक, कतार, पॅलेस्टाईन इत्यादी देशही धर्मांधतेला प्रोत्साहन देतात. जणू काही इस्लामी देशांमध्ये कोण किती कट्टर आहे याची जणू स्पर्धाच लागली आहे. तथापि, किर्गिस्तानने अनेक वर्षांपूर्वी आपल्या देशात ही पावले उचलण्यास सुरुवात केली होती, जेणेकरून त्यांच्या सेक्युलर मूल्यांचे संरक्षण करता येईल. या देशाने इस्लामी अतिरेकी पसरवणाऱ्या अनेक संघटनांवर बंदी घातली होती. उदाहरणार्थ धरज्नूप खपझरी समूह. हा एक कट्टरपंथी इस्लामिक गट आहे ज्यावर २०१७ आणि २०१८ साली किर्गिस्तान आणि कझाकिस्तानमध्ये बंदी घालण्यात आली होती. हा समूह सेक्युलर शिक्षणाला विरोध करतो आणि आपल्या अनुयायांना राजकारण आणि लसीकरणापासून दूर राहण्याचे आवाहन करतो.

तथापि, २०२२ च्या एका अहवालानुसार, किरगिझ सुरक्षा संस्थांचे म्हणणे आहे की प्रतिबंधित Yakyn Inkar समूह बंदी असूनही देशात सक्रिय आहे. वर्ष २०२२ मध्येच सरकारने सांगितले होते की, इस्लामिक कट्टरतावादी समूह तेथील सेक्युलर सरकार पाडू इच्छित आहेत आणि इस्लामी खिलाफत लागू करू इच्छित आहेत. २०२२ मध्ये 'रेडियोफ्रीयूरोपरेडियोलिबर्टी' च्या एका अहवालानुसार, किरगिझस्तानच्या सुरक्षा एजन्सींनी सांगितले की त्यावेळी धरज्नूप खपझरी चे कमीत कमी ५० सक्रिय सदस्य होते.



२०१९ मध्ये, द डिप्लोमॅटने किरगिझस्तानमधील सरकारी उपायांवर एक अहवाल देखील प्रकाशित केला ज्यात कट्टरतावाद रोखण्यासाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यात लिहिले आहे की, किर्गिस्तानने २०१४ मध्ये एक धोरण स्वीकारले होते, जे धार्मिक क्षेत्रात सार्वजनिक नीतीचे मार्गदर्शन करते. हा अहवाल सूचित करतो की किर्गिस्तान स्थानिक इस्लामला वेगळे करू इच्छितो. अथवा असे म्हणता येईल की किर्गिस्तानला आपल्या देशात वेगळा इस्लाम निर्माण करायचा आहे त्यामुळेच कट्टरतावादी गटांवर त्या देशाने बंदी घातली. पण ही बंदी प्रभावी ठरली काय या प्रश्नाचा विचार करणे आवश्यक आहे. पाच दिवसांपूर्वी सरकारने घेतलेल्या आणखी एका ताज्या निर्णयाबद्दल बोलायचे झाल्यास हे लक्षात येईल की, या बंदीने केवळ गटांची स्वीकार्यता वाढली आहे, कमी झालेली नाही.

मंगळवारी, किर्गिस्तानमधील नेत्यांनी सरकारच्या नवीन प्रस्तावांना आपला पाठिंबा दिला आहे, ज्यात सरकार धर्मावर अधिक नियंत्रण ठेवण्याबद्दल बोलत आहे. मध्य आशियातील वाढत्या कट्टरवादाच्या पृष्ठभूमीवर सरकारने हे पाऊल उचलले आहे. इस्लामवादी कट्टरपंथींयांवर आणखी कठोर आणि महत्त्वपूर्ण कारवाईचा एक भाग म्हणून बिश्केकच्या अधिकाऱ्यांना 'धर्म आणि धार्मिक संघटनांचे स्वातंत्र्य' या संदर्भातील कायद्यात सुधारणा करायची आहे. संसदेत प्रथमच मंजूर झालेल्या दुरुस्त्यांमध्ये धार्मिक आधारावर राजकीय पक्ष स्थापन करणे आणि घरोघरी जाऊन प्रचार यासारख्या क्रियाकलापांवर बंदी घालणे समाविष्ट आहे.

दुसरीकडे सरकारने असाही प्रस्ताव दिला आहे की अशा केंद्रीय संस्था स्थापन कराव्यात ज्या धार्मिक संघटनांचे नियमन करतील आणि जर एखाद्याला परदेशात धार्मिक शिक्षण घ्यायचे असेल तर देशाबाहेरील 'विध्वंसक प्रभाव' रोखण्यासाठी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. ऊरुपच्या म्हणण्यानुसार, अलीकडे असे अनेक अहवाल आले आहेत, त्यानुसार किर्गिस्तानमधील अनेक युवक सीरियातील त्या इस्लामी समूहांचा भाग आहेत ज्यांनी बशर-अल-असदचे सरकार पाडण्यास मदत केली आहे. त्याच वेळी, गेल्या महिन्यात, किर्गिस्तानचे राष्ट्रपती सादिर जापरोव्ह यांनी देशातील प्रमुख धार्मिक नेत्यांना 'कट्टरतावादी घटकांविरुद्ध लढण्याचे' आणि योग्य मार्गापासून भरकटलेल्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन केले होते.

पण किरगिझस्तानची ही पावले प्रभावी ठरतात की नाही हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. कारण इस्लाममध्ये उदारमतवादी भूमिका स्वीकारण्याचा प्रयत्न करणाऱ्याला विरोधाचा सामना करावा लागल्याचे दिसून आले आहे. भारताच्याच इतिहासात डोकावल्यास सहिष्णू, उदारमतवादी दारा शिकोह सारख्या राजपुत्रापेक्षा कट्टरवादी, अनुदार औरंगजेब हा अधिक महान मानला जातो आणि वर्तमानकाळाचा विचार केल्यास 'मिसाईल मॅन' एपीजे अब्दुल कलाम यांचीही इस्लामी नागरिकांच्या एका मोठ्या वर्गाने उपेक्षा केली होती. त्यामुळे जो मुसलमान राजकीय नेता धार्मिक बाबतीत उदार आहे, जो नेहमी सहिष्णुतेला महत्त्व देतो आणि जो सर्व धर्म समभाव ठेवतो, अशा मुस्लिम व्यक्तीला जहाल व कट्टरतावादी मुस्लिम कधीच आपला नेता मानत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

(पांचजन्यवरून साभार)

## जीवनशैली

# पवनमुक्तासनाचे जबरदस्त फायदे

**दररोज योगाभ्यास केल्याने मनुष्याचा शारीरिक, मानसिक, भावनिक, बौद्धिक, सामाजिक व आध्यात्मिक विकास झपाट्याने होण्यास मदत होते. योगासनांमुळे तणावाची पातळी कमी होऊ शकते, वजन कमी करण्यात मदत होते आणि आजारांचा धोका कमी होतो. पवनमुक्तासन हे त्यापैकीच एक महत्त्वाचे व फायदेशीर आसन आहे.**

पवनमुक्तासन पोटातील जडपणा कमी करण्यास, रक्ताभिसरण वाढविण्यास, मज्जासंस्था उत्तेजित करण्यास आणि पोटातील वायू बाहेर काढण्यास मदत करते. यासोबतच शरीरातील हानिकारक टॉक्सिन्सही काढून टाकण्यास मदत करते. याशिवाय, वजन कमी करणे बद्धकोष्ठता दूर करणे, मणक्यामध्ये लवचिकता आणणे इत्यादी पचनसंस्थेला योग्य प्रकारे कार्य करण्यास मदत करण्यासाठी हे एक महत्त्वाचे आसन आहे. पवनमुक्तासनाच्या नियमित सरावाने तुम्हाला कोणते फायदे मिळू शकतात आणि त्याचा सराव करण्याची योग्य पद्धत याविषयी माहिती करून घेऊ.

### पवनमुक्तासन म्हणजे काय?

पवनमुक्तासन हे पवन आणि मुक्त या दोन संस्कृत शब्दांपासून बनलेले आहे. यामध्ये पवन म्हणजे 'वायू' आणि मुक्ता म्हणजे 'मोकळा-मुक्त'. पवनमुक्तासन ही एक आरामदायी आसन आहे जे सर्वांसाठी उपयुक्त आहे.

पवनमुक्तासनाचे फायदे पुढीलप्रमाणे आहेत. यामुळे अंतर्गत अवयवांची मालिश होते, ॲसिडिटी कमी होते, बद्धकोष्ठता दूर होण्यास मदत होते, कॅलरी (ऊर्जा) 'बर्न' करण्यात मदत होते. तसेच वजन कमी करण्यासही मदत होते. यामुळे मणक्यांची लवचिकता वाढते. तसेच रक्ताभिसरण सुधारते. हे आसन महिलांसाठी अतिशय फायदेशीर आहे.

### १. अंतर्गत अवयवांची मालिश

पवनमुक्तासनाच्या सरावामुळे तुमचे ओटीपोटाचे स्नायू आकुंचन पावतात आणि ओटीपोटाच्या क्षेत्रातील नसा उत्तेजित होतात, ज्यामुळे रक्ताभिसरण वाढते आणि ओटीपोटाच्या अवयवांना योग्य प्रकारे कार्य करण्यास मदत होते. त्यामुळे पोटाच्या स्नायूंची कार्यक्षमता वाढते. खरे पाहता पोटाच्या अवयवांना मसाज करणारे हे एक उत्कृष्ट आसन आहे.

### २. ॲसिडिटी कमी करण्यात मदत

या आसनाचे मुख्य कार्य शरीरातील हानिकारक वायू आणि विषारी पदार्थ बाहेर काढून टाकणे हे होय. म्हणून या आसनाचे नाव 'पवनमुक्तासन' आहे. त्यामुळे या आसनाच्या सरावाने ॲसिडिटीच्या समस्येपासून आराम मिळतो.

### ३. बद्धकोष्ठतेपासून आराम

या आसनाच्या सरावाने पचनक्रिया सुधारण्यास मदत होते, ज्यामुळे पोटाशी संबंधित समस्या जसे की बद्धकोष्ठता किंवा अपचन होत नाही. म्हणूनच या आसनाचा नियमित सराव करावा.

### ४. कॅलरीज बर्न करण्यास मदत

जर तुम्हाला चरबी कमी करायची असेल आणि सर्व व्यायाम करूनही तुम्हाला अपेक्षित परिणाम मिळत नसेल, तर पवनमुक्तासनाचा नियमित सराव तुम्हाला मदत करू शकतो. या आसनाच्या नियमित अभ्यासाने शरीरातील चरबी कमी होण्यास मदत होते.



### ५. वजन कमी करण्यास उपयुक्त

या आसनाचा नियमित सराव केल्याने आणि ठरावीक कालावधीपर्यंत ते कायम ठेवल्याने तुमचे वजन कमी होऊ शकते. हे आपल्याला निरोगी वजन राखण्यास देखील मदत करते.

### ६. मणक्याची लवचीकता

पवनमुक्तासनाच्या सरावाने मणक्याचे चांगले कार्य करण्यास मदत होते आणि त्याची लवचीकता वाढते, विशेषतः पाठीच्या खालच्या भागात. जर तुम्हाला पाठदुखी असेल तर हे आसन फायदेशीर ठरू शकते.

### ७. रक्ताभिसरण सुधारते

या आसनाच्या सरावाने तुमच्या शरीरातील रक्ताभिसरण सुधारते, ज्यामुळे तुमच्या शरीराच्या प्रत्येक भागाला पुरेशा प्रमाणात प्राणवायू आणि पोषक तत्त्वांचा पुरवठा होतो.

### ८. महिलांसाठी फायदेशीर

पवनमुक्तासन हे असे आसन आहे जे स्त्रियांनी केलेच पाहिजे. त्यामुळे त्यांच्या आरोग्याला चालना मिळते. विशेषत: जर तुम्ही गर्भाशयाच्या समस्येने त्रस्त असाल तर तुम्हाला हे आसन करण्याचा सल्ला दिला जातो. या आसनामुळे गर्भाशयाशी संबंधित आजार दूर होण्यास मदत होते. तसेच प्रजनन क्षमता देखील सुधारते.

### आसन करण्याची योग्य पद्धत

१) जमिनीवर किंवा चटईवर पाठीवर झोपा. आपले हात शरीराच्या बाजूला ठेवा आणि आरामशीर रहा.
२) झोपताना दीर्घ श्वास घेत राहा.
३) आता श्वास सोडताना तुमचे गुडघे तुमच्या छातीकडे आणा आणि हातांनी तुमच्या मांड्या पोटाकडे दाबा.
४) पुन्हा श्वास घ्या.
५) आपण श्वास सोडताना, आपले डोके जमिनीवरून उचला. आता आपल्या हनुवटीने आपल्या गुडघ्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा.
६) दीर्घ श्वास घेऊन या आसनात रहा.
७) सुरुवातीच्या स्थितीत परत येण्यासाठी हळूहळू पोझमधून बाहेर या. प्रथम आपले डोके खाली करा आणि नंतर आपले पाय. आसन झाल्यानंतर काही वेळ विश्रांती घ्या.

### पवनमुक्तासन करताना 'ही' खबरदारी घ्या

प्रत्येकजण या आसनाचा सराव करू शकतो, परंतु तरीही काही परिस्थितींमध्ये तुम्ही हे आसन करू नये. तुम्हाला उच्च रक्तदाब, हर्निया, स्लिप डिस्क, हृदय समस्या, मान आणि पाठदुखी यापैकी कोणतीही आरोग्य समस्या असल्यास हे आसन करणे टाळावे. तसेच, महिलांनी गर्भधारणेदरम्यान आणि मासिक पाळीच्या काळात पवनमुक्तासनापासून दूर राहण्याचा सल्ला दिला जातो. जर तुम्हाला पोटात अल्सरची समस्या असेल तर तुम्ही पवनमुक्तासन करू नये. पवनमुक्तासन झाल्यानंतर उत्थित द्विपादासन व शवासन करणे लाभदायक आहे.

(पांचजन्यवरून साभार)

# मध्यभारतातील प्राचीन प्रदेश : अवंती

अवंती हा मध्य भारतातील प्राचीन प्रदेश आहे. आधुनिक माळवा, निमाड व त्यालगतचा मध्य प्रदेशाचा भाग म्हणजे हा प्रदेश होय. 'आकरावंती', 'मालय' (मालव), 'अवंतिका', 'आकारवेणावंतिका' अशीही याची नामांतरे आढळतात. हा प्रदेश नर्मदा नदीच्या दोन्ही बाजूंस असून त्याच्या उत्तरेस राजपुताना व दक्षिणेस तापी नदी होती. उत्तरेकडील भागाची राजधानी उज्जयिनी, तर दक्षिणेकडील भागाची राजधानी माहिष्मती होती. इतिहासाच्या विभिन्न काळी अवंतीच्या सीमांमध्ये



अनेक फेरफार झाले. उदाहरणार्थ उत्तरेकडील भोपाळ प्रदेशाचा भाग फुटून त्याची राजधानी विदिशा झाली. हैहय कुलोत्पन्न राजे अवंतीमध्ये राज्य करीत. भारतीय युद्धात अवंती देशाची सेना कौरवपक्षात सामील असल्याचा उल्लेख मिळतो. गौतम बुद्धाच्या वेळी येथे उदयन राजा राज्य करीत होता. इ.स.पू. चौथ्या शतकात हा देश मगध साम्राज्याचा भाग झाला. गुप्त सम्राट विक्रमादित्याने शकांची हकालपट्टी करून येथे नवीन साम्राज्य स्थापिले. नवव्या शतकातील परमार, त्यानंतरचे चाहमान व नंतरचे मुसलमान यांच्या कारकिर्दीत अवंतीचे वैभव कमी कमी होत गेले.

## आरोग्य

महकसिंह

# हिवाळ्यात सूप पिण्याचे आश्चर्यकारक फायदे

हिवाळ्यातील बोचऱ्या थंडीचा सध्या आपण सर्वजण अनुभव घेत आहोत. रात्री उशिरा तर खूप थंडी असते. हिवाळ्यात आपल्याला त्या दृष्टीने आहाराचा विचार करणे आवश्यक आहे. लोक सामान्यत: आजारी असताना सूपचे सेवन करतात. परंतु निरोगी राहण्यासाठी दररोज ते पिणे आवश्यक आहे. सूपमध्ये जीवनसत्त्वे, प्रथिने, ॲंटी-ऑक्सिडेंट आणि मॅग्नेशियमसारखे महत्त्वाचे गुणधर्म आहेत. ज्यामुळे सर्दी आणि अन्य आजारांपासून बचाव होऊ शकतो. हिवाळ्यात गरम सूप पिण्याचे काय आहेत ते जाणून घ्या.

### कोणते सूप प्यावे?

हिवाळ्यात टोमॅटो, कोबी, वाटाणे किंवा स्वीट कॉर्न सूप घेऊ शकता. याशिवाय भोपळा, मशरूम, सोयाबीनचे किंवा संपूर्ण डाळीपासून बनविलेले सूप रोग टाळण्यासाठीही फायदेशीर ठरते.

### किती प्रमाणात घ्यावे?

सूपचे सेवन करणे सर्व वयोगटातील लोकांसाठी फायदेशीर आहे. परंतु वृद्ध किंवा आजारी व्यक्तींनी सूप पिणे फार आवश्यक आहे. मुलांना हिवाळ्यात व्हेजिटेबल सूप देणे योग्य आहे. ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांसाठी दररोज ५० मिली सूप द्यावे, तर निरोगी व्यक्तींना दररोज २००-३०० मिली सूप देणे योग्य ठरेल.

### सूप पिण्याचे फायदे

**१) सर्दी** : सर्दी, घसा खवखवणे आणि खोकला यासारख्या समस्या सामान्य आहेत. हे टाळण्यासाठी दररोज गरम सूप प्या. जर घसा खवखवत असेल किंवा खोकला असेल तर सूपमध्ये थोडीशी मिरपूड घाला.

**२) शारीरिक दुर्बलता** : सूप पिण्यामुळे प्रतिकारशक्ती वाढते, जी शारीरिक दुर्बलता दूर करते. जर ताप असेल तर कोणतेही सूप प्या. हे आपल्याला सामर्थ्य देईल आणि ताप कमी होण्यास मदत होईल.

**३) भूक वाढवा** : जर भूक वाढत नसेल तर दररोज १ कप व्हेजिटेबल सूप प्या. यामुळे हळूहळू आपली भूक वाढेल.

**४) रक्तदाब नियंत्रण** : सर्व खनिजे आणि जीवनसत्त्वे असल्याने सूपच्या सेवनानेदेखील रक्तदाब



नियंत्रित राहू शकतो.

**५) शरीराला 'हायड्रेटेड' ठेवा** : हिवाळ्यात पाणी न प्यायल्याने शरीर निर्जलीकरण होते. परंतु सूपचे दररोज सेवन केल्याने शरीर निर्जलीकरण होऊ देणार नाही, जे बऱ्याच समस्यांपासून वाचवेल.

**६) वजन कमी करा** : सूप एक फ्लेम-कॅलरीयुक्त आहार आहे. म्हणून त्याचे सेवन लठ्ठपणा नियंत्रणात ठेवते. दुसरीकडे, जर त्वरित वजन कमी करायचे असेल तर फायबर आणि पोषक तत्त्वांचा सूप प्या. हिवाळ्यात, लोक अनेकदा जास्त कॅलरीयुक्त पदार्थ खाण्याची सवय लावतात, ज्यामुळे वजन वाढू शकते. पण जर तुम्ही व्हेजिटेबल सूपचे सेवन केले तर ते तुम्हाला दीर्घकाळ तृप्त ठेवते, त्यामुळे तुम्ही जास्त खाणे टाळू शकता. हे सूप कमी कॅलरी आणि जास्त फायबर आहे, जे वजन नियंत्रणात आणण्यात मदत करते.

**७) पचन सुधारण्यास मदत** : सूप सहज पचते. तसेच आजारातून त्वरित मुक्तता करण्यास मदत करते. व्हेजिटेबल सूपमध्ये समाविष्ट असलेल्या भाज्यांचे फायबर पचन सुधारण्यास मदत करते. यामुळे गॅसेस आणि पचनाच्या इतर समस्यांपासून आराम मिळतो. गरम सुपाचे सेवन करणे सुखदायक असते आणि अन्नाचे अवशोषण सुधारते, त्यामुळे हिवाळ्यात पोटाच्या समस्या कमी होतात.

**८) चव वाढवते** : जर आपल्या तोंडाची चव खराब झाली असेल तर सूप प्या. हे आपल्या तोंडाची चव परत आणेल.

**९) मजबूत रोगप्रतिकार शक्ती** : फायबर समृद्ध असल्याने, सूपचे सेवन रोगप्रतिकार शक्ती मजबूत करते. ज्यामुळे बऱ्याच रोगांपासून संरक्षण होते. यासह आपण मुरूम, सुरकुत्या आणि ॲंटी-एजिंगची समस्या देखील टाळू शकता.

**१०) ऊर्जा प्रदान करण्यासाठी** : भाज्यांच्या सूपमध्ये असलेले पोषक तत्त्व शरीराला ऊर्जा देतात आणि दैनंदिन कामांसाठी शारीरिक आणि मानसिक शक्ती वाढवतात. हे केवळ शरीराला उबदार करत नाही तर दिवसभर ताजेपणा राखण्यास देखील मदत करते. जेव्हा शरीराला जास्त ऊर्जेची गरज असते त्यावेळी सूप पिणे फायदेशीर ठरते. हिवाळ्याच्या हंगामात भाज्यांचे सूप हे ऊर्जेचा उत्कृष्ट स्त्रोत बनू शकते.

**११) कर्करोगाचा प्रतिबंध** : एका अहवालानुसार सूपमुळे स्तनाचा कर्करोगाचा धोका कमी होतो. याशिवाय सूपचे सेवन केल्यास प्रोस्टेट आणि मेंदूच्या कर्करोगाचा धोकाही कमी होतो. लेखातील माहितीनुसार सूप पिणे फायद्याचे असले तरी यासंदर्भात आहार तज्ज्ञांचा अथवा डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. कारण काही लोकांना विशिष्ट फळभाज्या, पालेभाज्या याची ॲलर्जी असू शकते. तसेच काही लोकांना काही विशिष्ट पदार्थांची ॲलर्जीही असते. त्यामुळे ॲलर्जी असणारे पदार्थ वापरणे टाळावे. मात्र, या संदर्भात वैद्यकीय तज्ज्ञांकडूनच सल्ला घ्यावा.

(पांचजन्यवरून साभार)

## निसर्ग

# पौराणिक कालखंडातील महेंद्र पर्वत

भारतातील प्राचीन पर्वतांमध्ये महेंद्र पर्वताचा प्रामुख्याने समावेश होतो. हा दक्षिण भारतातील एक प्राचीन पर्वत आहे. प्राचीन भारतातील भूगोलवेत्त्यांनी पूर्व घाटाला 'महेंद्र पर्वत' अथवा महेंद्रगिरी म्हटल्याचे दिसून येते. याच्या विस्ताराविषयी मतभेद आढळतात. काही ग्रंथांतील वर्णनांनुसार याचा विस्तार ओडिशा राज्यातील गंजाम जिल्ह्यापासून दक्षिणेस मदुराई (तमिळनाडू राज्य) जिल्ह्यापर्यंत असावा, असे काही तज्ज्ञांचे मत आहे. ओडिशा राज्यातील महानदीचे खोरे आणि गंजाम पूर्व घाटाच्या टेकड्या अद्यापही 'महेंद्रमलई' किंवा महेंद्र टेकड्या या नावाने ओळखल्या जातात. यावरूनच या भागातील पूर्व घाटाच्या सर्वोच्च शिखराला 'महेंद्रगिरी' हे नाव दिले असावे. पुराणांत या पर्वताला 'महेंद्राचल', 'महेंद्राद्रि' अशीही नावे असल्याचे दिसून येते. अगस्त्य ऋषींनी या पर्वताची सागरात निर्मिती केली, असा रामायणात निर्देश आहे. श्रीरामाकडून पराभूत झाल्यानंतर परशुरामाने पर्वतावर येऊन वास्तव्य केल्याच्या अनेक पुराणकथा आहेत. कालिदासाच्या रघुवंशात हा पर्वत कलिंग देशात असल्याचा व कलिंग देशाचा राजा महेंद्राधिपती असल्याचा निर्देश आढळतो.



बाणाच्या हर्षचरितात महेंद्र पर्वत मलय पर्वताशी जोडलेला असल्याविषयीचा उल्लेख मिळतो. पार्जिटरच्या मते महानदी, गोदावरी, वैनगंगा या नद्यांदरम्यानचा प्रदेश अथवा विस्तारांने गोदावरीच्या उत्तरेकडील पूर्व घाटाचा प्रदेश म्हणजे प्राचीन पर्वत असावा.

महेंद्रगिरी हे पूर्व घाटातील सर्वोच्च शिखर ओडिशा राज्याच्या गंजाम जिल्ह्यात १८ओ ५८२ उ. अक्षांश व ८४ओ२४ पू. रेखांशावर, सस. पासून १,५०१ मी. उंचीवर आहे. दाट वनश्री आणि समुद्रसान्निध्य (सु. २५ किमी. अंतरावर) यांमुळे याचा परिसर निसर्गरम्य बनला आहे.

ब्रिटिशांच्या काळात महेंद्रगिरी हे कलकत्याचे आरोग्यधाम म्हणून विकसित करण्याची योजना आखण्यात आली होती. परंतु या टेकडीवजा शिखराच्या तीव्र उताराचा माथा आणि पाण्याचा तुटवडा यांमुळे ती योजना मागे पडली. येथून 'महेंद्रतनय' नावांचे दोन प्रवाह उगम पावतात. त्यांतील एक दक्षिणेस वंशधारा नदीस मिळतो, तर दुसरा बारूआ गावाजवळ बंगालच्या उपसागराला मिळतो.

या शिखरावर प्रचंड शिळांनी रचलेली अकराव्या शतकातील चार मंदिरे असून त्यांतील एक भग्नावस्थेत आहे. मंदिरात संस्कृत आणि तमिळ भाषांतील शिलालेख आहेत. 'चोल वंशीय राजा राजेंद्र याने आपला मेहुणा विमलादित्य याचा पराभव केल्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ या जंगलप्रदेशात उभारलेले हे विजयस्तंभ आहेत', असा उल्लेख त्या शिलालेखांतून आढळतो.

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# काँग्रेस व विरोधकांनी थयथयाट करू नये

देशात लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात, या दृष्टीने लोकसभेत विधेयक सादर करण्यात आले. यावर व्यापक चर्चा व्हावी, या हेतूने हे विधेयक व्यापक चर्चेसाठी तसेच सहमती तयार करण्यासाठी संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा घेण्यात आलेला निर्णय अभिनंदनीय आहे. देशात सर्व निवडणुका एकाच वेळी व्हाव्यात, याबाबत भारतीय जनता पार्टीने गांभीर्याने विचार सुरू केला होताच; शिवाय त्या दृष्टीने वेगाने पावलेदेखील टाकली, ही आनंदाची बाब होय. त्याचप्रमाणे या विचाराला देशातील सामान्य जनतेचाही पाठिंबा आहे. काही राजकीय पक्षांचा मात्र याला विरोध असल्याचे दिसत आहे. यात सगळ्यात जुना पक्ष काँग्रेसही समाविष्ट आहे. काँग्रेसला एक अनामिक भीती वाटते आहे. एकाच वेळी निवडणुका झाल्यात, तर त्याचा लाभ भारतीय जनता पार्टीलाच होईल, ही काँग्रेसला वाटत असलेली भीती आहे. पण, ही भीती व्यर्थ आहे. एकाच वेळी निवडणुका घेण्याचा फटका एखाद्या राज्यात वा अनेक राज्यांत भाजपालाही बसू शकतो. वेगवेगळ्या निवडणुका झाल्यास जसा फायदा भाजपाला होईल; त्याउलट एकाच वेळी झाल्यास तोटाही संभवतो. त्यामुळे काँग्रेसने केवळ भाजपाच्या भीतीने एकत्र निवडणुका घेण्यास विरोध करणे संयुक्तिक ठरणार नाही. एकत्र निवडणुका घेण्यास अनेक राजकीय विद्वान विरोध करीत आहेत. अखेर त्यांच्या विरोधाचे कारण तरी काय? त्यांना कसली भीती सतावत आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ अशा सलग चार वेळा देशात लोकसभेसोबतच राज्य विधानसभांच्याही निवडणुका झाल्या आहेत. त्यामुळे एकत्र निवडणुका घेण्याचा आता जो विचार केला जात आहे, तो लोकशाहीला वा संघराज्य प्रणालीला धोका आहे, असे समजण्याचे काही कारण नाही. शिवाय, एकत्र निवडणुका घेण्याचा हा काही क्रांतिकारक विचार नाही. गतकाळात जे शक्य झाले, तेच आताच्या काळात घडवून आणण्याचा सध्याच्या सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न आहे. १९६७ साली चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर बिहार, उत्तरप्रदेश, राजस्थान, पंजाब, पश्चिम बंगाल, ओडिशा, तामिळनाडू आणि केरळ या आठ राज्यांमध्ये काँग्रेसला बहुमत मिळाले नाही. त्यामुळे या आठ राज्यांमध्ये गैरकाँग्रेसी आघाडी सरकारे स्थापन झाली. तसे पाहिले तर, हे भारतीय लोकशाहीचे एक नवे स्वरूप होते. त्यामुळे काँग्रेसने घाबरण्याचे काही कारण नाही. जे त्यावेळी काँग्रेसच्या बाबतीत झाले, ते आता भाजपाच्याही बाबतीत होऊ शकते. भाजपालाच फायदा होईल, ही भीती काँग्रेसने बाळगणे आणि एकत्र निवडणुका घेण्यास विरोध करणे, याचा अर्थ लढाईपूर्वीच शस्त्र खाली टाकणे असा होतो. खरे तर १९६७ च्या निकालांनी विविध राज्यात गैरकाँग्रेसी राजकीय पक्षांना जागा करून दिली होती आणि ते लोकशाही जिवंत असल्याचे लक्षणही होते. त्यामुळे देशात प्रतिस्पर्धात्मक संघवादही सुरू झाला. केंद्रात काँग्रेसचे आणि राज्यांमध्ये गैरकाँग्रेसी सरकारे असली म्हणून देशाच्या सुरक्षेला कुठला धोका उत्पन्न होत नाही की देशाच्या प्रगतीलाही खीळ बसते, असे झाले नाही. पण, दुर्दैव असे की, आघाडीत जे घटक पक्ष सहभागी झाले होते, त्यांच्यात आपसात समन्वय न राहिल्याने ही गैरकाँग्रेसी सरकारं अस्थिरतेचे बळी ठरली. परिणाम असा झाला की, देशात मध्यावधी निवडणुकांचे सत्र सुरू झाले आणि मग लोकसभेची निवडणूक वेगळी आणि विविध राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुका वेगळ्या व्हायला लागल्या. तसे पाहिले तर, १९५२ साली जेव्हा देशात पहिल्यांदा सार्वत्रिक निवडणुका झाल्या, तेव्हा तर आजच्यासारख्या आधुनिक सुविधा नव्हत्या, आजच्यासारखी आधुनिक उपकरणे नव्हती, संसाधनांचा अभाव होता. तरीही निवडणुका यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्या. असे असताना एकत्र निवडणुका घेण्याच्या व्यावहारिकतेवर प्रश्न उपस्थित करण्याचे तसे काहीच कारण नाही. आज तर निवडणूक आयोगाकडे भरपूर अनुभव आहे. संसाधनांची कमतरता नाही, तंत्रज्ञानाची उपलब्धता आहे. त्यामुळे एकत्र निवडणुका घेताना कुठल्याही अडचणी येतील, असे वाटत नाही. देशाला स्वातंत्र्य मिळून आता ७६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ७६ वर्षांत मतदार हा परिपक्व झाला आहे. विवेकाचा वापर करून तो मतदान करू लागला आहे. त्याच्या विवेकावर आणि परिपक्वतेवर काँग्रेसला विश्वास नसावा कदाचित. म्हणूनच काँग्रेसला एकत्र निवडणुका घेतल्यास त्याचा फायदा भाजपाला होईल, अशी भीती वाटते. एक मात्र खरे की, एखाद्या राज्यात आघाडीचे सरकार आले आणि ते मध्येच कोसळले तर तिथे मध्यावधी निवडणूक घ्यावी लागेल. अशी परिस्थिती अनेक राज्यांत उद्भवू शकते. या बाबीचा विचार करून कायमस्वरूपी तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. समजा आता एकत्र निवडणुका झाल्यात, तर त्या भविष्यातही एकत्रच झाल्या पाहिजेत, या दृष्टीने आताच ठोस विचार करून उपाय करून ठेवणे आवश्यक आहे. समजा अशी परिस्थिती उद्भवली की, पंतप्रधान वा राज्याच्या मुख्यमंत्र्याने राजीनामा दिला वा विरोधकांनी आणलेला अविश्वास प्रस्ताव पारित झाला आणि लोकसभा वा विधानसभा विसर्जित करण्याचा सल्ला देण्यात आला तर काय होईल? एखाद्या राज्यात कलम ३५६ चा वापर करून राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आणि विधानसभा बरखास्त करण्याची शिफारस करण्यात आली तर? तर काय, लोकसभा वा विधानसभा बरखास्त करण्याची घटनेतील तरतूदच मध्यावधी निवडणुकीकडे घेऊन जाईल. मग एकत्र निवडणुका घेण्याचा मार्ग अवरुद्ध होईल. अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी आपल्याला राज्यघटनेतील अनुच्छेद ८५(२)ख आणि अनुच्छेद १७४(२)ख यात दुरुस्ती करून 'बरखास्त' या शब्दाऐवजी 'निलंबन' हा शब्द टाकावा लागेल. अशी दुरुस्ती जर करण्यात आली तर राष्ट्रपती लोकसभा आणि राज्यपाल विधानसभा बरखास्त करू शकणार नाहीत. ते पुढील व्यवस्था होईपर्यंत सभागृह निलंबित अवस्थेत ठेवतील. विधानसभा निलंबित अवस्थेत ठेवल्याची अनेक उदाहरणे देशात आहेत. जानेवारी २०१० मध्ये जम्मू-काश्मीर, डिसेंबर २०१३ मध्ये दिल्ली आणि जानेवारी २०१६ मध्ये अरुणाचल प्रदेशची विधानसभा निलंबित ठेवण्यात आली होती. लोकसभा वा विधानसभा निलंबित अवस्थेत ठेवण्यात आली असता, जो राजकीय पेच निर्माण झाला आहे, त्यावर विविध पक्ष चर्चा करून तोडगा काढतील आणि नवे सरकार बनविण्याच्या दृष्टीने फॉर्म्युला तयार करतील. विधानसभा निलंबित असल्याने तसा वेळही या पक्षांना मिळेल. आपसात ताळमेळ साधून राजकीय पक्ष समझोता करू शकतील आणि नव्या सरकारची मुहूर्तमेढही रोवू शकतील. असे झाले तर मध्यावधी निवडणुका होणार नाहीत, सरकारचा पैसा खर्च होणार नाही आणि जनतेचा वेळही वाया जाणार नाही. एखाद्या राज्यात ३५६ व्या कलमाचा वापर करून राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा राज्यपालांचा अधिकार घटनेतील दुरुस्तीमुळे मर्यादित येईल, राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या निर्णयामुळे केंद्र आणि राज्य यांच्यात जो वाद उत्पन्न होत होता, तोही होणार नाही. लोकसभा वा विधानसभा बरखास्त करण्याबाबतचा उल्लेख घटनेत ज्या ज्या ठिकाणी आहे, त्या सर्व ठिकाणीही आवश्यक त्या दुरुस्त्या कराव्या लागतील. याचा फायदा असा होईल की, लोकसभा वा विधानसभांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होईल. त्या मुदतीपूर्वी बरखास्त होणार नाहीत. असे झाले तर मध्यावधी निवडणुकांचा प्रश्नच उपस्थित होणार नाही. शिवाय, एकत्र निवडणुका घेण्याचा क्रमही चुकणार नाही. ही बाब लक्षात घेतली तर काँग्रेसला वाटत असलेली भीती निरर्थक आहे. काँग्रेसने कारण नसताना देशात संभ्रम निर्माण करू नये. काँग्रेस आणि अन्य विरोधकांनी व्यापक देशहित, जनहित लक्षात घेऊन 'एक देश एक निवडणूक' बाबतच्या विधेयकाला पाठिंबा दिला पाहिजे. न दिला तरी मोदी सरकारने ठरविलेले उद्दिष्ट साध्य होणारच आहे, हे निश्चित! त्यामुळे मोदी सरकारचा हेतू प्रामाणिक असल्याने काँग्रेस आणि इतर विरोधकांनी कितीही थयथयाट केला तरी विधेयक पारित होणार आणि देशहित सर्वोपरी ठरणार, यात शंका नाही.

## दखल

**आरिफ शेख**

# युद्धाचे ढग काही विरेनात...

लेबनॉन आणि इस्रायलमध्ये दीर्घकाळ चाललेल्या तणावानंतर अखेर युद्धविराम झाला. लेबनीज सरकारने या कराराला मान्यता दिली आणि त्याला 'हिजबुल्लाह'सह सर्व लेबनीज गटांची संमती मिळाली. इस्रायलच्या मंत्रिमंडळानेही २६ नोव्हेंबर रोजी या युद्धविरामाला मंजुरी दिली पण युद्धबंदीच्या २४ तासांमध्ये इस्रायल आणि लेबनॉनमधील तणाव पुन्हा वाढला. इस्रायलने २८ नोव्हेंबर रोजी दक्षिण लेबनॉनमध्ये 'हिजबुल्लाह'ने वापरलेल्या लाँचरवर हवाई हल्ला केला. इस्रायलकडून या हल्ल्यात कोणतीही जीवित हानी झाली नाही. दक्षिण लेबनॉनच्या काही भागात परतण्याचा प्रयत्न करणाऱ्या लोकांवर गोळीबार केल्याचे इस्रायली लष्कराने सांगितले. इस्रायलचे म्हणणे आहे की, हे लोक युद्धविराम कराराचे उल्लंघन करत होते; मात्र याबाबत फारशी माहिती देण्यात आली नाही. माध्यमांनी सांगितले की, या हल्ल्यात दोन नागरिक जखमी झाले तर इस्रायली सैन्याने त्यांचे वर्णन संशयित म्हणून केले. ते युद्धविरामाच्या अटींचे उल्लंघन करत होते. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेसात वाजता इस्रायल आणि लेबनॉनमध्ये युद्धविराम लागू झाला. यानंतर लेबनीज आर्मीवर अनेकदा युद्धविराम तोडल्याचा आरोप करण्यात आला. युद्धबंदी किती नाजूक आहे, हे या आरोप-प्रत्यारोपांवरून स्पष्ट होते.

युद्धबंदीनंतर दोन्ही देशांमधील हिंसाचाराची पातळी लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. लेबनॉनने ऑक्टोबर २०२३ मध्ये हिंसाचार सुरू केला. हमासने गाझामधून हल्ला केल्यानंतर 'हिजबुल्लाह'ने इस्रायलवर रॉकेट, ड्रोन आणि मिसाईल डागण्यास सुरुवात केली. इस्रायलने हवाई हल्ले करून प्रत्युत्तर दिले आणि नंतर सप्टेंबरच्या मध्यात युद्ध मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. गाझामधील युद्ध अजूनही सुरू आहे आणि त्याचा शेवट दृष्टिपथात नाही. लेबनीज आरोग्य अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, संघर्षादरम्यान इस्रायली गोळीबारात लेबनॉनमध्ये ३७६० हून अधिक लोक मारले गेले. या लढाईमध्ये इस्रायलमधील ७० हून अधिक लोक मारले गेले. त्यापैकी अर्ध्याहून अधिक नागरिक होते तसेच दक्षिण लेबनॉनमध्ये लढणारे डझनभर इस्रायली सैनिक होते. नेतान्याहू यांनी युद्धबंदीची तीन कारणे दिली आहेत. इराणवर लक्ष केंद्रित करणे, इस्रायली सैन्याला श्वास घेण्यास आणि साठा भरून काढण्यासाठी वेळ देणे आणि हमास-हिजबुल्लाहला वेगळे करणे. म्हणजे युद्धातून एक आघाडी काढून टाकणे. किंबहुना, हमासचा दहशतवादी हल्ला आणि इस्रायलने गाझावर बॉम्बफेक केल्यानंतर अवघ्या काही दिवसांनी 'हिजबुल्लाह'ने आघाडी उघडली होती. याशिवाय इस्रायलवर आंतरराष्ट्रीय दबाव वाढत आहे. संयुक्त राष्ट्राने इस्रायलच्या हल्ल्यांना नरसंहार म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने इस्रायलला ताब्यात घेतलेल्या प्रदेशातून माघार घेण्याचे आवाहन केले आहे आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाने नेतान्याहूविरुद्ध अटक वॉरंट जारी केले आहे; असे असतानाही इस्रायलने गाझामध्ये आपल्या कारवाया सुरूच ठेवल्या आहेत. देशात गृहयुद्धाचे पुनरागमन फारसे दूरचे नाही. लेबनॉनमध्ये विविध गटांमध्ये तणाव आणि संघर्षाची परिस्थिती आहे. 'हिजबुल्लाह' कमकुवत झाली आहे आणि आता लेबनीज राजकारणात आपली ताकद पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू शकते. इस्रायलच्या हल्ल्यापूर्वी लेबनॉनमधील कोणताही गट 'हिजबुल्लाह'ला आव्हान देण्याच्या स्थितीत नव्हता; पण आता परिस्थिती बदलली आहे. 'हिजबुल्लाह'ची लष्करी शक्ती कमकुवत झाली असून त्याचा नेता नसराल्लाह मारला गेला आहे. लेबनॉनमध्ये दोन वर्षांपासून अध्यक्ष नाही. नवीन राष्ट्रपतींची नियुक्ती त्यांच्या मित्रपक्ष असण्याच्या अटीवर केली होती. आता लेबनॉनच्या नेत्यांनी नवीन अध्यक्षाच्या नावावर सहमती दर्शविली पाहिजे, जो नवीन पंतप्रधान आणि सरकार नियुक्त करेल. कमकुवत झालेल्या 'हिजबुल्लाह'सोबत हे कसे घडेल हे पाहणे बाकी आहे.

दरम्यान, रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाने नवे वळण घेतले आहे. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी युक्रेनच्या मित्रराष्ट्रांना एक इशारा दिला आहे. युक्रेनला अण्वस्त्रे मिळाल्यास त्याचे प्रत्युत्तर अत्यंत विनाशकारी असेल, असे रशियाने स्पष्ट केले आहे. पुतिन यांच्या योजनेनुसार लंडन, बर्लिन, पॅरिस आणि रोम यासारख्या युरोपियन राजधान्यांवर हल्ले केले जातील. स्वीडन, फिनलंड, पोलंड आणि नेदरलँड यांसारख्या देशांवरही भयंकर हल्ल्यांची योजना आखण्यात आली आहे. पुतिन यांनी पारंपरिक अण्वस्त्रांच्या पलीकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेल्या शस्त्रांचा उल्लेख केला आहे; ज्यात हायपरसोनिक क्षेपणास्त्रे, गुप्त लढाऊ विमाने, लांब पल्ल्याचे ड्रोन, थर्मल रेडिएशन शस्त्रे यांचा समावेश आहे.

पुतिन यांच्या इशाऱ्यानंतर 'नाटो' देशांमध्ये घबराट पसरली आहे. अमेरिकेने युद्धक्षेत्रात 'मिनिटमॅन-३' क्षेपणास्त्र सक्रिय केले आहे. जर्मनी आणि पोलंडमध्ये संरक्षण यंत्रणा कार्यान्वित होत आहेत. अमेरिकेने आपली अण्वस्त्रे अपग्रेड करण्यासाठी १३८ अब्ज डॉलर (११ लाख कोटी रुपये) पेक्षा जास्त बजेट मंजूर केले आहे. अलिकडेच रशियाने युक्रेनवर आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला करून त्या देशाचा वीज पुरवठा खंडित केला. या हल्ल्यांमध्ये रशियाने ९१ क्षेपणास्त्रे आणि ९७ ड्रोन्सचा वापर केला. युक्रेनच्या ऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांना लक्ष्य करणाऱ्या या हल्ल्यानंतर १० लाखांहून अधिक लोकांना अंधारात राहणे भाग पडले. रशियाने या हल्ल्याचे वर्णन युक्रेनने अमेरिकन 'एटीएसीएमएस' क्षेपणास्त्रांच्या वापरास प्रत्युत्तर म्हणून केले आहे. ही बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे लांब पल्ल्याच्या हल्ल्यासाठी सक्षम आहेत. अलिकडेच युक्रेनने रशियन प्रदेशांवर हल्ला करण्यासाठी त्यांचा वापर केला होता. पुतिन यांनी या हल्ल्यांना 'पाश्चात्त्य शस्त्रांचा धोकादायक वापर' म्हटले आणि रशिया जोरदार प्रत्युत्तर देईल असे सांगितले. हल्ल्यापूर्वी पुतिन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, रशिया युक्रेनच्या 'निर्णय केंद्रांवर' आणि कीव्हवर नवीन हायपरसॉनिक क्षेपणास्त्रांचा वापर करण्याचा विचार करू शकतो. रशियाने युक्रेनचे ऊर्जा ग्रीड आणि इंधन साठवण सुविधांवर हल्ला केल्यानंतर काही तासांमध्येच ही धमकी आली आहे. रशियन हल्ल्यांनंतर युक्रेनचे अध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांनी 'नाटो'चे सरचिटणीस, ब्रिटिश पंतप्रधान स्टार्मर आणि जर्मन चान्सलर ओलाफ स्कोल्झ यांच्यासह अनेक पाश्चात्त्य नेत्यांना मदतीचे आवाहन केले. आमच्या ऊर्जा पायाभूत सुविधांवर हा केवळ युक्रेनवरील हल्ला नाही तर संपूर्ण जगाच्या शांतता प्रयत्नांवर आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये जवळपास तीन वर्षांपासून सुरू असलेल्या युद्धाचे रूपांतर आता नव्या आणि घातक शस्त्रांच्या शर्यतीत झाले आहे. युक्रेन पाश्चात्त्य शस्त्रांचा वापर करत असल्याचा दावा रशियाने केला आहे.

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# बदल्या, बदलाही होऊ नये!

सरकारी नोकरी लागणे म्हणजे आयुष्यात सर्वात मोठी कमाई किंवा तीर मारल्याचा आनंद नोकरी लागणाऱ्या उमेदवाराला आणि कुटुंबीयांना होतो. त्यामागे सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे सातव्या वेतन आयोगातील वेतन! सरकारी सुट्या याशिवाय वाटेल तेव्हा सुटी घेण्याचा अधिकृत परवानाच! सरकारी नोकरी म्हणजे 'सरकारचे जावई' असा शब्दप्रयोग सर्वत्र केला जातो. केंद्र आणि राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी सामान्य नागरिकांची सारखी भावना आहे. यात स्टेट बँक ऑफ इंडियातील कर्मचारी सर्वात पहिल्या क्रमांकावर आहेत. केंद्र सरकारची रेल्वे, पोस्ट ही खातेही सामान्य नागरिकांना डोकेदुखी ठरते. महाराष्ट्राचा विचार केल्यास जिल्हा परिषदेचे शिक्षक हा काही वर्षांपर्यंत सर्वात सुखी प्राणी होता. मध्यंतरीच्या काळात त्यांनी उपभोगलेले सुख सरकारी यंत्रणेच्या लक्षात आल्याने आता त्यांच्या मागे शिक्षणेत्तर कामं लावण्यात आली. आजही राज्यात अनेक शाळा दोन शिक्षकी आहेत. त्यापैकी एक शिक्षक चार दिवस आणि दुसरा शिक्षक उर्वरित दिवस वरिष्ठ अधिकाऱ्यांना सुगावाही लागू न देता अतिशय प्रामाणिकपणे काम करताना दिसून येतात. दहावी-बारावीत 'मेरिट' आलेल्यांपैकी ज्यांना डॉक्टर व्हायचे आहे, ते त्यावेळी समाजसेवा, गरिबांची सेवा करण्यासाठी डॉक्टर होण्याची इच्छा असल्याचे दाबून सांगतात. मात्र, शासकीय ग्रामीण रुग्णालयात जाण्यासाठी डॉक्टर मिळत नाहीत अशी वास्तविकता आहे. वैद्यकीय प्रवेश मिळविण्यापूर्वीचे समाजसेवेची इच्छा, पदवी-पदविका घेताना घेतलेली प्रतिज्ञा शासकीय नोकरीत रुजू होताच हवेत विरलेली असते. महात्मा गांधींनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. खेड्यांचा विकास झाला पाहिजे, असे प्रत्येकाला वाटते. परंतु, गावखेड्यात असलेल्या अपुऱ्या सेवा-सुविधा लक्षात घेताना अपवाद वगळता कोणताही शासकीय कर्मचारी नियुक्त केलेल्या गावात राहत नाही. तरीही घरभाडे भत्ता घेतल्याशिवाय राहत नाहीत. याशिवाय खाजगी कर्मचारी, अधिकाऱ्यांच्या तुलनेत दुप्पट वेतन घेणारे शासकीय कर्मचारी, अधिकारी (पोलिस सोडून) कुठल्या ना कुठल्या मागणीसाठी (वेतन-भत्त्यांसह) आंदोलन करताना दिसतात. खाजगी कर्मचाऱ्यांच्या तुलनेत शासकीय कर्मचाऱ्यांना कामाचा ताण फारच कमी असतो. मात्र, सेवा देताना शासकीय कर्मचारी किती टाळता येईल, किती झटकता येईल यासाठी काटोकाट प्रयत्न करताना दिसून येतात. अतिमहत्त्वाच्या सरकारी अधिकाऱ्यांचा थेट नागरिकांसोबत संपर्क येऊ नये यासाठी 'शासकीय क्वार्टर'ची संकल्पना राबविण्यात येते. त्यानंतर कामांच्या बाबतीत काही गोष्टींमध्ये होत असलेला कानाडोळा लक्षात घेताना जवळपास तीन वर्षांनी बदल्या केल्या जातात. मात्र, आपल्या सोयीचे गाव असल्यास बदली रद्द कशी करता येईल, यासाठी फिल्डिंग लावल्या जाते. ती फिल्डिंग कितीही अर्थपूर्ण असली, तरी त्या पायरीवर चढण्यात मागेपुढे पाहत नाहीत. काही शासकीय कर्मचारी ज्या गावात लागतात ते सेवानिवृत्तही त्याच गावात होतात. फक्त गावातल्या गावात टेबल बदलण्याची कलाही शासकीय कर्मचाऱ्यांनी साधलेली असते. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, मुख्य कार्यपालन अधिकारी, उपमुख्य कार्यपालन अधिकारी एकंदरीत आयएएस, आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या जर तीन वर्षांत होत असतील तर अन्य शासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या का होत नाहीत? सध्या सुरू असलेल्या नागपुरातील हिवाळी अधिवेशनात बरेच निर्णय चांगले होत आहेत. त्यातला सामान्य नागरिकांना थेट फायद्याचा नसला तरी केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यातही बदलीचे धोरण राबविण्यात येईल, असे संकेत मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले. बदलीनंतर नेमणुकीच्या ठिकाणी न राहणारे शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांचा वैद्यकीय भत्ता बंद करण्याचा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या संघटना आंदोलनं करण्यासाठी तत्पर राहत असल्याने राज्य सरकारच्या विरोधात आंदोलनं न झाल्यास आश्चर्य वाटायला नको. वर्धेसारख्या जिल्हा ठिकाणावरही नागपूर येथून अपटाऊन करणारे अधिकारी-कर्मचारी आहेत. त्यामुळे रेल्वेच्या टाईम-टेबलवर वर्धेतील शासकीय कार्यालयं चालतात. वर्धेतील जिल्हा सामान्य रुग्णालयाला तर रुग्ण रेफरचा किडाच चावला आहे. अनेक डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करतात. ही परिस्थिती वर्धेतीलच नव्हे तर अख्ख्या महाराष्ट्रातील आहे. शासकीय प्रथम श्रेणी अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात तर अन्य कर्मचाऱ्यांनाही तो नियम लागू व्हावा. शासकीय कर्तव्यात कसूर केल्यासही त्याला बदलीची शिक्षा दिली जावी. बऱ्याचदा 'बदला' म्हणूनही बदली होत असल्याच्या घटनाही आम्ही बघतो. त्यामुळे बदल्या व्हाव्याच; पण बदल्यासाठी नको! शासकीय अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी राहणे म्हणजे गावखेड्यातील नागरिकांना दिलासाच होणार आहे.

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# फडणवीस यांचे पोलादी नेतृत्व पुन्हा सिद्ध

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुतीचे सरकार राज्यात सत्तेत आले. नंतर बरेच काही घडतं-बिघडतंय. राजकारण तर बदलले आहेच; पण नवनवी समीकरणंही पुढे येत आहेत. नवनव्या भेटीगाठी पडताहेत. काकाचा पक्ष फोडल्यानंतर तिकडे अजिबात न फिरकलेले अजित पवार त्यांच्या दर्शनाला सहकुटुंब जाऊन आले. त्यातून काका-पुतण्या एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली. निवडणुकीच्या रणधुमाळीत 'तू राहशील नाहीतर मी राहीन' अशा भाषेत ललकारणाऱ्या उद्धव ठाकरे यांना पुष्पगुच्छ घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीला नागपूरला यावं लागलं. तिकडे दिल्लीत शरद पवार पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटले. साहित्य संमेलनाच्या कार्यक्रमाचे आमंत्रण देण्यासाठी ही भेट होती, असे सांगितले गेले. पण साहित्यापलीकडे काही झाले नसेल असा दावा करता येणार नाही. मंत्रिमंडळ विस्तारानंतर तर अनेकांनी नाराजीचे झेंडे फडकावले. राष्ट्रवादीच्या अजितदादा पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्या बंडाची सर्वाधिक चर्चा आहे. पहिल्या दिवशी अधिवेशनाला दांडी मारून भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी थोडी हवा गरम केली होती. मात्र 'आपण नाराज नाही' हे त्यांना लगेच सांगावे लागले. मंत्रिमंडळातून वगळले म्हणून छगन भुजबळ, तानाजी सावंत गावाला निघून जातात. मात्र, भाजपाचे थोडेथोडके नव्हे, तर तब्बल १३२ आमदार शिस्तीत राहतात. फडणवीस यांची आपल्या पक्षावर आणि एकूणच महायुतीवर किती पकड आहे, याचा हा नमुना आहे.

सहसा घराबाहेर न पडणारे 'शिल्लक शिवसेने'चे सुप्रीमो उद्धव ठाकरे मुंबई सोडून नागपूरला आले. विधानभवनात त्यांनी घेतलेली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट अनेकांना चकित करून गेली. फडणवीसांना 'टरबूज', 'कलंक', फडतूस' काय काय नाही बोलले. तब्बल पाच वर्षे गोटमार करणारे उद्धव ठाकरे चक्क फुलं घेऊन आले तेव्हा फडणवीस यांनी स्वतःला चिमटा काढला असणार. आता ते आले म्हणजे लगेच घरवापसी होईल असे नाही. पण हे कट्टर राजकीय वैरी एकमेकांना भेटू शकतात ही घटना भविष्यातल्या संभाव्य उलथापालथीची नांदी असू शकते. उद्धव साधुसंत नाहीत. पक्के धूर्त राजकारणी आहेत. एकनाथ शिंदे अडीच वर्षांपूर्वी शिवसेना फोडून मुख्यमंत्री झाले होते. शिंदेंची तेव्हा मुख्यमंत्री म्हणून सदिच्छा भेट घ्यावी, असे उद्धव यांना वाटले नाही. आता त्यांना महाराष्ट्राची संस्कृती आठवली. गरज म्हणून ते धावले. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनाही भेटले. विधानसभेतले विरोधी पक्षनेतेपद त्यांच्या पक्षाला हवे आहे. अर्थात याचा निर्णय नार्वेकर यांना करायचा आहे. या निमित्ताने का होईना, उद्धव झुकले, हेही नसे थोडके. पाच वर्षांपूर्वी मोठ्या आशेने उद्धव शरद पवारांकडे गेले. अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद सोडले तर त्यांच्या हाती काही लागले नाही. पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले, ४० आमदार सोडून गेले. एका 'हिरव्या रंगाने' घात केला. आता त्यांच्याकडे देण्यासाठी काही नाही. महाविकास आघाडीची पुंगीही मोडल्यात जमा आहे. मनसेने मतं खाल्ली म्हणून २० जागा तरी मिळाल्या. अन्यथा एका आकड्यात उद्धव सेना संपली असती. हे २० आमदारही किती काळ



उद्धवकडे टिकतात ते पाहायचे. आता पुढची पाच वर्षे मोठ्या निवडणुका नाहीत. सत्तेशिवाय हे आमदार टिकतील? चार-सहा महिन्यांनी महापालिकेच्या निवडणुका आहेत. यावेळी मुंबई महापालिका हातची गेली तर उद्धव संपले. कडवे हिंदुत्वच आपल्याला वाचवू शकते, हे लक्षात आल्याने उद्धव यांचा सूर बदलला आहे. फडणवीस आता त्यांना 'सफरचंद' वाटायला लागले आहेत. दादरमधल्या हनुमान मंदिरात आरतीसाठी आदित्य ठाकरे धावले ते त्यापोटीच; पण खूप उशीर झाला. २०२९ च्या निवडणुकीत 'शत-प्रतिशत भाजपा' हे मोदी-शाह यांचे टार्गेट आहे. भाजपाला तशीही आता गरज नाही. प्रचंड बहुमत आहे महायुतीकडे. ठाकरेंना जवळ घेतले तर एकनाथ शिंदे यांचे आमदार बिथरतील. त्यामुळे फडणवीस नवी डोकेदुखी विकत घेणार नाहीत. फडणवीसांना चक्रव्यूहात अडकवू पाहणारे महाविकास आघाडीचे नेते आज स्वतःच चक्रव्यूहात सापडले आहेत.

मंत्रिमंडळाचा विस्तार हे कुठल्याही मुख्यमंत्र्याला आव्हान असते. यावेळी तर अभूतपूर्व परिस्थिती होती. सत्ता बाकांवर महायुतीचे २०० पेक्षा जास्त आमदार आहेत. एकट्या भाजपाचेच १३२ आमदार निवडून आले आहेत. मंत्रिपदं आहेत फक्त ४३. तीन पक्षात ती वाटणं म्हणजे मोठे ऑपरेशन. प्रत्येक आमदाराला मंत्री व्हायचंय. अडीच-अडीच वर्षांचा मंत्री असा व्यवहारी मार्ग अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी शोधला आहे. पण त्यातूनही किती जणांचे समाधान होणार? महायुतीकडे २३४ आमदार आहेत. भाजपामधले तर मोठे अवघड बाळंतपण होते. फडणवीसांनी मोठ्या कुशलतेने ते पार पडले. तरीही काहींनी नाराजी दाखवलीच. अमित शाहांकडे प्रत्येकाची कुंडली आहे. त्यामुळे कुणी फार गडबड करणार नाही. नव्या चेहऱ्यांना संधी द्यायची तर काही जुने चेहरे कापणे भाग आहे. यावेळी मंत्रिमंडळ बनवताना खुद्द अमित शाह यांनी लक्ष घातले. राजी-नाराजी पत्करून श्रेष्ठींनी सरकार दिले आहे. ज्यांना तिकिटं नाकारली त्यातल्या काहींना पक्ष वेगळ्या जबाबदारी देणार, असे खुद्द फडणवीस यांनी म्हटले आहे. आधीच्या सरकारमधील बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांना यावेळी वगळले आहे. चव्हाण यांना भाजपाचे प्रदेशाध्यक्ष केले जाईल, असे संकेत मिळत आहेत. चव्हाण यांना फडणवीसांचे 'हनुमान' म्हटले जाते. संघ परिवारातले चव्हाण हे डोंबिवलीचे आमदार आहेत. त्या हिशोबाने कोकणी मतदार ओढण्याचे भाजपाचे टार्गेट आहे. विद्यमान अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना मंत्रिमंडळात घेतले आहे. नागपूरचे बावनकुळे सरकारमध्ये चौथ्या क्रमांकाचे मंत्री आहेत, ही गोष्ट विदर्भासाठी अभिमानाची राहणार आहे. या आधीच्या २०१४ च्या सरकारमध्ये बावनकुळे ऊर्जामंत्री होते. मागच्या निवडणुकीत त्यांचे तिकीट कापले गेले. तरीही त्यांनी काम सुरू ठेवले. त्याचे बक्षीस त्यांना मिळाले आहे. २०१९ मध्ये कापल्या गेलेल्या बावनकुळेंनी यावेळी भाजपाची तिकिटे वाटली. नेत्यांमध्ये संयम असेल तर त्याची बक्षिसी भाजपामध्ये मिळते, याचे बावनकुळे हे उत्तम उदाहरण आहे. वादग्रस्त तसेच कलंकित नेत्यांना यावेळी मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आहे. महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी ही काळजी घेतली हे विशेष. यवतमाळचे संजय राठोड वाचले. बंजारा समाज फॅक्टर मदतीला आला. भाजपाच्या वाट्याला आलेल्या मंत्रिपदी झालेल्या नियुक्त्यांवर फडणवीस यांची स्पष्ट छाप दिसते. असे असले, तरी फडणवीसांच्याच मर्जीतले प्रवीण दरेकर, संजय कुटे, गोपीचंद पडळकर, रवी राणा बाहेर आहेत, हे देखील वास्तव आहे. मंत्रिमंडळात भाजपाचे २०, शिंदे सेनेचे १२ आणि अजितदादांच्या राष्ट्रवादीचे १० मंत्री आहेत. म्हणजे आता कोणाला घ्यायचे झाले तर फक्त एकाला घेता येते. बाकी मंत्रिमंडळ हाऊसफुल्ल आहे. जुन्या-नव्याचा समतोल साधताना ज्येष्ठ ओबीसी नेते छगन भुजबळ यांना वगळले आहे. भुजबळांनी हा मुद्दा बनवला आहे. ओबीसींवर हा अन्याय आहे, असे सांगितले जात आहे. मात्र, ओबीसी म्हणजे केवळ एक भुजबळ नाहीत. इतरही ओबीसी नेते मंत्रिमंडळात घेतले आहेत. आपले अवतारकार्य संपले हे भुजबळांनी समजून घेतले पाहिजे. भुजबळ आज ७७ वर्षांचे आहेत. भाजपामध्ये या वयातल्या नेत्याला 'मार्गदर्शक मंडळात' म्हणजे पेन्शनीत टाकले जाते. राष्ट्रवादी म्हणजे शरद पवारांकडे आहेत म्हणून एवढी ठाकूरकी चालली. आता अजितदादांचा जमाना आहे. दादा नाही तर त्यांना घेणार कोण? भाजपा घेणार नाही. कारण युतीधर्म. उद्धव ठाकरे यांची लहर भुजबळांना परवडणारी नाही. उरली काँग्रेस. भुजबळ काँग्रेसमध्ये जाणार नाहीत. त्यापेक्षा त्यांनी रिटायर होणे त्यांचा प्रतिष्ठेला शोभेसे होईल. अडचण तीच आहे. भुजबळच नव्हे तर शरद पवारही आपण म्हातारे झाल्याचे मानायला तयार नाहीत. त्यांना अजूनही वाटते... 'लोक माझे सांगाती!'

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### जागतिक घडामोडींमागील सूत्रधार (डीप स्टेट)

आपल्याला दिसणाऱ्या घटना त्यामागील सूत्रं अन् सूत्रधार अनुक्रमे काय अन् कोण असेल हा प्रश्न मनात येत असतो; पण आपण दुर्लक्ष करतो. कारण ते आपल्या सर्वसामान्य माणसाच्या आवाक्यातील गोष्ट नसते. पण होणारे परिणाम पटल्यावर परत मनात विचार येतो अन् परत आपण दुर्लक्ष करीत राहतो. जागतिक सूत्रधारांचा कोणताही देश नसतो. अधिपत्य अन् अर्थकारण हाच त्यांचा देश असतो. अगदी अमेरिका, इंग्लंड, जर्मनी त्यांचे आर्थिक अधिपत्याखाली येतात. या सर्वांना ते नियंत्रित करतात. त्या देशाच्या कारभारात महत्त्वाच्या ठिकाणी आपले छुपे लोक बसवून किंवा जगभरातल्या राष्ट्रांत वाद लावणे, युद्धजन्य परिस्थिती निर्माण करणे, आपली शस्त्रे विकण्यास मागणी मिळेल, त्यातचं भविष्यातील आर्थिक समीकरणांची पायाभरणी करून अनेक राष्ट्रांना कर्जाच्या खाईत लोटून किंवा तख्तापलट (शेजारील इस्लामी बांग्लादेश) करून विकासाला खीळ बसेल, अशी कारस्थानं रचून पाहिजे ते करून घेण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून त्यांचे आपल्यावर अवलंबित्व अबाधित राहील. सर्वकाही कायमस्वरूपी आपल्या ताब्यात राहील अशी तरतूद करणे, तिला पोसण वारंवार चालू राहील यावरच भर देणे. हे भयानक वास्तव आहे आणि आपण सर्व त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष, कळत-नकळत भाग किंवा सोशिक बनत असतो आणि आहोत; पण आपल्याला त्याचा विचार तर सोडा; अंदाजही लावता येत नाही. अन्य देशाच्या राजकारणात परदेशी हस्तक्षेप, देशात चुकीची माहिती पसरवणे, नागरिकांमध्ये गैरसमज, संभ्रम पसरवणे, पाळत ठेवणे, शैक्षणिक संस्थात आपली माणसं स्थापित करून इतिहासात छेडछाड आणि संस्कृतीवर अतिक्रमण, कला आणि मनोरंजनाच्या नावाखाली तरुण पिढी बरबाद करणे, वैचारिक चळवळीच्या नावाखाली पर्यावरण आणि हवामान बदल धोरण ही कारणे दाखवून चळवळी करून उद्योग धंदे प्रगतीला खीळ घालणे, दडपशाही इत्यादी. गेल्या तीन दशकांवर नजर टाकली तरी अशी सगळी परिस्थिती असल्याचे जाणवते.

**गणेश शेवते**/१०९६१५२९४९

## वाचक पत्रे

### ईव्हीएम बॅन; बॅलेट पेपरवर ऑन, किती सयुक्तिक?

महाराष्ट्रातील पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडून आघाडीतील घटक पक्ष आपापली जबाबदारी झटकू पाहात आहेत. सोलापूर-मारकवाडी येथील ईव्हीएमविरोधात चाललेल्या आंदोलनाला शरद पवार यांनी भेट देऊन निवडणूक पद्धतीमध्ये बदल करण्याची गरज व्यक्त केली. मारकवाडीच्या आंदोलनामुळे ईव्हीएमविरोधात देश पेटत आहे. असे वक्तव्य करून महाराष्ट्र निवडणूक आयोगाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. याबाबत सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करून आपली हौस भागवून घेत आहेत. यामुळे निवडणूक कार्य प्रणालीची बदनामी होते आहे. खरे तर विरोधक ईव्हीएमबाबतचे ठोस पुरावे सुप्रीम कोर्टात सादर करू शकलेले नाहीत. विरोधकांचा निवडणुकीत पराभव झाला की त्यांना ईव्हीएम दोषी आहे असे कां वाटावे, असा प्रश्न सुप्रीम कोर्टाला पडलेला आहे. तेलंगणा, आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, कर्नाटक, झारखंड, पंजाब, जम्मू-काश्मीर व महाराष्ट्रात नुकत्याच ईव्हीएमवर निवडणुका लढवल्या गेल्या आहेत. तिथे विरोधकांनी निवडणुकीत ईव्हीएमच्या वापराला अनुमती देऊनच सत्ता स्थापन केलेली आहे. हे विसरून कसे चालेल? खरे तर याबाबत भाजपाने आक्रमक भूमिका घेतली पाहिजे होती. परंतु असे झाले नाही. कारण देशातील निवडणूक बॅलेट पेपरऐवजी ईव्हीएमवर घेण्याचा काँग्रेसच्या कार्यकाळातच घेतला गेला होता, याची जाणीव भाजपाला आहे. तेव्हा तर भाजपाला दोनआकडी संख्या गाठणे पण कठीण झाले होते. तेव्हाही संसदेतील विरोधकांचे स्थान नगण्य असेच होते. याची जाणीव जनतेला असली पाहिजे. ईव्हीएम हे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र असल्याने यात फेरफार करून, हँग करून पडलेले मतदान दुसरीकडे वळविता येते, असा आरोप केला जातो. हे आरोप निवडणूक आयोगाने अनेकदा फेटाळले आहेत. परंतु महाराष्ट्रातील आघाडीचे घटक पक्ष ईव्हीएम विरोधात आखडपाखड करून आपला रोष व्यक्त करीत आहेत.

**मिलिंद गड्डमवार**/ ९५११२१५२००

### व्याधिमुक्तसाठी आरोग्यपूर्ण बदल

अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अहवालात ब्रेन स्ट्रोकच्या घटनांमध्ये व त्यात होणाऱ्या मृत्यूंमध्ये वेगाने वाढ होत आहे. खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि बदलती धावपळीची दिनचर्या हे त्याचे एक प्रमुख कारण असल्याचे त्यात म्हटले आहे. त्यासाठी ताजे आणि आरोग्यदायी जेवण आणि नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. मधुमेह, कॅन्सर, रक्तदाब, हृदयविकार, संधिवात अशा अनेक दुर्धर शारीरिक व्याधी तरुण वयात गाठत आहेत. नैराश्य, अतिचंचलता, निद्रानाश, चिंता, भावनिक चढ-उतार, आक्रमकता किंवा क्रोध अशा मानसिक विकारांसाठी चुकीच्या सवयी पूरक ठरू शकतात. आरोग्याचा मार्ग हा पोटातून जातो. सध्या घरचे ताजे खाणे माणसे विसरत असून जंक फूड आणि खाऊगल्लीतील पदार्थ खाण्याचे प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. माणसांचे कामाचे स्वरूप बदलत आहेत. घरचे ताजे अन्न जिथे मिळू शकेल त्या जागांना माणसे प्राधान्य देऊ लागली आहेत. त्यांची संख्या वेगाने वाढायला वाढण्याची आवश्यकता आहे.

**प्रा. मधुकर चुटे**/९४२०५६६४०४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# शेतकऱ्यांना लागणाऱ्या खत व औषधावरील जीएसटी रद्द करावा : आ. कैलास पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

शेतकऱ्यांना पिकासाठी आवश्यक असणाऱ्या खत, औषध व साधनसामग्रीवर १८ ते २८ टक्के जीएसटी घेतला जातो. एवढ्या मोठया प्रमाणात घेतला जाणारा जीएसटीमुळे शेतकरी अडचणीत असून त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आमदार कैलास पाटील यांनी हिवाळी अधिवेशनात केली. ते पुरवणी मागण्यावर बोलत होते.

यावेळी आमदार कैलास पाटील म्हणाले की, कृषी विभागाच्या भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेचे अनुदान २०१९ पासून दिलेले नाही. तसेच पंतप्रधान कृषी सिंचन योजना, कृषी यांत्रिकीकरण योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना याचेही अनुदान दिलं गेलेलं नसल्याची बाब आमदार पाटील यांनी निदर्शनास आणून दिली.

महाराष्ट्र आता थांबणार नाही म्हणणाऱ्या मंडळींनी हे अनुदान का थांबवलं असा प्रश्न आमदार पाटील यांनी सरकारला विचारला. डीबीटी साठी दिल्या जाणाऱ्या पूर्वसंमती का थांबवल्यात याचेही उत्तर त्यांनी मागितलं.

शेतकऱ्यांना पिकासाठी लागणाऱ्या खत,औषध व साधनसामुग्रीवरील आकारला जाणारा जीएसटी रद्द करावा, तसेच सद्या द्राक्षबागाचे मोठं नुकसान झाले असून त्यांनाही अनुदान देऊन काहीप्रमाणात दिलासा मिळावा अशी मागणी आमदार पाटील यांनी केली.

दुधाला अनुदान देण्याची घोषणा केली असली तरी फॅट व एसएनएफची अव्यवहार्य अट लावल्याने ९० टक्के दूधउत्पादक या अनुदानास पात्र ठरत नाही. त्यामुळं ती अट काहीशी शिथिल केल्यास त्या सर्व ९० टक्के दूधउत्पादकास त्याचा लाभ मिळेल.

धनगर बांधवासाठी राजे होळकर महामेष योजना लागू केली असून त्यासाठी ९१ हजार अर्ज आले आहेत. त्यासाठी गरज अठराशे कोटीची आहे मात्र तरतूद फक्त २९ कोटी करण्यात आली असल्याचे सांगून आमदार पाटील यांनी या प्रश्नाकडे सभागृहाचे लक्ष वेधले.



वडगाव एम आयडीसी साठी २०१३ साली जमिनीच भूसंपादन करण्यात आले असून आज अकरा वर्ष होऊनही अद्याप त्याचा मोबदला त्या शेतकऱ्यांना मिळालेला नाही. दहा वर्षानंतर यातील काही क्षेत्र वगळण्याचा प्रस्ताव प्रशासनाने दिला असून तस न करता नियमानुसार त्या सर्व क्षेत्राचा समावेश करून ठरलेला मावेजा देण्यात यावा अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी केली. तसेच तालुका क्रीडा संकुलासाठी एमआयडीसी ने जागा उपलब्ध करून दिली होती पण स्थगिती सरकारकडून याला स्थगिती दिली आहे.

ती उठवून याठिकाणी सुसज्ज व अद्ययावत क्रीडा संकुल उभा करण्याची मागणी त्यांनी केली.

रस्ते विकास आराखडा करण्याचे काम थांबलेल आहे, यात शेतकऱ्यांच्या जमिनी रजिस्ट्री करण्याचा नियम केल्यानं ही अडचण बनली आहे.

त्याऐवजी शेतकऱ्यांकडून शंभर रुपयाच्या स्टॅम्पवर संमती पत्र घेतल्यास ही मोठी समस्या सुटण्यास मदत होईल व रस्त्याचा विकास करणे देखील सोयीचं होईल असं कैलास पाटील यांनी सरकारला सुचवले. त्याचप्रमाणे शेगाव - पंढरपूर हा रस्ता अर्धवट अवस्थेत आहे याकडेही पाटील यांनी लक्ष वेधत पाच वर्षांपासून या मार्गवरील मांजरा नदीवर असणाऱ्या पुलाच काम झालेलं नाही.

शिवाय येरमाळा, कन्हेरवाडी येथेही काम झालेलं नाही. याठिकाणी मोठया प्रमाणावर लूटमारीच्या घटना होत असून हे काम लवकर पूर्ण करावे.

या कामाचा गुत्तेदार पळून गेला असून त्याची जमा असलेली अनामत रक्कम जप्त करून हे काम पूर्ण करावे अशी मागणी आमदार कैलास पाटील यांनी यावेळी केली.

# रुईभर सोसायटी चेअरमनपदी बाबासाहेब कोळगे व व्हा. चेअरमनपदी प्रसन्न तीर्थकर



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

विविध कार्यकारी सेवा सोसायटी चेअरमन पदी बाबासाहेब कोळगे व व्हायचेअरमन पदी प्रसन्न तीर्थकर यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी रेडेकर एन.टी. यांनी काम पाहिले. गटसचिव म्हणून श्री नानासाहेब कदम यांनी काम पाहिले.

नूतन चेअरमन व व्हायचेअरमन यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

माजी चेअरमन पांडुरंग कुंडलिक कोळगे यांनी मार्गदर्शन करताना म्हणाली की, आपल्या संस्थेचे उत्तरोत्तर प्रगती व्हावी या दिशेने सर्वांनी सहकार्य करावे व कामात सातत्य ठेवून सभासदांना सहकार्याची भावना ठेवून सर्वांनी जबाबदारी ओळखून काम करण्याची अपेक्षा याप्रसंगी व्यक्त केली.

याप्रसंगी डॉ. आंबेडकर बाल विकास शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिक्षण महर्षी सुभाष कोळगे, माजी सरपंच पांडुरंग आबा कोळगे, भगवान गिरी महाराज, माजी मंडल अधिकारी किसन मते, माजी मुअ आगतराव भोईटे, भाजप किसान मोर्चाचे सचिव रामदास आण्णा कोळगे, राजारामबापू कोळगे, माजी सरपंच बालाजी कोळगे, गोपाळ निंबाळकर, प्रकाश भणगे, धनाजी चव्हाण, मारुती कस्पटे, निलावती वडवले, नवनाथ गव्हाणे, अशोक गव्हाणे, राजेंद्र भणगे, पोपट पाडुळे, दत्ता स्वामी, अशोक सिरसाठे, दत्तात्रय बनसोडे, विकास वडवले, शिवाजी काकडे, नामदेव कोळगे, नेताजी कोळगे, महादेव शिंपले, हनुमान जगताप, पंडित जगताप, किशोर कोळगे, भागवत परीट, मारुती कोळगे, रमेश कलाल, कालिदास कोळगे, गोपीनाथ कोळगे, नरेंद्र आगळे, हरिदास गव्हाणे यांच्यासह आदि मान्यवर मोठ्या संख्येने याप्रसंगी उपस्थित होते.

शेवटी सर्व उपस्थितांचे आभार नानासाहेब पवार यांनी मानले.

# शिक्षण परिषद म्हणजे नाविन्याचा स्वीकार करणे : अमोल ताकभाते



**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.२० डिसेंबर -**

शिक्षण परिषद म्हणजे नाविन्याचा स्वीकार करून विद्यार्थ्यांनी सर्वांगीण प्रगती साधुन आपले आपल्या गावाचे व जिल्ह्याचे नाव राज्यभर लौकिक करावे असे प्रतिपादन तुळजापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी अमोल ताकभते यांनी मंगळवार १७ डिसेंबर रोजी खोताचीवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत केले.

तीर्थ खुर्द केंद्राची शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा खोताचीवाडी येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी केंद्रप्रमुख तानाजी महाजन, सरपंच मोहिनीताई क्षीरसागर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, तीर्थ खुर्द केंद्राच्या केंद्रीय मुख्याध्यापिका अंजली कावरे, मुख्याध्यापक जमदाडे, तज्ञ मार्गदर्शक उंडे, खोताचीवाडी शाळेचे मुख्याध्यापक खडके, सहशिक्षिका मनिषा क्षीरसागर, युवा प्रशिक्षणार्थी ज्योती जाधव हे उपस्थित होते.

या शिक्षण परिषदेमध्ये हॅकेथॉन उपक्रम, मराठी वाचन, उर्दू वाचन, मराठी वाचन अध्ययन स्तरानुसार समज पूर्वक वाचन, शाळेची टक्केवारी काढणे, PT-२, सन २०२३-२४ पासून प्राप्त शैक्षणिक साहित्याची सद्यस्थिती अभ्यासणे यावर सखोल असे मार्गदर्शन करण्यात आले.

खोताचीवाडी येथील या शिक्षण परिषदेस ओंकार गायकवाड शिक्षण गटविकास अधिकारी, काळे विस्ताराधिकारी, राऊत विस्ताराधिकारी यांनी भेट दिली.

यावेळी खोताचीवाडी शाळेतील विद्यार्थी यांनी लेझीम द्वारे वेलकम आणि पथनाट्य सादर करून सर्व उपस्थितांचे लक्ष वेधून घेऊन सर्वांची वाह वाह मिळवत दाद मिळवली.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सन २०२४- २५ या स्पर्धेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक आल्याबद्दल तीर्थ खुर्द केंद्रातील सर्व शाळेतर्फे प्रिंटर संच, शाल व बुके देऊन शाळेचे मुख्याध्यापक अशोक खडके, सहशिक्षिका मनीषा क्षीरसागर, युवा प्रशिक्षणार्थी ज्योती जाधव, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, सरपंच मोहिनीताई क्षीरसागर यांचा गटविकास अधिकारी पंचायत समिती ताकभाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने विधी साक्षरता शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२० डिसेंबर -**

येथील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि अभियांत्रिकी महाविद्यालय धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमानाने नुकतेच विधी साक्षरता शिबिर घेण्यात आले. या विधी साक्षरता शिबिरासाठी दिवाणी न्यायाधीश मा. वसंत यादव (वरिष्ठ स्तर तथा सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) मुख्य न्यायरक्षक ॲड. अमोल गुंड, ॲड भाग्यश्री रणखांब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने, कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा वडणे, महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा. सुनीता गुंजाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी

दिवाणी न्यायाधीश वसंत यादव मार्गदर्शन करताना म्हणाले की विविध स्तरावर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत सामाजिक समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जात असून यामध्ये अगदी बालविवाहा पासून ते कुठल्याही महिलेवर लैंगिक अत्याचार किंवा अन्य समस्यांनी त्या ग्रस्त असतील तर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाला त्या २४ तास केव्हाही फोन करून आपली अडचण, समस्या सांगून त्या सोडवू शकतात. यामुळे महत्त्वाचे म्हणजे महिलांमध्ये एक प्रकारे आत्मविश्वास येत असून त्यांनी आपल्या अडचणी निसंकोच पुणे तात्काळ सोडवाव्यात. असेही त्यांनी आवाहन केले. मुख्य न्यायरक्षक ॲड. अमोल गुंड यांनी पोक्सो कायद्याअंतर्गत जे गुन्हे घडतात त्या पाठीमागची पार्श्वभूमी सांगून यावरील विविध कायदे आणि त्यावर असलेली उपाययोजना, दंडात्मक कार्यवाही याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच रॅगिंग प्रतिबंधक कायदे किती कडक आहेत याविषयी सुद्धा विद्यार्थ्यांमध्ये जाणीव जागृती केली. ॲड. भाग्यश्री रणखांब यांनी कार्यालयीन क्षेत्रांमध्ये महिलांचा होत असलेला लैंगिक छळ याविषयी विस्तृत माहिती देऊन, चुकूनही कोणी अशा कचाट्यात सापडत असेल तर त्यांनी त्वरित याविषयी सजग राहून गुन्हेगारांना जरब बसवण्यासाठी कायद्याचा वापर केला पाहिजे, याविषयी सविस्तर अशी माहिती दिली. हे समजून सांगताना त्यांनी देशात घडलेल्या अनेक घटनांचा उल्लेख केला.

यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने म्हणाले की, आमच्या महाविद्यालयामध्ये पूर्वीपासूनच महिला तक्रार निवारण समिती अंतर्गत महिलांना, मुलींना वेळोवेळी कायद्याविषयी सज्ज करण्यासाठी आम्ही शिबिरे आयोजित करतो. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने राबविलेला हा उपक्रम स्तुत्य उपक्रम असून निश्चितपणे सर्व महाविद्यालयाला याचा फायदा होत असल्याबद्दल सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रम समन्वयक डॉ. उषा वडणे यांनीही यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कायदेविषयक सजग असणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. शेवटी महिला तक्रार निवारण समितीच्या अध्यक्ष प्रा. सुनीता गुंजाळ यांनी उपस्थित सर्वांचे मार्गदर्शन केल्याबद्दल आभार मानले.

या कार्यक्रमासाठी फर्स्ट इयर विभागाच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. विमल म्हेत्रे यांनी केले.

# कळंब तालुका पत्रकार संघाचे पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.२० डिसेंबर -**

सालाबादप्रमाणे कळंब तालुका पत्रकार संघाचे मानाचे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून या वर्षी सोलापूर येथील एम.जे. प्रथम मानव सेवा संस्थेला तर मुंबई येथील विशाल परदेशी, कळंब येथील शिवाजी सावंत, सुभाष घोडके, आदर्श शिक्षक पुरस्कार ईटकुर जिल्हा परिषद शाळेतील उपक्रमशील शिक्षक अनिल शिरसागर, सुभाष कुलकर्णी, चंद्रकांत करडे यांना जाहीर करण्यात आले आहेत. कळंब पत्रकार संघाचे पुरस्काराचे हे २६ वे वर्ष आहे.

जानेवारीत २०२५ मान्यवरांच्या उपस्थितीत या पुरस्काराचे वितरण होणार असल्याची माहिती कळंब तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे यांनी दिली. कळंब तालुका पत्रकार संघाच्या सदस्यांची बैठक पत्रकार भवन येथे अशोक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

यावेळी विविध विषयावर चर्चा करण्यात येवून यावर्षीचे पुरस्कार जाहीर करण्यात आले.

# शिक्षण यशाची गुरुकिल्ली : डॉ. जीवन पवार

## तुळजाभवानी महाविद्यालयात अभिनव प्रयोगास तुळजापूरकरांचा शैक्षणिक विकासासाठी पाठींबा

**आम्ही तुळजापूरकर शिक्षणासाठी एक पाऊल पुढे अभियान..**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२० डिसेंबर -**

शिक्षण यशाची गुरुकिल्ली आहे, हे ओळखून शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रीय चारित्र्याचे नागरिक घडणे आवश्यक असल्याचे मत प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी शिक्षणासाठी एक पाऊल पुढे या अभियानात व्यक्त केले.

शैक्षणिक क्षेत्रातील समस्या या समाजासमोर आल्या पाहिजेत, महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई जगदंबेमुळे तुळजापूर नगरीचे नाव देशाच्या नकाशावर दिसते अगदी त्याच प्रमाणे शिक्षणाचा बाबतीत सुध्दा तुळजापूर नगरीचे नाव आले पाहिजे यासाठी तुळजाभवानी महाविद्यालयात आम्ही तुळजापूरकर... शिक्षणासाठी एक पाऊल पुढे या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. संस्था प्रार्थनेने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. पुढे बोलताना डॉ. पवार म्हणाले की, तुळजापूर तालुक्यातील विद्यार्थी गुणवत्ताधारक व होतकरू आहे. सदर उपक्रम हा महाविद्यालयापर्यंत मर्यादित नाही. त्याची व्यापकता समाजाने समजून घेणे गरजेचे आहे, जर आपले विद्यार्थी शिक्षणासाठी शहराबाहेर जात असतील तर आपण ही कुठेतरी यासाठी जबाबदार आहोत याची जाणीव आपणांस गरजेची आहे. ही बाब आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. भविष्याचा विचार करून विद्यार्थ्यांना शिक्षण देणे गरजेचे आहे आणि यासाठीच या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे यावेळी प्राचार्य डॉ. जीवन पवार यांनी सांगितले. यावेळी पालक संवाद सत्रामध्ये महिलांसाठी उद्योजकता प्रशिक्षण, शाळा बहाय मुलांना शिक्षण देणे, बालकांसाठी मैदान उपलब्ध करून देणे, बदलत्या जीवनशैलीच्या पध्दतीने शैक्षणिक सुविधा निर्माण करणे, नवीन लोकांचे गेस्ट लेक्चर्स आयोजित करणे, भविष्यात मेडिकल कॉलेज, नर्सिंग कॉलेज स्थापन करुन ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून देणे, कॉपी मुक्त परीक्षा घेणे, विज्ञान शाखा सुरु करणे, नाईट कॉलेज सुरू करणे, व्यसनमुक्ती साठी प्रयत्न करणे, स्पर्धा परीक्षा तयारीसाठी पुस्तके आणि अभ्यासिका उपलब्ध करून देणे या बाबी समोर ठेवून एक शैक्षणिक आराखडा तयार करण्यात यावा अशा आवश्यक मागण्या पालकांच्या आणि उपस्थितांच्या माध्यमातून मांडण्यात आल्या.

यावेळी कार्यक्रमास सामाजिक व राजकीय क्षेत्रातील सर्व नागरीक उपस्थित होते. कार्यमासाठी डॉ. आनंद मुळे यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बाबर यांनी तर आभार प्रा. धनंजय लोंढे यांनी मानले.

# छत्रपती शिवाजी विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२० डिसेंबर -**

छत्रपती शिवाजी विद्यालय, वाशी येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयकुमार शितोळे खजिनदार श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ,बार्शी तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. राजाभाऊ टेकाळे प्राचार्य बी.जी.पी. एस. महिला बी.एड. महाविद्यालय, छत्रपती संभाजी नगर,सोमनाथ घोलप गटशिक्षणाधिकारी, गटशिक्षण कार्यालय वाशी, विजयाताई गायकवाड नगराध्यक्ष, नगरपंचायत वाशी, सुरेश कवडे, उपनगराध्यक्ष नगरपंचायत वाशी, अमर चेडे, पोलिस उपनिरीक्षक विनोबा भावे नगर पोलिस स्टेशन कुर्ला मुंबई, तानाजी शिनगारे चेअरमन शालेय समिती, प्राचार्य डॉ. अरुण गंभीरे व मुख्याध्यापक संतोष माने उपस्थित होते.

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा या कार्यक्रमात वाशी गावातील व परिसरातील विविध शिक्षणप्रेमी व दानशूर व्यक्तींनी रोख रकमेच्या स्वरूपात देण्यात आलेली पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आली. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एस.एस.सी. परीक्षेत विद्यालयातील प्रथम क्रमांक प्राप्त मोराळे प्रेमराज लक्ष्मण (९९.४०% गुण) या विद्यार्थ्याला एकूण पारितोषिक रक्कम रुपये १४७५०, एक सायकल, एक पुस्तक व सन्मान चिन्ह इ.पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

द्वितीय क्रमांक प्राप्त व विद्यालयातून मुलीतून प्रथम फारणे अनुजा शशिकांत (९८.२०% गुण) या विद्यार्थिनीला एकूण पारितोषिक रुपये १०६९७, दोन पुस्तक,एक सन्मानचिन्ह इ. पारितोषिके वितरण करण्यात आली. तसेच द्वितीय क्रमांक प्राप्त विद्यार्थी अथर्व उमेश चेडे (९८.२०% गुण) या विद्यार्थ्याला ३०४० रुपये, पुस्तक व सन्मानचिन्हे देऊन सत्कार करण्यात आला.

तृतीय क्रमांक प्राप्त विद्यार्थिनी कवडे मदुरा जयंत (९८.००% गुण) या विद्यार्थिनीला एकूण पारितोषिक रुपये ५४३० पुस्तक व सन्मानचिन्हे देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर एस.एस.सी. परीक्षेत ९०% पेक्षा अधिक गुण घेणाऱ्या २१ विद्यार्थ्यांना डॉ.बी.वाय. यादव, अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी यांच्या वतीने रोख पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले. याचबरोबर पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षा, नवोदय प्रवेश परीक्षा व एन.एम.एम.एस. परीक्षेत यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन गौरव करण्यात सदरील कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.व्ही. गाढवे, पर्यवेक्षक बी.एम. सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी संदीप कवडे, उपाध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती, नेताजी नलवडे, उपाध्यक्ष शिक्षक-पालक संघ यांचे सहकार्य लाभले. विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धारकर एस.एस., देशमुख जी.एम., वाघेरे ए.बी. यांनी तर आभार पर्यवेक्षक बी.एम.सावंत यांनी मानले.

# जळकोट येथे तेजग्रंथ रथयात्रेचे स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.२० डिसेंबर -**

पुणे येथील तेजज्ञान फौंडेशन (हॅप्पी थॉट्स) या संस्थेचे सर्वेसर्वा सरश्री तेजपारखीजी यांच्या अथक परिश्रमाने उच्चतम विकसित समाज निर्माण करण्यासाठीचे उच्च कार्य अविरतपणे गेले २५ वर्षे विनामुल्य कार्य सुरू आहे. तेजग्यान संस्थेतर्फे उच्चतम विचारसरणी वाढीस लागावी व समाजाला उच्च ज्ञानदानाचा लाभ व्हावा. या उद्देशाने तेजग्रंथ रथयात्रा काढण्यात आली आहे. तेजग्रंथ रथयात्रा जळकोट येथे आली असता, जळकोट येथील तेजसाधक व मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

यावेळी तेजज्ञान संस्थेच्या रथयात्रेचे जळकोट येथील साधक आणि पत्रकार मेघराज किलजे आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर रथयात्रा संपूर्ण महाराष्ट्रात तेजगुरू सरश्री तेजपारखीजी लिखित पुस्तकांचे प्रचार आणि प्रसार करण्यासाठी रथयात्रा काढली असल्याचे रथयात्रेसोबत असणारे तेजसाधक आनंद जाधव (कोल्हापूर) यांनी सांगितले. यामध्ये विचार नियम, गर्भ संस्कार, मूर्ती पूजा करावी की करु नये, आजची स्त्री आत्मनिर्भर कशी बनेल, मानवी जीवनाचे संपूर्ण लक्ष, अंतर्मनाच्या शक्ती पलीकडील आत्मबळ, स्वास्थ्य प्राप्तीसाठी विचार नियम, ध्यान साधना कशी करावी,द मन,शोध ईश्वराचा, भगवद्गगिता अशी हजारो विषयावर सरश्री लिखित पुस्तकांचे प्रदर्शन यावेळी मांडण्यात आले होते. याचा लाभ अनेकांनी यावेळी घेतला.

क्राईम वृत्त...



## लालबहादूर शास्त्री विद्यालयातील अपूर्वा शेंडगे हिचे वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश

**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

सरदार वल्लभभाई पटेल प्राथमिक विद्यालय उदगीर येथे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत लालबहादूर शास्त्री विद्यालयातील अपूर्वा रमेश शेंडगे हिचा तृतीय क्रमांक आला. ही स्पर्धा दोन गटात घेण्यात आली होती. पाचवी ते आठवी गटामधून अपूर्वाने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेचा विषय आधुनिक आई कुटुंबासाठी शाप की वरदान असा होता. तिच्या यशाबद्दल तिचे कौतुक करताना स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार कार्यवाह तथा केंद्रीय कार्यकारणी सदस्य शंकरराव लासुणे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, पर्यवेक्षक किरण नेमट, शालेय समितीचे सदस्य संतोषराव कुलकर्णी, वक्तृत्व स्पर्धा प्रमुख अंबिका पारसेवार, सहाय्यक करुणा गायकवाड व शाळाबाह्य स्पर्धा परीक्षा प्रमुख नीता मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी पाचवी ते आठवी विभागातील सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## लालबहादुर शास्त्री प्राथमिक शाळेत संत गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी

**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाई द्वारा संचलित लालबहादुर शास्त्री प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना थोर समाजसुधारक, स्वच्छता अभियानाचे जनक संत गाडगेबाबा यांच्या कार्याची माहिती व्हावी म्हणून त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे तर, प्रमुख वक्ते म्हणून सचिन आगलावे उपस्थित होते. मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमा पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. गुलाबपुष्प देऊन शाळेच्या वतीने मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रमुख वक्ते सचिन आगलावे यांनी संत गाडगेबाबा यांनी दिन-दलितांसाठी शाळा काढल्या. अन्नक्षेत्र सुरू केले. ते गावोगावी फिरुन, आपल्या किर्तनातून शिक्षणाचे महत्त्व व स्वच्छतेचा संदेश देत असत. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची प्रतिज्ञा दिली. संत गाडगेबाबांच्या महान कार्याविषयी सविस्तरपणे माहिती विद्यार्थ्यांना दिली. अध्यक्षीय समारोपपर भाषणात मुख्याध्यापक अंकुश मिरगुडे यांनी संत गाडगेबाबांनी सांगितल्याप्रमाणे अंधश्रद्धा बाळगू नका. आपले घर जसे स्वच्छ ठेवतो, त्याप्रमाणे आपल्या घराचा परिसर, वर्ग, शालेय परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करण्याचे आवाहन केले. सुत्रसंचलन सौ मंजुषा पेन्सलवारबाईंनी केले.



## डॉ.भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत यशवंतविद्यालयाचे यश

**अहमदपूर, दि.२० डिसेंबर -**

टीचर्स असोसिएशन मुंबई यांच्या वतीने डॉक्टर होमी बाबा बाल वैज्ञानिक परीक्षा दि.२९ नोव्हेंबर रोजी होऊन त्यात यशवंत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्र दीपक यश संपादन केलेले आहे. सदरची परीक्षा नववी आणि सहावी इयत्तेसाठी असून नववी मध्ये कुमारी फड वैष्णवी शिवशंकर, वलसे अर्जुन बालाजी, हंगरगे सतेज शंकर यांनी तर सहावीतील आरदवाड आयुष्य अंगद सेकंड लेव्हल साठी पात्र ठरलेले आहेत. या विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाचे सहशिक्षक अमोल लगड, विवेकानंद हुडे आणि यशवंत कोटा पॅटर्न यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. या चारही गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शालेय प्रार्थने मध्ये प्राचार्य गजानन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी उपमुख्याध्यापक माधव वाघमारे, पर्यवेक्षक राम तत्तापुरे, शिवाजीराव सूर्यवंशी, कोटा पॅटर्नचे प्रमुख खय्युम शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. या नेत्र दीपक यशाबद्दल गुणवंत विद्यार्थी आणि मार्गदर्शक शिक्षकांचे टागोर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर, सचिव शिक्षण महर्षी डी.बी. लोहारे गुरुजी, उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव प्राध्यापक डॉ. सुनिता चवळे यांनी अभिनंदन केले आहे.

## ॲड. अनंतराव सबनीस यांचे निधन

**निलंगा, दि.२० डिसेंबर -**



निलंगा न्यायालयातील ज्येष्ठ विधिज्ञ अनंतराव बाबाराव सबनीस यांचे शुक्रवार दि.२० डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजता निलंगा येथील राहत्या घरी वृध्दापकाळाने ९४ व्या वर्षी निधन झाले. साधारण ७० वर्षे त्यांनी वकीली व्यवसाय केला. ते विद्वान व शिस्तबद्ध विधिज्ञ म्हणून विख्यात होते. अफाट वाचन, अध्यात्माचा अभ्यास व असलेले ज्ञान इतरांना सांगणे, मोठा जनसंपर्क हे त्यांचे गुण वैशिष्ट्य होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, चार सूना व नातवंडे असा परिवार आहे.

# इस्मालवाडी येथील तरुण शेतकऱ्याची सततची नापीकी व कर्जबाजारीपणाला कंटाळुन गळफास घेउन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० डिसेंबर -**

तालुक्यातील इस्मालवाडी येथील सोमेश्वर खंडु मुगळे वय ३३ या तरुण शेतकऱ्यांने गळफास घेत आपली जिवनयात्रा संपवली आहे.



सोयाबीनचे घटलेले बाजारभाव, गेल्या तीन वर्षापासुनची दुष्काळी स्थीती, सततची नापीकी, यावर्षी पावसाच्या लहरीपणामुळे वाया गेलेला खरीप हंगाम, खर्च अन उत्पन्नाचा न बसत असलेला मेळ, कर्जाचे वाढत चाललेले चक्र यामुळे इस्मालवाडी गावातील तरुण व उमद्या शेतकऱ्यांने टोकाचे पाऊल उचलत आत्महत्या केली. गेल्या अनेक दिवसापासुन ते विमनस्क अवस्थेत होते. दोन एकर शेतीत कुंटुबाचा उदरनिर्वाह कसा भागवावा अन तीन लेकरांचे शिक्षण त्यांच्या गरजा पुरेशा करण्यात येत असलेल्या अडचणी, कर्जाचा वाढता डोंगर याला कटांळत दोन दिवसापुर्वी ते अचानक निघुन गेल्याने कुंटुबीय व ग्रामस्थांना त्यांचा शोध घेतला. गुरुवारी भांतब्रा (ता. भालकी, जिल्हा बिदर) येथे त्यांनी गळफास घेउन आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले.

त्याच्या पार्थिवाचे भालकी येथील शासकीय रुग्नालयात शवविच्छेदन करण्यात आले असुन भालकी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. त्याच्या पश्च्यात पत्नी, तीन मुली, आई, वडील एक भाऊ असा परिवार आहे.

## शिवाजी महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

शिवाजी महाविद्यालय उदगीर आणि धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय व हॉस्पिटल उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत' आरोग्य तपासणी शिबिराचे' यशस्वी आयोजन करण्यात आले. सदरील शिबिराचे आयोजन भारत सरकारच्या 'प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत 'करण्यात आले होते.

या शिबिराचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.एम. मांजरे हे होते कार्यक्रमाचे उद्घाटक पृथ्वीराज पाटील तर प्रमुख उपस्थिती धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालल्याचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ.व्ही.एम. पवार, डॉ.ह.वा. कुलकर्णी, डॉ.आर.बी. एडतकर, डॉ.डी.बी. कोनाळे यांची आणि धन्वंतरीचे तज्ज्ञ डॉक्टर्स यांची होती. प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील यांनी आपण आणि आपले आरोग्य कसे सांभाळावे या अनुषंगाने उपस्थितांना आयुर्वेद चिकित्सा पद्धती बाबत प्रबोधन केले. कार्यक्रमाचे उद्घाटक पृथ्वीराज पाटील यांनी, आरोग्य ही काळाची गरज आहे पैसा कमवणारे आपणच आहोत.

परंतु पैशापेक्षा आरोग्याला महत्त्व दिले पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपप्रसंगी प्राचार्य डॉ. मांजरे म्हणाले, विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आरोग्य सांभाळावे,मोबाईल पासून दूर राहावे, व्यायाम करावा. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शिबिरात सक्रिय सहभाग नोंदवून आरोग्य तपासणी करून घेतली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. बालाजी सूर्यवंशी यांनी केले तर आभार डॉ. विष्णू पवार यांनी मानले.

## नाथ सोहळ्यातील संतूर वादनाने भाविक रसिक मंत्रमुग्ध



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० डिसेंबर -**

पद्मश्री सतीश व्यास यांच्या संतूर वादन मैफलीचा शहरातीलच नव्हे तर तालुका व कर्नाटक,आंध्र, तामिळनाडूसह राज्यातील भाविकांनी आस्वाद घेतला. शहरात पहिल्यांदाच होत असलेल्या या संतूर वादन कार्यक्रमाने भाविकांसह रसिकही मंत्रमुग्ध झाले. तर माजीमंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी या सोहळ्यात हजेरी लावून या वादन कार्यक्रमाचा आनंद घेतला.

अंगावरील ऊबदार कपड्यानंतरही अंगात हुडहुडी भरणाऱ्या कडाक्याच्या थंडीत या वर्षीचा संगीत सोहळा रसिकांसाठी मेजवानी ठरला आहे. रविवार दि.१५ रोजी सायंकाळी दहीहंडी फोडून महाप्रसादाने या तीन दिवशीय महोत्सव सोहळ्याची सांगता करण्यात आली. श्री सचिदानंद सद्गुरू विरनाथ मल्लिनाथ महाराज नाथ संस्थानचे चौथे पिठाधिपती समर्थ सद्गुरु श्री ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण सोहळा व दत्तजयंतीचे औचित्य साधून तीन दिवशीय कार्यक्रमाचे आयोजन पिठाधिपती गुरुबाबा महाराज औसेकर यांच्या अधिपत्याखाली व पंढरपुर येथील विठ्ठल रुक्मिणी मंदीर समितीचे सहअध्यक्ष गहिणीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या उत्सव काळात सकाळ, संध्याकाळ पारंपरिक अभंग, हरिपाठ, सायंकाळी प्रासादिक चक्रीभजन, हरिकिर्तन व हरिजागर असा दैनंदिन कार्यक्रम झाला.

या संगीत व शास्त्रीय गायन कला सेवा दरबार सोहळ्याचे उद्घाटन माजी मंत्री बसवराज पाटील, पिठातीपती गुरूबाबा महाराज औसेकर, हभप गहिनीनाथ महाराज औसेकर, गोरखनाथ महाराज औसेकर, बसवंत देशमुख देशमुख, मच्छिंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. रविवारी सायंकाळी ५ वा. सुमारास औसा, महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक व तामिळनाडू राज्यातील शेकडो भाविकांनी सद्गुरूंच्या दर्शनासाठी व काल्याचा महाप्रसादासाठी गर्दी केली होती.

## संगत चांगल्या लोकाची धरा, वाईट गुण लागणार नाहीत : हभप. मनोहर महाराज

**तभा वृत्तसेवा**
**येरोळा, दि.२० डिसेंबर -**

शहरासह ग्रामिण भागात आरजकता माजली आहे. गावोगाव प्रत्येकाच्या जीवनात संतांचे फार मोठे समर्पण आहे. या जगामध्ये उद्धाराला कारणीभूत जर कोण असेल तर संत आहे. म्हणून जीवनामध्ये संतांची संगत धरा, संगतीने माणूस घडत असतो आणि वाइट संगतीने माणूस बिघडत असतो. ढेकणाच्या संगे हिरा जो भंगाला कुसंगे नाडीला साधू जैसा, असे हभप. मनोहर महाराज सायखेडे नाशिककर यांनी सांगितले. निर्व्यसनी बनावे, परमार्थ करावा, उद्योग करावा आणि आपल्या जीवनाचे सार्थक करून घ्यावे, असाही संदेश मनोहर सायखेडे महाराजांनी दिला. यावेळी प्रनेते हभप. सुरेश महाराज सारसेकर यांनी मानाची घोंगडी शालश्रीफळ देऊन समाजातील प्रगतशिल शेतकरी, भजनकरी व उद्योजक यांचा सत्कार केला.

# दैठणा येथील काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांच्या राजकीय विचारांचे सांत्वन

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.२० डिसेंबर -**



अभय साळुंके यांच्याकडून दैठणा येथील आपल्या काँग्रेस पक्षांच्या राजकीय कार्यकर्त्यांची भेट घेऊन त्यांच्या मनाचे सांत्वन करण्यात आले. अनेक राजकारणातील उमेदवार आपल्याला अपयश आल्यानंतर सहसा पुन्हा त्या मतदारसंघांमध्ये वेळ देत नाहीत. पण सगळ्यापेक्षा वेगळेच असे या निलंगा विधानसभा मतदारसंघातील पराभूत उमेदवार अभय दादा साळुंके, यांच्याकडून जे आतापर्यंत कोणाकडून घडलेले नाही ते या ठिकाणी घडलेले दिसून येत आहे.

आपण या निवडणुकीत स्वतः पराभूत झालो पराभूत होणे हा गुन्हा नाही शेवटी खेळ हा जन आशीर्वादाचा असतो आपल्याला थोडाफार आशीर्वाद कमी पडला म्हणून काय झाले. येणाऱ्या काळामध्ये आपण पुनश्च प्रयत्न करू आज आपण हरलो म्हणून हार म्हणायचे नाही. कारण आपल्या प्रयत्नाने हार पत्करलेली नाही तुमच्या प्रत्येक संकटात मी २४ तास तुमच्यासोबत आहे. कधीही माझ्याशी संपर्क करा. अशा प्रकारचा आपल्या समर्थकांना अभय दादा साळुंके यांच्याकडून शब्द देण्यात आला. याबद्दल यांचे दैटना गावात आज गावभर कौतुक होत असताना दिसून येत आहेत.

याप्रसंगी काँग्रेस पार्टीचे कार्यकर्ते विजयकुमार पाटील, अजित माने हे सोबत होते, आणि याचप्रमाणे दैटना गावातील, प्रवीण सांगवे, आशिष बिरादार, सुखदेव पाटील, दिलीप बिरादार उर्फ मेजर, अर.बी. मुळे, विनायक महाराज, आकाश बिरादार व पंकज सूर्यवंशी हे सर्वजण सोबत होते.

# पालकांनी आपल्या पाल्यासाठी वेळ द्यावे : डॉ. ज्ञानोबा मुंढे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२० डिसेंबर -**

विश्वनाथ चलवा प्राथमिक विद्यालय, उदगीर येथे आयोजित केलेल्या पालक मेळाव्याच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना गट साधन केंद्र उदगीर येथील विषय साधनव्यक्ती डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी पालकांनी आपल्या पाल्यासाठी वेळ द्यावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी व्यासपीठावर पालक प्रतिनिधी प्रा. राठोड, हरिविजय देशपांडे, एन.व्ही. सोमवंशी हे उपस्थित होते. सदरील कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक आलट डी.एम. हे होते. पुढे बोलताना डॉ. ज्ञानोबा मुंढे म्हणाले की, आई हा बालकाचा पहिला गुरु आहे. तर कुटुंब ही पहिली शाळा आहे. विद्यार्थी हे शाळेत फक्त आठ तास राहतात, तर पालकांच्या संपर्कात म्हणजे आपल्या घरी सोळा तास राहतात. त्यासाठी पालकांनी आपल्या पाल्यावर योग्य संस्कार करणे, त्यांच्यासाठी वेळ देणे, त्यांच्या अभ्यासाचा आढावा घेणे, अत्यंत महत्त्वाचे आहे.

पालकांनी आपल्या लेकरांच्या आवडीनिवडीचा विचार करून त्यांना शिक्षण द्यावे. त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून द्यावे. बऱ्याच वेळा शाळेने आयोजित केलेल्या पालक सभेसाठी पालक उपस्थित राहत नाहीत. ते आम्हाला वेळ नाही असं सांगतात.

जर आपल्या पाल्यासाठी वेळ द्यायला आपल्याकडे वेळ नसेल तर ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. त्यासाठी पालक मेळाव्याला पालकांनी उपस्थित राहणे गरजेचे आहे. पालकांनी जागरूक होणे महत्त्वाचे आहे. पालकांनी काळानुसार बदलणे गरजेचे आहे.जर आपला बालक घडवायचा असेल तर आपल्या पाल्यासाठी प्रत्येक पालकांनी वेळ द्यावा. असे मत डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी व्यक्त केले.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी म्हणून दाडगे एस.डी. यांनी मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात डी.एम. आलट म्हणाले की, आमच्या पालकांचे आम्हाला खूप सहकार्य आहे. त्यांच्या मदतीनेच आम्ही शाळेमध्ये विविध उपक्रम राबवून मुलांना आनंददायी शिक्षण देत असतो. पालकांनी आपल्या अडीअडचणी सांगाव्यात. आम्ही त्या निश्चितपणे सोडविण्याचे काम करू. असे आश्वासन अध्यक्षीय समारोपाच्या माध्यमातून डी एम आलट यांनी दिले.

यावेळी प्रमुख पाहुण्यांचा परिचय तांबोळी जी.बी. यांनी करून दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए.आर. मोरे यांनी मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.व्ही. सोमवंशी यांनी केले, तर कार्यक्रमाचे आभार यु.बी. बोळेगावे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले.

## गणेश विद्यालयात विज्ञान प्रदर्शन साजरे



**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२० डिसेंबर -**

औसा तालुक्यातील उजनी येथील श्री गणेश विद्यालयातील शालेय विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन श्री गणेश शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धनराज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनात ४१ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

विद्यालयाचे मुख्याध्यापक पी.पी कोपरकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. संस्था सदस्य काशिनाथ कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या प्रदर्शनात ४१ प्रकल्प या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी मांडले होते. त्यासाठी विज्ञान शिक्षक डोकडे, टापरे, वाघमारे, भालेकर, मुळे, गावित, शिवराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यालयाचे पर्यवेक्षक मोहन ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विज्ञान प्रदर्शनात सहभाग नोंदवलेल्या विद्यार्थ्यांचे भरभरून कौतुक केले. यामध्ये थ्रीडी होलोग्राम व अन्न पचन सादरीकरण करणारे मॉडेल असे अनेक प्रयोग या प्रदर्शनाचे आकर्षण ठरले. या प्रसंगाचे औचित साधून शाळेचे ग्रंथपाल दिपक कोपरकर यांनी शाळेस ३००० रू चे पुस्तक भेट म्हणून दिले. तसेच अनेक पालक व जि.प.प्रा.शाळा उजनी येथील विद्यार्थ्यांनी या विज्ञान प्रदर्शनास भेट दिली.

# जिल्हा परिषद प्रशालेत भरला आनंद बाजार; तीन तासांतच लाखांची उलाढाल

## व्यावसायिक बनले जिल्हा परिषदेचे विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२० डिसेंबर -**

शाळेत खेळण्या बागडण्याच्या वयात पुस्तकी ज्ञानासोबतच व्यवहार काय असतो, आपला माल विक्री कसा करायचा अन् हिशोबाने पैसे कसे कमवायचे याचा अनुभव देण्यासाठी देवणी तालुक्यातील जवळगा येथील येथील जिल्हा परिषद प्रशालेत आनंद बाजार भरला होता.

आनंद बाजार एक अभिनव प्रयोग राबविण्यात आला. या बाजारात पालक, ग्रामस्थ हे ग्राहक झाले अन् मुले विक्रेते. विद्यार्थ्यांनी भरविलेल्या या बाजारात तीन



तासांतच लाखांची उलाढाल खरेदी विक्रीचा व्यवहार झाला. यानिमित्ताने चिमुकल्यांनी व्यावहारिक ज्ञानाचा अनुभव घेतला.

प्रशालेत स्काऊट गाईड अभियान अंतर्गत आनंद मेळावा भरला होता. शाळेतील पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी विविध पदार्थांची सुमारे ऐंशीच्यावर दुकाने व स्टॉल लावले.

या बाजाराचे उद्घाटन डॉ. जनार्धन बिरादार यांच्या हस्ते करण्यात आले. तर यावेळी शालेय व्यवस्थापन अध्यक्ष अनिल पाटील, सरपंच प्र. विजयकुमार वामनराव पाटील ग्रामपंचायत सदस्य, पालक तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत कार्यालयाकडून प्रथम येणाऱ्या स्टॉल ला प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येणार आहे.

या बाजारात विद्यार्थ्यांनी पालक, वांगे, बटाटे, टोमॅटो, कोथिंबीर, बीट, पपई, भोपळा, विविध फळे, इडली, दोसा, पोहे, अप्पे, वडापाव, सुशिला, रोटी भज्जी, मिरची भजे, भेळ, पाणीपुरी, पावभाजी, डोसा, मसालेदार, मसाला पापड, चणे, चहा, गोळ्या, बिस्किटे, चॉकलेट व कुरकुरे यांची दुकाने लावली होती.

गावातील लहान थोर नागरिकांसह महिला व तरुणांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत व खरेदी केल्याने १ लाख ३ हजार ४३० रुपयांची उलाढाल झाली.बाजारात चिमुकल्यांकडून खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी झाली होती.

याप्रसंगी ग्रामस्थांनी आवडीने खाऊचा आस्वाद घेतला. यामुळे विद्यार्थ्यांना गणिती संकल्पना, नफा-तोटा,व्यवहारज्ञान कौशल्य, विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकायला मिळाले. बाजारात चिमुकले दुकानदार आणि खरेदीदार यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.

प्रशालेचे प्रभारी मुख्याध्यापक दत्तात्रय कदम, उपक्रमशील शिक्षक लक्ष्मण चिंते, पांडुरंग येलमटे, बाळासाहेब कांबळे, विठ्ठल केंद्रे, शिवकुमार बिरादार, मंजुषा सुडे, राजकुमार सोनकांबळे, सुनिता सावंत आदींनी या उपक्रमाचे नियोजन केले होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अलीशान वाहनातून गोवंशाची वाहतूक

## बिलोली पोलिसांनी केली सहा गायींची सुटका

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २० डिसेंबर**

गो भक्त व पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी गोवंश तस्करांनी नवीन शक्कल लढवली असून अलीशान कार मधून गोवंशाची वाहतूक करण्यात येत आहे. कारमधून होत असलेल्या गोवंश वाहतुकीचा प्रकार बिलोली पोलिसांनी आज उघड केला. या कारवाई पोलिसांनी सहा गायी व कार जप्त केली आहे.

गोवंश हत्या बंदी कायदा लागू असला तरी नांदेड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गोवंश वाहतूक होत आहे. पोलीस त्याप्रमाणेच कारवाई करत



असले तरी या वाहतुकीवर लगाम लागला नसून जोमाने गो वंशाची वाहतूक होत आहे. अशा अनेक वाहतुकीवर गोभक्त देखील नजर ठेवून राहतात. परंतु गोवंश वाहतुकीसाठी आता गो तस्करांनी नवीन शक्कल लढवली असून अलीशान चार चाकी वाहनातून गोवंशाची वाहतूक करण्यात येत आहे. आज दिनांक २० डिसेंबर रोजी बिलोली पोलिसांनी अशीच होत असलेली गोवंशाची वाहतूक पकडली. एमएच ४८ ए १००३ या वाहनातून गोवंशाची वाहतूक होत होती . या कारमधून पोलिसांनी बेहोश केलेल्या सहा गायीची सुटका केली. ही कारवाई बिलोली शहरातील कुरेशी गल्ली येथे करण्यात आली.

दरम्यान या घटनेतील तीन अज्ञात आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाले. या प्रकरणी बिलोली पोलिसात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. विशेष म्हणजे गोवंश वाहतूक करणाऱ्या कारला तीन नंबर प्लेट लावण्यात आल्या होत्या. एका नंबर प्लेटवर एमएच ४८ ए १००३ , दुसऱ्या नंबर प्लेटवर एमएच २९ एएफ १२१४ नमूद होते तर कार मध्ये देखील एक नंबर प्लेट आढळून आल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# आदमपूर, थडीसावळी शिवारात उसाच्या लागवडीस सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २० डिसेंबर**

बिलोली तालुक्यातील आदमपूर, थडीसावळी, गळेगांव, परिसरात शेतकरी उसाची लागवड करताना दिसून येत आहेत.बऱ्याच दिवसांपासून परिसरातला गोदावरी मनार साखर कारखाना बंद अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांकडून उसाची लागवड करायचे बंद झाले होते.

त्याला आता बराचसा अवधी लोटलेला आहे. एक काळ असा होता आदमपूर परिसरात सर्वदूर उसाची लागवड शेतकरी हिरीहिरीने करीत असत. उसतोड मजूर टोळ्या आणि बैलांची टायर गाडी, ट्रक अशी उसाची वाहतूक होत असे. पण, त्या उसाच्या हंगामास तत्कालीन काळात घरघर लागली. कारखाना बंद पडला. परिसरातला



शेतकरी हवालदिल झाला. मग इतर पिकांकडे शेतकरी तेव्हा वळू लागले. सोयाबीन, हरभरा आदि पिकांनी परिसरातल्या शेत शिवारात उस पीक लागवडीच्या बदल्यात जागा घेतलेली होती. सद्यस्थितीत वाघलवाडा,उमरी व इतर तेलंगाणा भागात उस जात असल्याने शेतकरी उसाची लागवड करताना दिसून येत आहेत. त्याचबरोबर आज घडीला मजूर, मजूरी, अतिवृष्टी, महागाई व इतर कारणांमुळे उस लागवडीकडे शेतकरी वळल्याचे असेही बोलले जाते. उसाची तयार रोपे किंवा पारंपरिक बेणे पध्दत वापरून परिसरातील उस लागवड शेतकरी करीत आहेत. आगामी काळात परिसरात उसाचे क्षेत्र पूर्वीसारखेच तयार होईल, अशी चर्चा शेतकरी करताना दिसून येत आहेत.

# जि. प. शाळेच्या चिमुकल्यांचे 'नो प्लास्टिक' अभियान



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २० डिसेंबर**

स्वच्छतेचे पुजारी, लोकशिक्षक, कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या स्मृतीदिनानिमित्त जवळा दे. येथील जि.प. शाळेच्या विद्यार्थ्यांनी शालेय व गाव परिसर स्वच्छता करून गाडगेबाबांना कृतीशील अभिवादन करण्यात आले. तसेच परिसरात 'नो प्लास्टिक' अभियान राबवून गाडगेबाबांना आदरांजली वाहिली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर ढवळे, सहशिक्षक संतोष घटकार, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किशन गच्चे, माजी सरपंच कैलास गोडबोले, माजी सरपंच साहेबराव शिखरे, हैदर शेख, पांडुरंग गच्चे, मनिषा गच्चे, कमलबाई गच्चे, मारोती चक्रधर, हरिदास पांचाळ, इंदिरा पांचाळ, धम्मपाल गोडबोले, मिलिंद गोडबोले आदींची उपस्थिती होती. स्मृतीदिनाच्या औचित्याने मुख्याध्यापक ढवळे यांनी स्वच्छतेचे मानवी जीवनातील महत्त्व विशद केले.

अभियानाच्या सुरुवातीला ग्रामपंचायत कार्यालय व शाळेत गाडगेबाबा यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले व मुख्याध्यापक गंगाधर ढवळे व सहशिक्षक संतोष घटकार यांच्या मार्गदर्शनाखाली अभियानास प्रारंभ करण्यात आला. ओला व सुका कचरा वेगवेगळा गोळा करण्यात आला. त्यानंतर प्लास्टिकच्या बाटल्या, विविध खाद्यपदार्थांच्या वस्तूचे वेष्टन, रॅपर्स, रिकाम्या पाणी बॉटल्स, प्लॉस्टिकचे ग्लास, पाणी पाऊच, कॅरीबॅग, इतर प्लास्टिक वेस्टेजेस अशाप्रकारच्या कचऱ्याला एकत्रित करून नष्ट करण्यात आले.

# वंदे भारत ट्रेनचा विस्तार नांदेड पर्यंत

## रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे संबंधित विभागाला सर्वे करण्याचे निर्देश

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २० डिसेंबर**

नांदेड-हैदराबाद, नांदेड-नागपुर दरम्यान वंदे भारत ट्रेन सुरु करावी तसेच मुंबई-जालना वंदे भारत रेल्वे नांदेड पर्यंत विस्तारित व्हावी. शिवाय नांदेड रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छता या साठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी राज्यसभेत अतारांकित प्रश्न मांडले. या अनुषंगाने केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी वंदे भारत नांदेड पर्यंत विस्तारित करण्याचे अनुषंगाने संबंधित विभागाने तातडीने अहवाल सादर करावा अशी आदेश दिले आहेत त्यामुळे जालना पर्यंत येणारी वंदे भारत नांदेड पर्यंत येण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

मुंबई - जालना असलेली वंदे भारत रेल्वे नांदेड पर्यंत सोडावी यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्र्यांकडे यापूर्वीच पाठपुरावा केला होता. शिवाय राज्यसभेतही त्यांनी प्रश्न उपस्थित केला . खा.डॉ. अजित गोपछडे यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवी यांनी सकारात्मक उत्तर देत वंदे



भारत जालन्याहून नांदेड पर्यंत विस्तार करण्याचे अनुषंगाने सर्वे करण्यासाठी आपण संबंधित विभागाला आदेश दिल्याचे लेखी पत्र केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी खा. डॉ. अजित गोपछडे यांना पाठवले आहे. शिवाय या अनुषंगाने राज्यसभेत बोलताना केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले की , वंदे भारत ट्रेन सेवा समावेश व विस्तारासह गाड्यांच्या नवीन सेवांचा समावेश करणे हा रेल्वे मंत्रालयाचा चालू प्रक्रियेचा भाग आहे, जो प्रवासी मागणी, कार्यरत व्यवहार्यता, उपलब्ध संसाधने इत्यादींवर अवलंबून आहे. नांदेड रेल्वे स्टेशन परिसर स्वच्छतेच्या प्रश्ना संदर्भात रेल्वे मंत्रालयाने कळविले की, स्वच्छता हा सतत चालणारा प्रक्रियात्मक भाग आहे आणि भारतीय रेल्वे सर्व रेल्वे स्थानकांना व्यवस्थित देखभाल आणि स्वच्छ स्थितीत ठेवण्यासाठी सतत प्रयत्न करते. नांदेड स्थानक आणि परिसराची स्वच्छता सुनिश्चित करण्यासाठी, रेल्वे प्रशासनाने स्थानकाच्या जवळच्या रस्त्याच्या बांधकामाची समस्या सोडवण्याचे तसेच स्थानकाबाहेर असलेल्या दुकानदारांकडून रेल्वे हद्दीत कचरा टाकण्यास प्रतिबंध घालण्यासाठी स्थानिक प्रशासनाशी चर्चा केली आहे.असल्याचेही ते म्हणाले.

# चेन्नई येथिल जलतरण स्पर्धेत दिक्षा जोगेची निवड

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २० डिसेंबर**



एस.आर.एम.विद्यापीठ, चेन्नई येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर व्दियापीठीय जलतरण स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेडच्या संघात देगलूर महाविद्यालय, देगलूरची खेळाडू कु.जोगे दिक्षा हि खेळाडू ५० व १०० मी फ्रिस्टाइल व १०० मी ब्रेस्ट स्ट्रोक साठी निवड झाली आहे.या खेळाडूंचे महाविद्यालयाचे प्रशिक्षक म्हणून डॉ.निरजकुमार उपलंचवार तर प्रा.वावधाने दिपक व प्रा.हाके सिताराम यांचे मार्गदर्शन लाभले आहे.या यशाबद्दल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर,उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सचिव डॉ कर्मवीर उनग्रतवार, सहसचिव राजकुमार महाजन, कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार, गंगाधरराव जोशी, रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार, विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर, गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ , उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार, उपप्राचार्य प्रा. चमकुडे एम.एम. उपप्राचार्य डॉ.शेरिकर व्ही.जी.,पर्यवेक्षक श्री संग्राम पाटील,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी आभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### सुमनताई जिरोनेकर यांना राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत व्दितीय पुरस्कार

**उमरी**-उमरी तालुक्यातील जिरोणा या आदर्श गावातील रहिवाशी सुमनताई जिरोणेकर काव्यप्रेमी यांना काव्यप्रेमी महाराष्ट्राच्या वतीने घेन्यात आलेल्या राज्यस्तरीय काव्य स्पर्धेत पुरस्कार प्रधान करण्यात आला असून



सल्लग दुसऱ्यांदा राज्यस्थरीय पुरस्कार प्राप्त झाला आहे. उमरी तालुक्यातील मौ.जिरोणा येथील माजी सरपंच तथा जेष्ट कवयित्री, लेखीका, कथाकार साहितीक सुमनताई गणपतराव जिरोनेकर यांच्या माऊली ग तु माझी या कवितेला व्दितीय पुरस्कार मिळाला आहे. काव्यप्रेमी महाराष्ट्राचे संयोजक व शिव विचारवंत,साहितीक मार्गदर्शक भुमीपुत्र वाघ यांनी आयोजीत केली होती. या स्पर्धेत राज्यातुन राज्या बाहेरील मराठी कविनी भाग घेतला होता.या स्पर्धेत सौ.सुंमनताई जिरोनेकर याना व्दितीय पुरस्कार सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. हा सन्मानाचा पुरस्कार मिळाल्या बद्दल महाराष्ट्रातील साहित्ये प्रेमी,विचारवंत, राजकीय ,सामाजीक क्षेत्रातील मान्यवराने अभिनंदन केले. आ.अमितजी गोरखे (सदस्य विधान परिषध) समाजभुषन पुरस्कार प्राप्त जेष्ट कवी अण्णा धगाटे पुणे, साहितीक शंकरभाऊ तडाखे पुणे.जेष्टसाहितीक वानखेडे साहेब नागपुर, राष्ट्रपतिपुरस्कार प्राप्त शिवा कांबळेसर, प्राचार्य डॉ. माधव बसवंते सर, बालाजी थोटवे सर,पत्रकार व साहितीक मा.पंढरीनाथ बोखारे.भारत दाढेल, श्रेयश जिरोनेकर, डॉ.गणपतराव जिरोनेकर, स्नेहा जिरोनेकर. (दिल्ली) स्नेही, मित्र परिवार नातेवाईक.मौ.जिरोणा येथील सुदेवाड, आकुलवाड, आलकेवार जिरोनेकर, कोल्हेवाड, येगलेवाड, बारसेवा, पिल्लेवार, तुपसाखरे, पुपुलवाड, बरकुमे, डुमलवाड, चुनुपवाड, दर्शनवाड, सर्व गावकर्यांनी अभिनंदन केले.

### गिरीष देशमुख, विद्याभारती इंग्लिश स्कूल उमरीचे विद्यार्थी होमीभाभा परीक्षेस पात्र

**उमरी**-उमरी तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता क्रीडा क्षेत्र, स्पर्धा परीक्षा यात नामांकित ठरलेल्या गिरीष देशमुख, विद्याभारती इंग्लिश स्कूल उमरी ह्या शाळेतील विद्यार्थी वैद्यकिय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महत्वपूर्ण अशा नीट परीक्षेच्या पूर्व तयारी च्या दृष्टीने अत्यंत महत्वाची समजली



जाणारी डॉ.होमी भाभा परीक्षेत या शाळेचे पाच विद्यार्थी पात्र ठरले आहेत. बृहमुंबई विज्ञान अध्यापक मंडळाच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत गिरीष देशमुख , विद्याभारती ज्यु.कॉलेज उमरीचे पाच विद्यार्थी गणेश जाधव, श्लोक जैस्वाल, तनुजा शिंदे, कार्तिका टिप्रेसवार, प्रतिक राठोड हे विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत. बालपणा पासून विज्ञानाची आवड असणारे आणि भविष्यातील वैज्ञानिक शोधण्याच्या हेतूने या परीक्षेचे आयोजन केले जाते.या वर्षी नांदेड येथील महात्मा फुले विद्यालयात पार पडलेल्या जिल्हास्तरीय परीक्षेत शाळेचे वरील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले. सर्व यशस्वी विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे शाळेचे शिक्षक मोगल आवेज बेग व रशीद शेख सर यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष डॉ.विक्रम देशमुख , प्राचार्य विश्वजीत देशमुख, मुख्याध्यापिका स्वाती वचेवार मॅडम यांनी केले.

# गुरुजी फाऊंडेशनतर्फे बंधारे बांधण्याचा धुमधडाका

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २० डिसेंबर**

उमरी - धर्माबात तालुक्याक्यात शेतकरी यांची सिचंनाची गैरसोय दुरव्हावी पाण्याचा स्त्रोत वाढावा म्हणून कवळे गुरुजी फाऊंडेशन कुसुम नगर वागलवाडा यांचा तर्फे अनेक ठिकाणी बंधारे बांधण्यात येत आहेत. या संस्थेचे मुख्य प्रेरणास्त्रोत तसेच व्हीपीके ग्रुपचे संस्थापक चेअरमन मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांच्या हस्ते बंधारा भूमिपूजन करण्यात आले यावेळी गुरुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप मारोतराव पाटील कवळे उपस्थित होते.

गुरुजी फाऊंडेशनच्या माध्यमातून धर्माबाद व उमरी थोडक्यात चार ते पाच बंधारे बांधकाम करण्याचे उद्दिष्ट मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी व्यक्त केले बंधाऱ्यामुळे पाण्याची साठवणूक होऊन शेतकऱ्यांच्या बोर



विहिरीला पाण्याचे स्त्रोत वाढेल व उन्हाळ्यात गुराढोरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागणार नाही, बागायती शेतकऱ्यांना बंधाऱ्यामुळे पाणी साठविले जाईल त्याचा वापर ऊस हरभरा इत्यादी पिकांना मिळेल या भागचा उद्देश असून परिसरातील पाणी स्त्रोत वाढल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीसाठी उपयुक्त ठरेल, सदरील कार्यक्रमास सालेगाव व निमटेक गावातील बालाजी देवराव, श्रीनिवास पाटील, सुभाष गोरडकर, धोंडजी पाटील, सूर्यकांत पाटील, उत्तम पाटील, व्यंकटराव पाटिल, रावसाहेब भुतावळे, नागनाथ पाटील, पंडित शिवशंकर, सरपंच, शेतकरी व व्यापारी प्रतिष्ठित नागरिक व मधुकर शिंदे बोळसेसकर (उपाध्यक्ष गुरुजी फाऊंडेशन), पडोळे साहेब (सी.डी.ओ), प्रशांत कदम लक्ष्मण हरेगावकर, सुनिल जोगदंड, गुरुजी फाऊंडेशनचे समन्वयक बाबुराव भोसले सदस्य यु.जी.कदम कार्यवाह गुरुजी फाऊंडेशन कारखान्याचे सिव्हिल इंजिनिअर पवितवार गुत्तेदार सटवा पवार व असंख्य शेतकरी उपस्थित होते.

# डॉक्टर होमी भाभा परीक्षेत सुधांशू गाढे राज्यात प्रथम

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २० डिसेंबर**

मुदखेड तालुक्यातील मौजे पांगरगाव येथील सुधांशू नंदकिशोर गाढे इयत्ता सहावी या विद्यार्थ्याने यावर्षी घेण्यात आलेल्या डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत संपूर्ण राज्यातून प्रथम क्रमांक पटकावून राज्यात प्रथम येण्याचा मान पटकावला आहे.



सुधांशू नंदकिशोर गाढे हा शाकुंतल स्कूल फॉर एक्सलन्स चा विद्यार्थी आहे इयत्ता सहावी वर्गा तुन घेण्यात येणारी परीक्षा डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक स्पर्धा परीक्षा दरवर्षी घेण्यात येते ही परीक्षा इयत्ता सहावी वर्गासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते अशा या बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये सुधांशू चे यश हे खूप महत्त्वाचे मानल जाते या स्पर्धात्मक परीक्षेत सुधांशू नंदकिशोर गाढे याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल त्याचे भार्गव करिअर अकॅडमी नांदेडच्या वतीने, मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष हौसाजी गाढे, शाकुंतल संस्थेचे अध्यक्ष गिरीष जाधव यांच्या वतीने सुधांशुचे अभिनंदन करून पुढील परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

डॉक्टर होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल सर्व स्तरातून सुधांसु चे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# जलजिवन मिशन अंतर्गत कामाची चौकशी करा : काशिनाथ शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. २० डिसेंबर**

येथील जलजिवन मिशन अंतर्गत सार्वजनीक नळ योजना पाणी पुरवठ्याचे काम अतिशय बोगस व निकृष्ट दर्जाचे होत असून, सदर कामाची तक्रार मा. जिल्हाधिकारी नांदेड व संबंधित जिवन प्राधिकरण मंडळ नांदेड यांच्याकडे करूण चौदा दिवसांचा अवधी संपुष्टात येत असल्याने सध्यातरी चौकशी गुलदस्त्यात आहे.

इस्लापूर येथील सार्वजनीक नळ योजना पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी शासनाकडून लाखो रूपयाचा विकास निधी मंजूर झाला. प्राप्त निधीतून सदर नळ योजनेचे काम करण्यात येत आहे. या नळ योजना कामात ठेकेदार हे मनमानी पद्धतीचा अवलंब करून अतिशय निकृष्ट व थातूरमातूर कामे उरकण्यात येत आहेत. या संदर्भांची तक्रार दि. ५ डिसेंबर २०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी व तसेच जिवन प्राधिकरण मंडळ नांदेड यांच्याकडे काशिनाथ शिंदे यांनी निवेदन देऊन केली होती. परंतु तक्रार देऊन जवळपास पंधरवडा



उलटत चालला आहे. मात्र अद्यापपर्यंत सदर प्रकरणाची चौकशी झाली नाही. म्हणून दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी पुन्हा एकदा जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन उपरोक्त प्रकरणाची सखोल चौकशीची मागणी भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी केली असता, त्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत मी स्वतः लक्ष घालणार असल्याचे जिल्हाधिकारी अभिजित राऊत यांनी सांगीतले.

# महाताळा ग्रामपंचायतच्या वतीने प्लास्टिक मुक्त मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. २० डिसेंबर**

प्लास्टिक त्यांचे मानवी आरोग्यावर पर्यावरणावर होणारे घातक परिणाम जगभरातील दैनिकांमध्ये मथळे बनवत आहेत दुर्दैवाने तो घराचा आणि दैनंदिन कार्याचा अभिभाज्य भाग बनला आहे असे तरी तरी प्लास्टिक आपल्या आरोग्यावर नैसर्गिक साधनावर आणि पर्यावरणावर आक्रमण करत आहे ग्रामपंचायत महातळा नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कर्णवाल मॅडम यांच्या आदेशानुसार महाताळा हे गाव दत्तक घेतले आहे प्लास्टिक मुक्त करण्याचे नांदेड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व हदगाव पंचायत समितीचे समूहक समन्वयक अधिकारी सचिन डुरे ग्रामपंचायत कार्यालय महाताळा येथील ग्रामसेवक रमेश मुपडे सरपंच



नितीन कुलदीपकर उपसरपंच प्रशांत सूर्यवंशी सन्माननीय ग्रामपंचायत सर्व सदस्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महातळा मुख्याध्यापिका सौ. जयश्री मुंडे. सहशिक्षक राजीव सावरकर ग्रामपंचायत कर्मचारी सुदर्शन सूर्यवंशी. प्रकाश भांडवले.

रोजगार सेवक शेषराव तपाषे. अंगणवाडी सेविका सौ सुनीता ताई आशा वर्कर व गावातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व शालेय विद्यार्थी यांनी आज जनजागृती करून गावामध्ये रॅली काढण्यात आली आहे व गावातील सर्व जनतेला प्लास्टिक बद्दल माहिती देऊन विद्यार्थ्यांने घोषणा सुद्धा दिले आहेत आपलं गाव प्लास्टिक मुक्त कसं करायचं या अभियानामध्ये दाखवण्याचा प्रयत्न केला आहे दर गुरुवारी महाताळा ग्रामपंचायत च्या वतीने स्वच्छता कार्यक्रम राबवण्यात येणार आहे असे सर्व गावकऱ्यांना कळविले.

# वाल्मिक कराडवर कारवाई होणारच

## प्रसंगी मकोकाही लावणार; सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावर मुख्यंत्र्यांच्या निवेदनावर जनतेतून आनंद व्यक्त




**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली असून याप्रकरणी आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात निवेदन सादर केलं. हत्या प्रकरणातील आरोपी कोणाशीही संबंधित असतील तरी त्यांच्यावर कारवाई होणारच, अशी भूमिका मुख्यमंत्र्यांनी मांडली आहे.वाल्मिक कराड याच्यावर खंडणीप्रकरणी कारवाई होईल आणि हत्येत सहभाग असेल तर त्याप्रकरणीही कारवाई होईल, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली आहे.



संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाविषयी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, वाल्मिक कराड याच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल झाला आहे. त्यानंतर मस्साजोग इथं सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या दोन्ही गुन्ह्यांचा काय संबंध आहे, याची आपण चौकशी करत आहोत. मी या सभागृहाला आश्वस्त करू इच्छितो की, या गुन्ह्याचा मास्टरमाईंड कोणीही असला तरी त्याच्यावर कारवाई केली जाईल. आपण वारंवार वाल्मिक कराडचं नाव घेतलं म्हणून सांगतो, तो कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे, कोणा-कोणासोबत फोटो आहे याचा विचार न करता कारवाई केली जाईल, असं फडणवीस यांनी सांगितलं.

### आरोपींवर मकोकाही लावणार

०ज्या प्रकारे बीड जिल्ह्यात अराजकताचं राज्य तयार करण्याचा प्रयत्न होतोय, कोणावरही खोटे गुन्हे दाखल करायचे चुकीचे प्रकार घडत आहेत. मी तेथील डीजींनाही सांगितलं की, यात पोलीस प्रशासनाचाही दोष आहे. मध्यंतरीच्या काळात निर्ढावलेल्या लोकांनी चुकीचं काम केलं आहे. हे सहन केलं जाणार नाही. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कृत्य करणाऱ्यांची पाळंमुळं खोदून काढू. यांच्यावर ३०२ कलमान्वये तर कारवाई होईलच, पण त्यासोबतच यांच्यावर एकत्रित अनेक गुन्हे आहेत. त्यामुळे हे सगळे मकोकाच्या गुन्ह्याला पात्र होतात. त्यांच्यावर मकको लावून तडीपार केलं जाईल. जे लोक या गुन्ह्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामील आहेत त्यांनाही संघटित गुन्हेगारीचा भाग समजून मकोका अंतर्गत कारवाई केली जाईल, अशी घोषणा देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

## राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थेसंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांची तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

गेवराई विधानसभा मतदार संघातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ व ६१ या दोन्ही महामार्गाची अत्यंत दुरावस्था झाली आहे. महामार्गावर ठिकठिकाणी पडलेले खड्डे, खचलेले रस्ते यामुळे वाहनाचे अपघात होवून होत असलेली जीवीतहानी याबाबतचे गांभीर्य लक्षात घेवून आ.विजयसिंह पंडित यांनी महामार्गाच्या देखभाल, दुरुस्ती आणि डागडुजीच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार केली आहे. या बाबत तात्काळ कार्यवाही न झाल्यास केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री ना.नितीन गडकरी यांना बोलणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले आहे.

गेवराई विधानसभा मतदार संघातून सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ आणि कल्याण-विशाखापट्टनम राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ हे दोन राष्ट्रीय महामार्ग जातात. या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर खड्डे पडलेले आहेत, महामार्गाची वेळेवर देखभाल आणि दुरुस्ती होत नसल्यामुळे अनेक ठिकाणी माती खचून अक्षरशः गतीरोधकाप्रमाणे महामार्गाची अवस्था झालेली दिसून येते. अनेक ठिकाणी महामार्गाच्या दुरावस्थेमुळे रस्ते अपघात होवून प्रवाशांना जीव गमावण्याची दुर्दैवी वेळ आली आहे. महामार्गावर वाहन धारकांकडून टोल वसुली होत असतानाही रस्त्याची दुरावस्था का ? असा सवाल उपस्थित करून गेवराई विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार विजयसिंह पंडित यांनी या बाबत लेखी तक्रार संबंधितांकडे केली आहे.

महाराष्ट्र विधीमंडळ अधिवेशनाच्या निमित्ताने नागपूर येथे असताना आ.विजयसिंह पंडित यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाचे छत्रपती संभाजीनगर येथील प्रकल्प संचालकांना लेखी पत्र देवून सोलापूर-धुळे या राष्ट्रीय महामार्गाच्या दुरावस्थे बाबत तक्रार केली आहे. बीड ते शहागड दरम्यान शंभराहून अधिक ठिकाणी महामार्गाचा मोठा भाग खचलेला असून रस्त्यावर गतिरोधकासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी रस्त्याचे फलक गायब आहेत, पथदिव्यांचे खांब कोलमडलेल्या अवस्थेत आहेत, ओव्हरब्रीजला ज्याठिकाणी सर्व्हिस रोड जोडला जातो तेथे मोठमोठे खड्डे पडल्यामुळे वाहन धारकांना त्रास सहन करावा लागतो, महामार्गावर दररोज अपघात होत असल्यामुळे वाहन धारक त्रस्त झाल्याचेही त्यांनी तक्रारीत नमुद केले आहे.



कल्याण-विशाखापट्टनम राष्ट्रीय महामार्ग ६१ बाबत आ.विजयसिंह पंडित यांनी रस्ते वाहतुक मंत्रालयाच्या नवी मुंबई स्थित मुख्य अभियंत्यांकडे लेखी तक्रार नोंदविली आहे. सिरसदेवी येथे पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे महामार्गाला पावसाळ्यात तलावाचे रुप येते, ऐन रस्त्याच्या मध्यभागी मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होत आहे. तिंतरवणी ते सावरगाव दरम्यान रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असून रस्त्याची वेळेवर डागडुजी न झाल्यामुळे अनेकांचे प्राण गेल्याचेही त्यांनी तक्रारीत नमुद केले आहे. या सर्व प्रकाराला आपला विभाग जबाबदार असल्याचे त्यांनी नमुद केले आहे. तक्रारीची वेळेवर दखल न घेतल्यास केंद्रीय रस्ते वाहतुक मंत्री नितीन गडकरी यांच्याशी आपण बोलणार असल्याचे त्यांनी सांगितले. आ.पंडित यांनी महामार्गाच्या दुरावस्थेकडे लक्ष केंद्रीत केल्यामुळे वाहन धारकांनी समाधान व्यक्त केले आहे.

## बीडच्या पोलीस अधीक्षकांची बदली

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**



मस्साजोगच्या सरपंच हत्याप्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात मोठी घोषणा करताना पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करण्याचा निर्णय घेतला आहे. हत्या प्रकरणात पोलीस अधीक्षक यांच्या कार्यावर ठपका ठेवत फडणवीस यांनी ही मोठी घोषणा केली.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यामुळे हिवाळी अधिवेशनात याचे पडसाद उमटत होते. मुख्यमंत्री देंवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांच्या प्रश्नांना उत्तर देताना आज सभागृहात दोषींवर कठोर कारवाईचा इशारा दिला. तसेच याप्रकरणातील दोषींवर मकोका लावणार असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान पोलीस अधीक्षक यांच्या हलगर्जीपणामुळे आता त्यांची उचलबांगडी करण्याचा निर्णय घेण्यात आला असून बीडला कोणत्या अधिकाऱ्याची नियुक्ती होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाअंतर्गत आज दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी संत गाडगेबाबा महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाविद्यालय परिसरात प्रतिमापूजन व अभिवादन करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे होते ते म्हणाले संत गाडगेबाबा महाराज हे अस्वच्छता चे संपूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी एक कार्य करणारे संत होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, डॉ उत्तम साळवे, डॉ सारंग जोशी, डॉ छत्रपती पांगरकर, डॉ रमेश खंडागळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे, डॉ.सुहास जोशी, डॉ. संगीता ससाने, व राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

## ज्येष्ठ विधीज्ञ यू.डी चपळगावकर यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**



बीड जिल्हा वकील संघाचे सदस्य तथा महावितरण चे वकील सिनियर अ‍ॅडव्होकेट. यु.डी.चपळगावकर (वय ८६) यांचे आज वयोवृद्ध पणामुळे दुःखद निधन झाले.

ज्येष्ठ विधीज्ञ यु.डी.चपळगावकर साहेब हे जुन्या पिढीतील वकील, सर्वांचे मार्गदर्शक, प्रेरणास्थान होते. महावितरण सह विविध संस्थेचे सल्लागार, दिवाणी व फौजदारी या दोन्हीही प्रकरणात काम करणारे चपळगावकर साहेब यांचे दुःखद निधन संभाजीनगर येथे झाले त्यामुळे वकील संघाची मोठी हानी झालेली आहे. सर्व सहकारी व् ज्युनियर वकिलां सोबत प्रेमाने व विनोदाने वागणारे, सर्वांना नेहमीच सहकार्य करणारे चपळगावकर साहेब यांची सर्व वकील संघ सदस्यांना सतत आठवण येत राहील. ते नेहमी संपर्कात असायचे.

## शिक्षण व सहकार क्षेत्रातील रामदासजी करांडे यांचे दु:खत निधन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० डिसेंबर**

तालुक्यातील सिंदखेड गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच परमपूज्य गुरु गणपत बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, सिंदखेड चे संस्थापक अध्यक्ष रामदास करांडे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृध्दापकाळाच्या आजाराने मंगळवार दि.१७ रोजी सिंदखेड येथील राहत्या घरी निधन झाले.



तालुक्यातील सिंदखेड गावातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच शिक्षण व सहकार क्षेत्रात अग्रेसर असणारे तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. संचालक, बीड जिल्हा औद्योगिक सहकारी संस्था मर्या.बीडचे संचालक, गेवराई तालुका खरेदी विक्री संघ लि.गेवराई चे संचालक, ग्रामपंचायत सिंदखेड सरपंच, सेवा सहकारी संस्था सिंदखेडचे चेअरमन, सेवा सहकारी सोसायटी जव्हारवाडी चेअरमन असे विविध पदे भुषवणारे त्याच प्रमाणे परमपूज्य गुरु गणपत बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, सिंदखेड चे संस्थापक अध्यक्ष रामदास करांडे यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी वृध्दापकाळाच्या आजाराने मंगळवार दि.१७ रोजी सिंदखेड येथील राहत्या घरी निधन झाले. त्यांच्या वर बुधवार दि.१८ रोजी सिंदखेड या त्यांच्या मुळ गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक व आप्तेष्ट मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, दोन सुना, जावाई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने सहकार व शिक्षण क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे. या घटनेमुळे करांडे कुटूंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## रेल्वे पुलाच्या कामासाठी वळण रस्ता २० दिवस बंद
# पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर**

बीड शहरानजिक रेल्वे पूलाचे काम सुरु असल्याने मार्गालगत असणारा वळण रस्ता बंद करण्यात येणार असून वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सध्या कपिल मुनी मंदिर पासून ज्या मार्गाने बीड रोड ओलांडून वाहने सध्याच्या वळण रस्त्याने जातात त्या रेल्वेमार्गालगतच्या वळण रस्त्यावर वाहतूक पुढील १५ ते २० दिवस बंद राहणार आहे, असे रेल्वेतर्फे जारी एका प्रसिध्दीपत्रात म्हटले आहे.



## बीडमध्ये चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे आयोजन

### चंपावती महोत्सवात नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धेचा समावेश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सवात यावर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी नवं कलाकारांची पिढी समृद्ध होणं गरजेचे आहे. बालकलाकारांच्या अर्थातच शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा या उदात्त हेतूने गतवर्षी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि बीड कलावंतांनी एकत्रित येऊन नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला अशा विविध कलेच्या स्पर्धांना एकत्रित करून बीड शहरात जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवासाठी बीड जिल्ह्यातील आकारा तालुक्यातील शेकडो शाळांमधील तब्बल ८४४४ बालकलाकार सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारी चंपावती महोत्सव पुन्हा एकदा व्हावा अशी इच्छा जिल्ह्याभरातून बालक पालक तथा शाळा शिक्षकांनी व्यक्त करत होते. यामुळे पुन्हा एकदा यावर्षी भव्य दिव्य चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. चंपावती महोत्सव जानेवारी महिन्यात नियोजित असून तारीख व स्पर्धेचे वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांनी सांगितले आहे.




सर्वोत्कृष्ट शाळेस मिळणार महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक

चंपावती महोत्सवामध्ये समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य, जोडी नृत्य, एकपात्री अभिनय, गीतगायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, फॅमिली डान्स आणि नव्याने वक्तृत्व स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात पारितोषिके, प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत तर प्रत्येक स्पर्धा प्रकारातील संपूर्ण सहभागी स्पर्धकास प्रमाणपत्रही देण्यात येणार आहेत. याबरोबरच जी शाळा नृत्य, गायन, एकपात्री अभिनय, चित्रकला यासह सर्व स्पर्धा प्रकारातून सर्वाधिक बक्षीसांची संख्या प्राप्त करेल त्या शाळेस जिल्यातील सर्वोत्कृष्ट शाळा महाराष्ट्र राज्य उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक (बेस्ट स्कूल ऑफ दी इयर चॅम्पियनशिप) बहाल करण्यात येणार आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## छत्रपती संभाजीनगर व लातूर येथे सोलर पॅनल देखभाल व दुरुस्ती प्रशिक्षण कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर,दि.२० : महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अमृत' संस्थेच्या लक्षीत खुल्या प्रवर्गाच्या गटातील उमेदवारांसाठी सोलर पॅनल देखभाल व दुरुस्तीचा निवासी मोफत प्रशिक्षण कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर व लातूर येथे होणार आहे. इच्छुक व गरजू युवक युवतींनी लाभ घ्यावा,असे आवाहन महाराष्ट्र उद्योजकता विकास प्रशिक्षण केंद्राच्या वतीने करण्यात आले आहे.

सौर उर्जला प्राधान्य देण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यामुळे शासनाच्या वतीने अनुदान देऊन अनेक ठिकाणी सोलार पॅनेल बसून वीज पुरवठा, कृषी पंप इ. बसविण्यात येत आहेत. त्यामुळे आगामी कालावधीत सोलर पॅनेलची उभारणी, देखभाल, दुरुस्ती इ. कामांसाठी प्रशिक्षीत मनुष्यबळ तयार करणे हे या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून बेरोजगार युवकांना रोजगार व उद्योग करण्याची संधी उपलब्ध होईल. प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थींची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे करण्यात येणार आहे. तसेच मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यातून एक याप्रमाणे उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना छत्रपती संभाजी नगर व लातूर येथे दि.७ ते २४ जानेवारी २०२५ या कालावधीत तांत्रिक व उद्योजकीय प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

पात्रताः- प्रशिक्षण खुल्या प्रवर्गातील 'अमृत' लक्षीत गटातील उमेदवारांसाठी आहे. प्रवेशासाठी पात्रता शिक्षण किमान १२ वी उत्तीर्ण, पदवीधर व तांत्रिक पदवीधारकास प्राधान्य असून वयोमर्यादा २१ ते ५० वर्ष आहे.

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रेः- शैक्षणिक गुणवत्ता प्रमाणपत्र/गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, पॅन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, जातीचा उल्लेख असलेला कोणत्याही शासकीय कागदपत्राचा पुरावा, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखापेक्षा कमी असल्याबाबत तहसिलदारांचा उत्पन्नाचा दाखला, विवाहित असल्यास महिलांसाठी गॅझेट किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा पॅन कार्ड इ. प्रवेश अर्ज सोबत झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक आहे.

अर्ज करण्याची पद्धतीः- इच्छुक उमेदवारांनी ु.ारहरर्ीीिं. ीस.ळप या वेबसाईटवर आपला अर्ज अपलोड करून, अर्जाची हार्ड कॉपी व अर्जासोबत आवश्यक कागदपत्राची झेरॉक्स प्रत जोडून संबंधित जिल्ह्यातील जिल्हा प्रकल्प अधिकारी द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी प्रत्यक्ष सादर करावा.

दि.२३ रोजी प्रशिक्षण परिचय कार्यक्रमः- जिल्हा कार्यालयामध्ये प्रवेश अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १ जानेवारी २०२५ आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी सोमवार दि. २३ डिसेंबर २०२४ रोजी एम सी ई डी जिल्हा कार्यालय येथे एकदिवसीय निःशुल्क परिचय कार्यक्रम आयोजीत केला आहे.

अधिक माहितीसाठी संबंधित सर्व जिल्ह्याचे प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र किंवा उद्योग भवन या ठिकाणी संपर्क साधावा व प्रवेश अर्ज सादर करावा असे आवाहन 'अमृत' चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी, एमसीईडीचे कार्यकारी संचालक बी. टी. यशवंते आणि उद्योग सहसंचालक सुदाम यांनी केले आहे.

## राष्ट्रसंत गाडगेबाबा यांना अभिवादन



पैठण दि २० :- अन्नपूर्णा नगर येथे राष्ट्रसंत श्री गाडगे बाबांच्या ६८ व्या पुण्यतिथी निमित्त संत गाडगे महाराज त्यांच्या प्रतिमेची महाआरती करूण अभिवादन करण्यात आले.

यावेळी डॉ राधाकृष्ण जाधव, भाऊसाहेब धोंगडे, सुरेश जाधव, शिवाजी तरटे, एकनाथ जाधव ,अरूण धोंगडे, ज्ञानेश्वर तरटे,रोहित चन्ने,हर्षवर्धन धोंगडे,फौजदार जाधव ,राजेंद्र जाधव ,सतिष आदमाने, , कार्तिक धोंगडे,सुधिर आदमाने ,यश कदम, गणेश आदमाणे ,दादासाहेब आदमाणे,आकाश तेलंगे, जिजाबाई लोंदे, गंगासागर धोंगडे, अनिता जाधव, सुनंदा धोंगडे,आरती धोंगडे,सुरेखा तरटे, सोजरबाई तरटे, संगिता जाधव ,जया आदमणे,सुनिता मोरे,रेणुका मोरे ,वंदना मोरे, योगिता मोरे, शारदा मोरे ,सुजाता मोरे ,आदि महिला मंडळा सह मोठया संख्येने समाज बांधव उपस्थिती होते.

## सोयगाव येथे विद्यार्थ्यांनी गाव स्वच्छ करुन केले अभिवादन



सोयगाव,दि.२० डिसेंबर : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगर येथे स्वच्छतेचे जनक राष्ट्रसंत गाडगे महाराज पुण्यतिथीनिमित्त शाळेचे विद्यार्थी,शिक्षक,पालक,शालेय व्यवस्थापन समिती यांनी हातात झाडू घेऊन शालेय परिसर व संपूर्ण काळेनगर भाग स्वच्छ करून राष्ट्रसंत गाडगे महाराजांना अभिवादन केले. तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी गाडगे महाराजांचे भजन गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला याचे गायन केले.यावेळी समाजसेवक राजू कुडके,समाजसेवक शिक्षण प्रेमी योगेश बोखारे,शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील,सहशिक्षक गोपाल चौधरी,प्रशिक्षक शिक्षक शिवम देसले व विद्यार्थी पालक उपस्थित होते.

## किर्तनातून शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्व पटवून गाडगेबाबा यांची पुण्यतिथी साजरी



सोयगाव,दि.२० डिसेंबर

सोयगाव शहरातील संत गाडगेबाबा चौक येथे कीर्तनातून शिक्षणाचे व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणारे संत गाडगेबाबा यांची ६८ वी पुण्यतिथी निमित्ताने समाजाचे जेष्ठ व समाजसेवक भागवत रोकडे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी सोयगाव शहरातील नगरसेवक संदीप सुरडकर,राजू दुत्तोंडे,कृषी भूषण अरुण सोहणी,योगेश बोखारे,बापू काळे,दत्तू सोनवणे,अनिल इंगळे,रमेश चक्के, समाधान काळे,किरण ताडे,भागवत रोकडे,अण्णा जाधव,सुनील रोकडे,दत्तू रोकडे, कृष्णा शेवाळकर,सुरेश महाले,संतोष महाले, लोकेशन इंगळे,गोपाळ रोकडे,धर्मेंद्र रोकडे,आदींसह धोबी (परीट) समाज बांधव उपस्थिती होते.

## बिडकीन पोलीसांची जुगार अड्ड्यावर कारवाई; साडे आठ लाखाचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २० डिसेंबर : पैठण तालुक्यातील बिडकीन पोलीस ठाण्याच्या हद्दीतील फारोळा जवळील शिवणी तलावाच्या बाजूला एका शेतात सूरु असलेल्या जुगारअड्ड्यावर बिडकीन पोलीसांनी धाड टाकून ८,५९,५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



कलम ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे बिडकीन सहाय्यक पोलीस निलेश शेळके यांच्या फिर्यादीवरुन ११ आरोपी आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे आरोपीचे आंगझडती मध्ये अन् डावावर लावलेले नगदी २,०७,०००- रुपये, आरोपींनी जुगार खेळण्यासाठी येण्यास वापरलेल्या १० दुचाकी मोटर सायकल किंमत अंदाजे ४,१०,०००- रुपये आरोपीचे आंगझडती मध्ये तसेच घटना स्थळा वर मिळालेले एकूण १३ मोबाईल फोन किंमत अंदाजे २,४१,५००- रुपये घटनास्थळावर जुगार खेळण्यासाठी वापरलेल्या ५२ ताश पत्ते , सतरंजी असे १,०००- रुपयेचा मुद्देमाल असा घटनास्थळा वर एकूण ८,५९,५०० रुपयाचा मुद्देमाल मिळून आला असून तो जप्त करण्यात आला आहे.

छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस अधीक्षक डॉ विनयकुमार राठोड, अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार, पैठण उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे यांचे मार्गदर्शनाखाली बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके ,उपनिरिक्षक अशोक माने, सहाय्यक उपनिरिक्षक अशोक सोकटकर, संजीवन कदम, पवन चव्हाण, विष्णु गायकवाड, योगेश नाडे, शनी वाघमोडे यांनी कारवाई केली.

## सोपानराव गव्हांडे पा. यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्डने सन्मानित

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० डिसेंबर : दिल्ली येथे नुकतेच भारतीय दलित साहित्य अकादमीचे तीन दिवसीय संम्मेलन पार पडले या संम्मेलनात देशातून विविध राज्यातील दोन ते तीन हजार बहुजन समाजातील बांधवांनी भाग घेतला होता,त्यामधील काही सामाजिक बांधिलकीतून सामाजिक कार्य करणाऱ्या व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान व साहित्याचा तसेच बहुजन समाजातील गरीब घटकाला सहाय्य करणारे व शासकीय योजनांचा तळागाळातील लोकांपर्यंत योजना घेऊन जाणारे व मदत करणाऱ्या समाज बाधवांचा समान केला जातो या वर्षांत ऊत्तम काम करणारे सोयगाव तालुक्यातील घोसला येथील मराठा प्रतिष्ठाण चे संस्थापक अध्यक्ष सोपान पुंडलीक गव्हांडे पाटील यांना



डॉ.बाबासाहेब आंबेडकर फेलोशिप नॅशनल अवॉर्ड देऊन सोहनपाल सुमनाक्षर यांनी सन्मानित केले आहे. सोपान गव्हांडे पाटील हे एक सामाजिक बांधिलकीतून कार्य करणारे समाज सेवक असून ते नेहमीच शैक्षणिक,सांस्कृतिक व क्रीडाक्षेत्रात कायम भरीव काम करीत असतात, सोपान गव्हांडे पाटील यांना हा पुरस्कार मिळाल्याने सर्व श्रेत्रातील समाज बांधव त्यांचे अभिनंदन करित आहेत.

## 'देवगिरी गीतगुंजन' कार्यक्रमाने रसिक मंत्रमुग्ध

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

देवगिरी महाविद्यालयाच्या कनिष्ठ संगीत विभागातर्फे १५ व्या 'देवगिरी गीतगुंजन' कार्यक्रमाचे गुरुवारी, १९ डिसेंबर रोजी रवींद्रनाथ टागोर सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन गायक, संगीतकार प्रा. गजानन केचे यांनी केले. यावेळी ज्येष्ठ संगीततज्ज्ञ पं. विश्वनाथ ओक, प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, पंडितराव हर्षे, उपप्राचार्य प्रा. सुरेश लिपाने, प्रा. नंदकिशोर गायकवाड, प्रा. विजय नलावडे, पर्यवेक्षक प्रा. रवींद्र पाटील, संगीत विभागप्रमुख डॉ. तुकाराम वांढरे, प्रा. जितेंद्र साळवी यांची प्रमुख उपस्थिती होती.

**जितेंगे 'शान से'** – डॉ. तुकाराम वांढरे आणि पार्थ ओक यांनी गायलेल्या गणेश स्तवनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. वेदिका सौंदनकर हिने शंखनाद केला. आरोही मेने, आरती बोधने, दीपाली बनसोडे यांनी 'शान से' गीत सादर केले. 'हमारी अधूरी कहानी', 'साथिया', 'वादा ना तोड' ही गाणी दत्तू जाधव, सानिका घोरपडे, प्रणाली सोमवंशी यांनी गायली. आरती बोधने आणि भक्ती बुरांडे यांनी गिटारवर हिंदी गाण्यांचे मॅशअप सादर करीत रसिकांना खिळवून ठेवले. कार्यक्रमात भावगीत, लोकगीत, देशभक्तीपर गीत, चित्रपटगीत, युगलगीत, लावणी नृत्य, भजन सादर करण्यात आले.

**गीत–नृत्याची जुगलबंदी** – 'नटरंग उभा' या गीतावर अनुष्का मोखाडे हिने नृत्य सादर केले. राणी दोडके, वैशाली सोनकांबळे, दीपिका दिनकर, सानिका घोरपडे गाणी व नृत्याची जुगलबंदी सादर केली. 'आजा नच ले' आणि 'राफ्ता राफ्ता' या गीतांवर नेहा चोपडे, पायल पगारे, तृप्ती निखाते, दीक्षा जोंधळे आणि गायत्री काळे यांनी नृत्य केले. 'मला जिजाऊ, सावित्री, रमाईमाता तुमच्यामध्ये दिसावी' या प्रेम सुपळकर याने गायलेल्या गीताला रसिकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. 'गुलाबी साडी' गीतावर कोमल खंडागळे आणि श्रद्धा वाहूळ यांनी नृत्य केले. प्रा. जितेंद्र साळवी यांनी ढोलकी सोलो सादरीकरण केले. 'शूर आम्ही सरदार', 'जय जय महाराष्ट्र माझा' या गीतांनी सांगता करण्यात आली. श्रुती शितोळे, साक्षी काळे, सुहानी शिंदे, सुदर्शन जाधव, आकांक्षा महाजन, पूनम कीर्तीकर, रमा वाघमारे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष खंडागळे, जितेंद्र साळवी, विनोद वाव्हळ, मयूर मस्के यांनी संगीत साथसंगत केली. या कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मौलाना आझाद शैक्षणिक ट्रस्ट व मौलाना आझाद शैक्षणिक सोसायटीच्या अध्यक्षपदी डॉ. रऊफ सत्तार पठाण

छत्रपती संभाजीनगर

डॉ. रऊफ सत्तार पठाण (छत्रपती संभाजी नगर) यांची मौलाना आझाद शैक्षणिक ट्रस्टचे अध्यक्ष व मौलाना आझाद शैक्षणिक सोसायटीचे अध्यक्ष म्हणून तर श्री. महमद नवीद रोगे, सुप्रसिद्ध चार्टर्ड अकाउंटंट (मुंबई), सामाजिक कार्यकर्ते श्री. इकबाल महमद परकार (मुंबई), स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक श्री. अशरफ इब्राहीम आंजर्लेकर एम. ए. एड, एलएलबी (रत्नागिरी) यांची ट्रस्टचे ट्रस्टी नियुक्ती

डॉ. रऊफ सत्तार पठाण यांची मौलाना आझाद शैक्षणिक ट्रस्टचे अध्यक्ष व मौलाना आझाद शैक्षणिक सोसायटीचे अध्यक्ष व श्री. महमद नवीद रोगे, श्री. इकबाल महमद परकार, श्री. अशरफ इब्राहीम आंजर्लेकर यांची ट्रस्टी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या शैक्षणिक, संशोधन आणि सामाजिक कार्यात केलेल्या महत्वपूर्ण योगदानांमुळे या ट्रस्टचा मार्गदर्शन आणि नेतृत्व यामध्ये आणखी उंची मिळेल.

अब्दुल अजीज मुल्ला (ट्रस्टचे वरिष्ठ सदस्य) यांनी यांची नियुक्ती केली आहे. त्यांनी डॉ. रफीक झकरिया यांच्या ध्येयाची आणि कार्याची सदैव साथ दिली आहे. आज ते कामात व्यस्त असल्याने प्रेस कॉन्फरन्सला उपस्थित राहू



शकणार नाहीत, पण त्यांनी या नव्या नेतृत्वाला शुभेच्छा दिल्या आहेत.

डॉ. रफीक झकरिया कॅम्पस हे सहनशीलता, समर्पण आणि वंचित समाजाला शैक्षणिक संधी देण्याचे एक प्रतीक आहे. कॅम्पसचे मूळ १७ व्या शतकातील एक मदरशा असताना आज ते एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक केंद्र बनले आहे. कॅम्पसच्या उज्वल भविष्यासाठी डॉ. रऊफ पठाण यांच्या नेतृत्वाखाली नव्या योजनांची अंमलबजावणी केली जाईल.

**ट्रस्टचे ध्येय :** १. गुणवत्तेची शैक्षणिक संधी सर्वांसाठी, विशेषतः वंचित आणि अल्पसंख्याक समाजाच्या लोकांसाठी विशेष प्रयत्न करणे. २. धर्मनिरपेक्ष मूल्यांचा समावेश उच्च शिक्षण आणि संशोधनावर भर देणे. ३. मानव संसाधन विकास कौशल्ये, व्यावसायिक क्षमता आणि वैयक्तिक विकासामध्ये सुधारणा करणे. ४. आंतरराष्ट्रीय सहकार्य शैक्षणिक समुदायात आंतरराष्ट्रीय बंध निर्माण करणे. ५. परंपरा आणि तंत्रज्ञानाचा संगम पारंपारिक ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या मिश्रणाने एक अद्वितीय शिक्षण वातावरण निर्माण करणे. ६. सामाजिक परिवर्तनासाठी शिक्षण ज्ञान, संशोधन आणि व्यावसायिक कौशल्यांच्या माध्यमातून सामाजिक न्याय आणि समानतेचा प्रसार करणे.

या ध्येय धोरणसाठी त्यांच्या उज्वल मार्गासाठी आम्ही डॉ. रफीक झकरिया कॅम्पसच्या उज्वल भविष्याबद्दल अत्यंत उत्साहित आहोत. नवीन नेतृत्वासह, मोहम्मद नवीद रोगे, अशरफ इब्राहीम अंजर्लेकर, इकबाल महमद पार्कर आणि डॉ. रफीक सत्तार पठाण हे सर्व ट्रस्टचे आयुष्यभराचे विश्वस्त पुढील कार्याचा मार्गदर्शन करणार आहेत.

## महाविकास आघाडीचे तहसीलदारांना निवेदन.केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी देशवासीयांची माफी मागावी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२० डिसेंबर

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी केलेल्या निषेधार्थ बेताल वक्तव्या बाबत देशातील करोडो भारतीय नागरिकांच्या भावना दुखावल्या असुन सोयगाव शहरातील महाविकास आघाडी नेत्यांनी शुक्रवारी (दि.२०) डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णिकृती पुतळ्यास अभिवादन करून सोयगावच्या तहसीलदारांना संतप्त होत निवेदन देण्यात आले असुन तात्काळ केंद्रीय गृहमंत्री शहा यांनी सर्व भारतीयांची जाहीर माफी



मागावी अशी मागणी केली आहे. यावेळी शिवसेना(उध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षाचे तालुकाप्रमुख दिलीप मचे,काग्रेस तालुका अध्यक्ष राजेंद्र काळे,अंकुश पगारे रिपब्लिकन सेना सोयगाव तालुका अध्यक्ष,भरत पगारे आर.पी.आय.(राजरत्न आंबेडकर), शिवसेना शहरप्रमुख रविंद्र काटोले,गणेश कापरे,बबन रोकडे,दिपक बागुल,सुरेश फुसे,गुलाबराव कोलते,सुधाकर शिंदे,राजेंद्र गव्हाड,मुरलीधर चव्हाण,अजय नेरपगारे,कृष्णा जुनघरे ,यांच्या सह तालुक्यातील महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कन्नड तालुका वकिल संघाची आज निवडणूक; कोणाच्या गळ्यात पडणार अध्यक्षपदाची माळ

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२० डिसेंबर - कन्नड तालुका वकिल संघाची आज दि.२१ शनिवार रोजी निवडणूक पार पडणार असून कोणाच्या गळ्यात अध्यक्षपदाची माळ पडणार आहे हे चित्र आज स्पष्ट होणार आहे.

कन्नड तालुका वकिल संघाच्या निवडणूकीमध्ये अध्यक्ष पदासाठी दोन उमेदवार आहे तर उपाध्यक्षपदासाठी दोन उमेदवार रिंगणात आहे,अध्यक्ष पदासाठी वकिल भगवान चव्हाण,वकिल उमेश वारे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केली आहे तर उपाध्यक्ष पदासाठी वकिल वसंतकुमार



भगवान चव्हाण | वसंतकुमार काळे | उमेश वारे | एम.एच.सय्यद

काळे,वकिल एम.एच. सय्यद यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहे.

दि.१२ रोजी कन्नड वकिल संघाच्या निवडणूकीच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असून दि.१३ रोजी अधिसूचना जारी करण्यात आलेली आहे एकूण सत्तर वकिलांचे मतदान होणार असुन कोणाच्या पारड्यात ही मते जातात याचे चित्र आज स्पष्ट होणार आहे.

सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार असुन सायंकाळी ५ वाजेनंतर मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात होणार असून विजयी उमेदवार घोषित होणार असल्याची माहिती निवडणूक प्रमुख वकिल नासेर शेख यांनी दिली आहे.

## अंजना पळशी मध्यम प्रकल्पाच्या डाव्या- उजव्या कालव्याची दुरावस्था

### दुरुस्तीच्या कामांना मुहूर्त मिळेना, रब्बी हंगामासाठी शेतीला पाणी सोडण्याची मागणी

तभा वृत्तसेवा

कन्नडः दि .२० डिसेंबर- तालुक्यातील अंजना पळशी मध्यम प्रकल्प या वर्षी पूर्ण क्षमतेने भरलेला असताना सुद्धा शेतकऱ्यांना याचा लाभ मिळत नाही,तर गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी मोठी पंचाईत होत आहे

नादरपुर ,जवखेडा, पिंपरखेडा, सारोळा, मोहाडी ,आमदाबाद, नाचनवेल, आडगाव इत्यादी शिवारातील शेतीला रब्बी हंगामा साठी पुढील महिन्यात पिकांसाठी पाण्याची आवश्यकता आहे , लाभ क्षेत्रातील पाझर तलावांनी



तळ गाठले आहे.मात्र या प्रकल्पाचे डावे,उजवे कालवे पाटचारी दुरुस्त न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर झाडे, झुडपे वाढलेले असून यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी गळती होत आहे,प्रकल्पाच्या दुरुस्तीसाठी ०३ फेब्रुवारी २०२३ रोजी चार कोटी ८३ लक्ष ४२ हजार ८५ रुपयांचा निधी मंजूर झालेला असून त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. मात्र कालवा दुरुस्तीचे काम सुरू करण्यासाठी प्रशासनाला मुहूर्त मिळेना

पाटचाऱ्यांना दरवाजे नाही, कालव्याच्या दुरुस्तीमुळे पाझर तलावात पाणी आल्यास लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेती शिवारापर्यंत चांगल्या दाबाने पाणी पोहचेल,तरी वरील दुरुस्तीचे कामे करण्यात यावी याबाबतचे निवेदन कार्यकारी संचालक पाटबंधारे विभाग व जिल्हाधिकारी कार्यालय यांना दि १८ रोजी ग्रामस्थांनी दिले आहे. यापूर्वीही निवेदन देण्यात आले असून अद्याप पर्यत कोणतीच हालचाल झालेली नाही

अंजना पळशी मध्यम प्रकल्पाचे पाणी अंजना नदी मुख्य पात्रात सोडल्यास पिण्याच्या पाण्याच्या प्रश्न सुटेल आणि उन्हाळ्यात तब्बल १५ ते २० गावांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्याची गरज पडणार नाही.

## वाओ स्किन सायन्स १० लाख नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचते

पुणे – 'वाओ स्किन सायन्स', वैयक्तिक काळजी आणि निरोगीपणा मध्ये आघाडीवर असून, मीशो सोबत महत्त्वाच्या सहकार्याद्वारे भारतातील टियर २ शहरांमध्ये आपला ठसा विस्तारत आहे. गेल्या वर्षी, वाओ स्किन सायन्सने टियर २+ शहरांमध्ये १ दशलक्ष नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी मीशो सोबत भागीदारी केली. हे या वाढत्या बाजारपेठेतील नैसर्गिक उत्पादनांची वाढती मागणी दर्शवते. वाओ स्किन सायन्सचे उद्दिष्ट पुढील १२ महिन्यांत मीशो वर एआरआर ५एक्स ने वाढवण्याचे आहे.या भागीदारीमुळे टियर २ मार्केटमध्ये वाओ स्किन सायन्सच्या ऑर्डरमध्ये १० पट वाढ झाली. परफ्यूम, फेस वॉश, सीरम, क्रीम, सनस्क्रीन, शॅम्पू, केसांचे तेल, अलोव्हेरा जेल आणि हेल्थ ड्रिंक्स इत्यादी उत्पादनांच्या मागणीत वाढ झाल्यामुळे ही वाढ शक्य झाली. दर्जेदार आणि प्रभावी उत्पादनांबद्दलच्या ब्रँडच्या वचनबद्धतेने लहान शहरांमधील ग्राहकांचा विश्वास जिंकला आहे, ज्यामुळे सौंदर्य आणि निरोगीपणा क्षेत्रातील वाओ ही कंपनी पसंतीची कंपनी बनली आहे.

## वेदचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरझी सिनेमा वाहिनीवर

पुणे – एक कलाकार म्हणून शर्वरीचे काम अगदी पहिल्यापासूनच मला आवडले आहे आणि प्रत्येक दिवशी तिला प्रगल्भ होताना पाहणे हा एक खूपच चांगला अनुभव आहे. ती एक अतिशय मेहनती अभिनेत्री आहे. कठीण आणि आव्हानात्मक अशा व्यक्तिरेखा निवडताना मी तिला पाहिले आहे. तिला सौंदर्याच्या पारंपरिक चौकटीमध्ये अडकून पडायचे नसून आजच्या काळामध्ये ही गोष्ट अतिशय खास आहे. माझ्यामते 'वेदा' हा शर्वरीच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम परफॉर्मन्सेसपैकी एक असून जर ती कथानके निवडण्याच्या बाबतीत अशीच चोखंदळ राहिली तर ती निश्चितपणे आपल्या कारकिर्दीत एका वेगळ्या उंचीवर असेल. तेव्हा पाहायला विसरू नका वेदचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर २१ डिसेंबर रोजी शनिवारी रात्री ८:०० वाजता फक्त झी सिनेमा वाहिनीवर

## ॲम्बियन्स मॉल येथे सर्वात मोठ्या स्टोअरचा शुभारंभ

मुंबई– किको हा लहान मुलांसाठीच्या उत्पादनातील आघाडीचा ब्रँड १२० देशांमधील पालकांचा मागील ६५ वर्षांपासून विश्वासार्ह ब्रँड आहे. या ब्रँडने अत्यंत आनंदाने गुरगाव येथील ॲम्बियन्स मॉल येथे आपले नवे स्टोअर सुरू केल्याची घोषणा केली. या नव्या स्टोअरमुळे किको भारतातील रिटेल व्यवसायात प्रगती करत असल्याचे अधोरेखित झाले आहे. आता गुरगावमधील कुटुंबांना लहान मुलांसाठीच्या उत्पादनांची विश्वासार्ह श्रेणी उपलब्ध होणार आहे. जागतिक उत्पादनांची देशाच्या राजधानीच्या भागातील वाढती मागणी पूर्ण करण्यासोबतच हे नवे स्टोअर किकोच्या देशभरातील प्रगतीतील एक महत्त्वाचा टप्पा अधोरेखित करते. आर्टसना इंडिया (किको)चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राजेश वोहरा यांनी देशातील या ब्रँडच्या या सर्वात मोठ्या स्टोअरचे उद्घाटन केले. शहरातील अगदी मोक्याच्या ठिकाणी गुरगावातील ॲम्बियन्स मॉलमधील दुसऱ्या मजल्यावर हे स्टोअर आहे. लहान मुलांचे कपडे, स्ट्रोलर्स, कार सेफ्टी सीट्स, कॉस्मेटिक्स, फीडिंग ॲक्सेसरीज, खेळणी, उंच खुर्च्या, कॉट्स आणि क्रिब्स अशी नानाविध प्रकारची किकोची उत्पादने लहान बाळांच्या पालकांना अत्यंत स्वागतार्ह वातावरणात उपलब्ध व्हावीत, अशा प्रकारे या स्टोअरची रचना करण्यात आली आहे.

## मनोरंजन आणि अनुभवांसाठी एक ब्लॉकबस्टर वर्ष

पुणे – जसजसे २०२४ हे वर्ष संपत येऊ लागले आहे तसे बुकमायशो तर्फे त्यांच्या बुकमायशोथ्रोबैक चे अनावरण केले आहे, या माध्यमातून भारतातील मनोरंजन क्षेत्रातील मोठ्या बदलांकडे पाहण्याचा नवीन दृष्टिकोन समोर आला आहे. अगदी आयकॉनिक सिनेमॅटिक अनुभवासह मनोरंजनात्मक असे लाईव्ह कार्यक्रम आणि ऑन डिमांड स्ट्रिमिंग मधील होणारी वाढ ही या वर्षीच्या मनोरंजनात्मक स्वप्नांमध्ये दिसून आली तसेच यांतून असेही दिसून आले की भारतीय प्रेक्षकां मध्ये सर्व प्रकारच्या मनोरंजनाची मोठी भूक निर्माण झाली आहे. पुष्पा २: द रुल ने सिनेमॅटिक मनोरंजनाचा कळस चढवत असतांनाच या फिल्म ने भारतीय कथानकांमध्ये वाढ केली आहे, कारण हा चित्रपट वर्षातील सर्वाधिक पाहिलेला चित्रपट ठरला असून १०.८ लाख एकट्याने हा चित्रपट पाहिला आहे. १ नोव्हेंबर २०२४ हा दिवस बुकमायशो साठी ब्लॉकबस्टर डे ठरला, या दिवशी २४ तासांमध्ये २.३ दशलक्ष तिकीटे या मंचावरुन विकली गेली.

# राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त सौर ऊर्जा जनजागृती रॅलीस प्रतिसाद




नगर – जलविद्युत किंवा थर्मल इलेक्ट्रीसिटी माध्यमातून आपण वीज निर्माती करत आहोत. मात्र कधितरी कोळसा संपणार आहे तर पाण्यावरची वीजनिर्मितीही अतिशय गुंतागुंतीची आहे. त्यामुळे भविष्यात आपल्याला सौर ऊर्जेच्या पर्यायांकडेच जावे लागणार आहे. त्यामुळे सौर उर्जे चा वापर अधिक वाढवण्यासाठी केली जात असलेली जनजागृती उपयुक्त ठरणार असून सौर ऊर्जे च्या जास्तीत जास्त वापरामुळे भविष्यात आपण विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होऊ. सौर उर्जा क्षेत्रात अहिल्यानगर मध्ये अतिशय उत्कृष्ट काम सुरु आहे. सौर उर्जेच्या अधिक वापरा बाबत जनजागृती करून हे काम अधिक वेगाने पुढे न्यावे, असे आवाहन अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त अहिल्यानगर महावितरण मंडल कार्यालय व शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक व विद्युत कंत्राटदार यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना व सौर ऊर्जेच्या वापराबाबत नागरिकांमध्ये अधिक जागृती होण्यासाठी आयोजित जनजागृती रॅलीचे व जनजागृती वाहनाचे उद्घाटन मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी नगर विभागाचे प्रांताधिकारी सुधीर पाटील, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, प्रभारी अधीक्षक अभियंता लक्ष्मण काकडे, ऑल इंडिया रिन्यूएबल असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष अमित काळे, विद्युत कंत्राटदार संघटनेचे राज्याचे अध्यक्ष उमेश रेखे, जिल्हाध्यक्ष दत्ता झिंजुर्डे, सचिव अर्जुन ससे, महाऊर्जेचे अप्पासाहेब ठाणगे आदींसह शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक, महावितारांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी सुधीर पाटील म्हणाले, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी पुढाकार घेऊन जिल्ह्यात हजारो एकर जमिनी सौर ऊर्जा प्रकल्पांसाठी उपलब्ध करून देत महावितरणकडे वर्गीकृत केल्याने त्यांचे अभिनंदन करतो. सौर उर्जा वापराबाबत होत असलेली जनजागृती कौतुकास्पद आहे. सौर ऊर्जा ही नश्वर नाहीये. प्रदूषणमुक्ततेसाठी सौर ऊर्जे चा वापर वाढणे महत्वाचे आहे. या जनजागृती रॅलीमुळे सर्वसामान्य नागरिकांना सौर ऊर्जे चे महत्व समजणार आहे. यावेळी महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी उपस्थिताना सौर ऊर्जेच्या वापराबाबत व पर्यावरणवादी जीवनशैली बाबत प्रतिज्ञा दिली. प्रकृती रक्षति रक्षित: हा मंत्र सर्वांनी लक्षात ठेऊन आचरणात आणावा असे आवाहन केले. राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताह निमित्त राज्यात केवळ अहिल्यानगर शहरातच रॅली काढून जनजागृती करण्यात आली. यावेळी रॅलीत सहभागी झालेल्यांनी प्राधान्याने ई बाईकच वापरून पंतप्रधान सूर्य घर मोफत वीज योजना व सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती करणारे फलक हातात घेतले होते. सोलरचा वापर काळाची गरज..., सोलर वापरा वीज वाचवा... अशा घोषणा यावेळी रॅलीत देण्यात आल्या. ही रॅली सावेडी उपनगर व शहरातील काही भागांमध्ये फिरून नगर कॉलेज जवळील महावितरण मंडल कार्यालय येथे समाप्त करण्यात आली.

# मनपा कर्मचाऱ्यांच्या सुखदुःखात पतसंस्थेचा सहभाग कौतुकास्पद : आ.संग्राम जगताप



नगर : अहिल्यानगर मनपा कर्मचारी सहकारी पतसंस्थेला एक उज्वल परंपरा असून संचालक मंडळ सभासदांच्या हिताचे निर्णय घेत असून मनपा कर्मचाऱ्यांच्या मुलामुलींच्या शिक्षणासाठी व लग्न समारंभासाठी तातडीने कर्जरूपी आर्थिक मदत उपलब्ध करून देत आहे, याचबरोबर आरोग्याच्या उपचारासाठी २५ हजाराची तातडीने मदत केली जाते, तसेच गुणवंत पाल्यांचा सत्कार करून शाब्बासकीची थाप देण्याचे काम केले जात आहे, मनपा कर्मचाऱ्यांच्या सुखदुःखामध्ये नेहमीच पतसंस्थेचा सहभाग असून हे कौतुकास्पद आहे, सभासदांना बरोबर घेऊन पतसंस्थेच्या सुरू असलेल्या कारभारामुळे यशाचे शिखर गाठले जाईल असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर मनपा सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बलराज गायकवाड तर व्हाईस चेअरमनपदी बाळासाहेब गंगेकर यांची निवड झाल्याबद्दल आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, संचालक सोमनाथ सोनवणे, कैलास चावरे आदी उपस्थित होते.

मनपा कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांसाठी आ. संग्राम जगताप नेहमीच सहकार्य करीत ते सोडविण्याचे काम करत असतात ते नेहमीच आमच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहत असल्यामुळे आम्हाला देखील चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते आणि मिळालेल्या पदाच्या माध्यमातून मनपा पतसंस्थेचे सभासद व कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी काम करत आहे संचालक मंडळांनी टाकलेला विश्वास आम्ही दोघे सार्थ करूअशी भावना चेअरमन बलराज गायकवाड यांनी व्यक्त केली.

## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

अहिल्यानगर दि.२०– जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये २१ डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश धार्मिक कार्यक्रम, लग्नकार्य, लग्न मिरवणुका, किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना, सभा अगर मिरवणूका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. आदेशाचा भंग करणाऱ्या विरोधात कारवाई करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## गणपती मंदिर येथील स्लॅपच पूजन संपन्न



तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद येथील बाजारपेठ मधील गणपती मंदिर येथील आमदार प्रशांत बंब याच्या ५० लक्ष रुपयेच निधी मधील बांधकाम चालू असून स्लॅप पूजन कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक दिनेश सावजी, नागेश कायस्थ , यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी नवतरुण पंचम मंडळाचे अध्यक्ष गणेश सावजी सचिव सुजित जोशी, महेश सावजी, राकेश भावसार, तनुज सावजी, किशोर भावसार, यावेळी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

संचिका क्र.२०२४/३.वि.अ.वै./एम.ए.जी.ज.मू.नोंद/सी.आर ९४३/२०२४
दि. : १०/१२/२०२४

### जाहीर प्रगटन

अर्जदार :– श्री/श्रीमती सिध्देश्वर बाबुराव मांडवगड रा. धामोरी खु ता गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचाय कार्यालय धामोरी खु ता गंगापूर. जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व जन्म मृत्यू नोंद बाबत. ३ प्रमाणे.

ज्याअर्थी अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार स्वतः नामे सिध्देश्वर बाबुराव मांडवगड यांचा जन्म दिनांक २५/१०/१९९६ रोजी मौजे धामोरी खु ता गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचाय कार्यालय धामोरी खु ता गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरला जन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक १०/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :– वैजापूर.
दिनांक :– १०/१२/२०२४

उप विभागीय अधिकारी, वैजापूर

---

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२४/२०२५ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : २०–१२–२०२४

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **दिपाली रविंद्र घन** यांनी मोहल्ला **वार्ड क्र ०५** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट /घर क्रमांक **१२८८** त्यांचे नांवे मालमत्ता कर जिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : सरकारी वापराचा रस्ता पश्चिम : कब्रस्तानची जागा**
**दक्षिण : श्री. दत्तात्रय माधव देवरे यांची जागा उत्तर : कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा**
आकार : पूर्व पश्चिम **१६१४.00 चौ. फु.** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

---

### जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. एस.एस. अग्रवाल दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ५९२/२०२४ पुढील तारीख ०६/०१/२०२५

अर्जदार : १) रूकसाना भ्र. रज्ज़ाक शेख वय ६२ वर्षे, धंदा घरकाम रा. घर क्रं. ३–१९–८९६, गल्ली नं. २८, इंदिरा नगर, बायजीपुरा, औरंगाबाद २) लतीफ पिता यासिन शेख वय ६१ वर्षे, धंदा मजूरी रा. पोस्ट ऑफीसच्या मागे, अरब गल्ली, गंगापूर ता. गंगापूर, जि. औरंगाबाद. ३) रहेमाबी भ्र. युसूफ शेख वय ७१ वर्षे, धंदा घरकाम रा. बागवान गल्ली, बिडकीन, ता. पैठण, जि. औरंगाबाद ४) शेख याकुब पिता शेख यासिन वय ५८ वर्षे, धंदा मजूरी रा. घर क्रं. २–१३–८२, रशीद मामु कॉलनी, गरम पाणी, औरंगाबाद ५) जरीना निजाम पठाण वय ५० वर्षे, धंदा घरकाम रा. पोस्ट ऑफीस जवळ, एक मिनार चौक, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद ६) शमिना भ्र. गणी सय्यद वय ४३ वर्षे, धंदा घरकाम रा. जामा मस्जिद जवळ, लिंबे जळगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ७) शरीफखा उमिदखा पठाण वय ६५ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद ता. गंगापूर जि. औरंगाबाद ८) जावेदखा पिता शरीफखा पठाण वय ३८ वर्षे, धंदा मजूरी रा. जामा मस्जिद जवळ, लिंबे जळगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ९) रिजवाना भ्र. ईलियास शेख वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. लिंबे जळगांव, पो. तुर्काबाद, ता. गंगापूर जि. औरंगाबाद १०) रफिया भ्र. खयुम शेख वय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. गल्ली नं. २८, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद ११) शेख शोएब पिता शेख खय्युम वय २४ वर्षे, धंदा मजूरी रा. गल्ली नं. २८, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद १२) शाईस्ता पिता शेख कय्यूम वय २३ वर्षे, धंदा घरकाम रा. घर क्रं. ३–११–८२३, गल्ली नं. २८, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद १३) शेख सानिया पिता शेख खय्यूम वय १९ वर्षे, धंदा घरकाम रा. गल्ली नं. २८, इंदिरानगर, बायजीपुरा, औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आफताब एस. शेख रा. गंगापूर, ता. गंगापूर यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, असे की, अर्जदार क्र. १ ते १३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे आहे. अर्जदार क्रं. १ ते ६ यांचे वडील व अर्जदार क्रं. ७ व १० चे सासरे आणि अर्जदार क्रं. ८, ९, ११ ते १३ यांचे आजोबा नामे यासिन मोहम्मद शेख हे दिनांक १२/१०/२०२० रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ६ यांची आई व अर्जदार क्रं. ७ व १० यांची सासु आणि अर्जदार क्रं. ८, ९, ११ ते १३ यांची आजी नामे जैतूनबी शेख यासीन हे दिनांक २९/०८/२०१५ मौजे गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ६ यांची बहिण व अर्जदार क्रं. ७ ची पत्नी आणि अर्जदार क्रं. ८ व ९ यांची आई व अर्जदार क्रं. १० ची नणंद, अर्जदार क्रं. ११ ते १३ यांची आत्या नामे फरजानाबी शरीफखान पठाण या दिनांक १७/०१/२०२४ रोजी माणीक हॉस्पीटल, औरंगाबाद येथे उपचारादरम्यान मयत झालेली आहे. तसेच अर्जदार क्रं. १ ते ६ यांचे भाऊ, अर्जदार क्रं. ७ यांचे साले तसेच अर्जदार क्रं. ८, ९, ११ ते १३ यांचे मामा आणि अर्जदार क्रं. १० यांचे पती नामे शेख कय्युम शेख यासीन हे दिनांक ०८/११/२००८ रोजी औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत यासिन मोहम्मद शेख यांना अर्जदार क्रं. १ ते १३ हे कायदेशीर वारसदार असून अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत यासिन मोहम्मद शेख यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक २८/१२/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

---

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–८५२

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक ११/१२/२०२४

अर्जदार : अब्दुल मजीद कादर खान पठाण रा टिळक नगर कन्नड ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :– जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः अब्दुल मजीद कादर खान पठाणच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः अब्दुल मजीद कादर खान पठाणचा जन्म दिनांक २५–०५–१९६४ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः अब्दुल मजीद कादर खान पठाणचा जन्म दिनांक २५–०५–१९६४ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः अब्दुल मजीद कादर खान पठाणचा जन्म दिनांक २५–०५–१९६४ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८–०१–२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २५–०५–१९६४ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–८५३

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : शेख निसार मुसा रा टिळक नगर कन्नड ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः शेख निसार मुसाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः शेख निसार मुसाचा जन्म दिनांक ०५–०५–१९६४ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः शेख निसार मुसाचा जन्म दिनांक ०५–०५–१९६४ रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः शेख निसार मुसाचा जन्म दिनांक ०५–०५–१९६४ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८–०१–२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०५–०५–१९६४ रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरलाजाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–८५१

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : शौकतबी कादर खान पठाण रा टिळक नगर कन्नड ता कन्नड जि छ संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : नगर परिषद कार्यालय कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या स्वतः शौकतबी कादर खान पठाणच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या स्वतः शौकतबी कादर खान पठाणचा जन्म दिनांक ०१–०१–१९६० रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या स्वतः शौकतबी कादर खान पठाणचा जन्म दिनांक ०१–०१–१९६० रोजी कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या स्वतः शौकतबी कादर खान पठाणचा जन्म दिनांक ०१–०१–१९६० रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८–०१–२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०१–०१–१९६० रोजी कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक १९/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहिर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी– १/जन्म–मृत्यु नोंद/सिआर–८७६

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड
दिनांक १९/१२/२०२४

अर्जदार : रवींद्र कैलासचंद अजमेरा रा वासडी ता कन्नड जि छ संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय वासडी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म–मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगी अंतरा रवींद्र अजमेराच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल के ला आहे की, अर्जदार यांच्या मुलगी अंतरा रवींद्र अजमेराचा जन्म दिनांक १५–०८–२००९ रोजी वासडी ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगी अंतरा रवींद्र अजमेराचा जन्म दिनांक १५–०८–२००९ रोजी वासडी ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगी अंतरा रवींद्र अजमेराचा जन्म दिनांक १५–०८–२००९ रोजी वासडी येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २८–०१–२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप`ष नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १५–०८–२००९ रोजी वासडी येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २८/१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

---

### जाहिर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर साहेब, दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. ३६८/२०२४.
पुढील तारीख ०८/०१/२०२४.

अर्जदार : १. सुनिता भ्र. भरत आडे, वय ३८ वर्षे, धंदा खाजगी नौकरी, रा. हिवरखेडा गौ. ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. अविनाश पिता भरत आडे, वय २१ वर्षे, धंदा नौकरी, रा. हिवरखेडा गौ. ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. एकविरा आपर्टमेंट नागेश्वर वाचनालय जवळ, रावर निर्मल नालासोपारा वेस्ट, ठाणे ता. व जि. ठाणे ३. अरविंद पिता भरत आडे, वय १९ वर्षे, धंदा शिक्षण, रा. अंधानेर ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. आश्विनी पिता भरत आडे, वय २३ वर्षे, धंदा शिक्षण, रा. हिवरखेडा गौ. ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. आरुषी पिता भरत आडे, वय १० वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क जन्मदाती आई अर्जदार क्र. १

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. डी.एन. चव्हाण यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत भरत मेरचंद आडे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयातचे मुले असून अर्जदार क्र. ४ व ५ ह्या मयताची मुली आहेत. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत भरत मेरचंद आडे यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे भरत मेरचंद आडे हे दि.२७/०६/२०२४ रोजी मौजे हिवरखेडा गौ. येथे मरण पावले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांना मयत भरत मेरचंद आडे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे व मयत भरत मेरचंद आडे हे मौजे हिवरखेडा गौ. ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी आहेत तसेच मतय भरत मेरचंद आडे हे मौजे हिवरखेडा गौ. येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०६/११/२०२४ रोजी मौजे हिवरखेडा गौ. ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/१२/२०२४.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड.

# संपूर्ण जमीन लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न सुरु

## कुलगुरू डॉ. इन्द्र मणि : वनामकृ विद्यापीठाच्या मध्यवर्ती प्रक्षेत्रातंर्गत ८०० हेक्टरवर बीजोत्पादन





**परभणी,/प्रतिनिधी :** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ अंतर्गत वर्षानूवर्षापासूनची पडीक जमीन पूर्णतः वहितीखाली आणण्याकरीता विद्यापीठाने सर्वार्थाने प्रयत सुरु केले आहेत. इंचनइंच जमीन निश्चितपणे वापरात आणली जाईल, असा विश्वास कुलगुरु डॉ. इंद्र मणि यांनी व्यक्त केला.

**विद्यापीठ बियानांना मोठी मागणी..**

कृषि विद्यापीठ विकसित विविध पिकांच्या वाणाच्या दर्जेदार बियाणास शेतकरी बांधवामध्ये मोठी मागणी आहे, यात सोयाबीन, तुर, ज्वारी आदीच्या वाणास शेतकरी बांधवाची विशेष पसंती आहे. त्याामुळेच बीजोत्पादन वाढ करणे महत्वाचे होते. विद्यापीठातील मध्यवर्ती प्रक्षेत्र विभागाकडे स्थापनेपासुन मोठया प्रमाणावर जमिनीचे क्षेत्र उपलब्ध आहे. या क्षेत्रावर १९७२ ते २००१ दरम्यान बीजोत्पादन घेतले जात होते, परंतु गेल्या काही वर्षापासुन निधी व मनुष्यबळ अभावी यातील बहुतांश क्षेत्र लागवडीखाली आणण्यात अडचणी निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर गेल्या दोन वर्षात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ इन्द्र मणि यांनी विद्यापीठाचे बीजोत्पादन वाढ करण्याच्या उद्देशाने मध्यवर्ती प्रक्षेत्र विकासाकडे विशेष लक्ष दिले आहे. विद्यापीठाची इंचनइंच जमीन वापराखाली आणण्याचा मानस कुलगुरू डॉ. मणि यांनी व्यक्त केला.

**८०० हेक्टर जमीनीवर बिजोत्पादन...**

पडित जमीन लागवडीखाली आणण्यातील प्रमुख अडसर ठरणाऱ्या क्षेत्रावरील काटेरी झाडेझुडपे काढुन जमिनीची नागंरणी, मोगडणी, चाऱ्या काढणे इत्याादी मशागतीचे कामे एप्रिल - मे २०२३ मध्ये करण्यात आली. याकरिता विद्यापीठातील विविध प्रकल्प व योजनातील उपलब्ध ट्रॅक्टर्स, आवश्यक औजारे, जेसीबी यांचा वापर करण्यात आला. मध्यवर्ती प्रक्षेत्रावरील जवळपास ८०० हेक्टर जमिन क्षेत्रावर अपुरे मनुष्यबळ, निधी, वन्य प्राण्याचा उपद्रव, नैसर्गिक आपत्तींचा सामना करून आणि उपलब्ध साधनसमुग्रीमध्ये पैदासकार बीजोत्पादन हाती घेण्यात आले आहे. याशिवाय विद्यापीठ परिसर व मराठवाडयातील विद्यापीठाच्या उपकॅम्पस येथील १२० हेक्टर एकर जमिन वहितीखाली आली.

**८ कोटी लिटरची चार शेततळी...**

विद्यापीठ परिसरात नवीन चार मोठया क्षमतेची शेततळी निर्माण करण्यात आली असुन जुन्या मोठ्या शेततळयाची दुरूस्ती करण्यात आली आहे, या माध्यमातुन ८ - ९ कोटी लिटर पाण्याची साठवण क्षमता शक्य होत आहे. यामुळे बीजोत्पादनाकरिता काही प्रक्षेत्रावर संरक्षित सिंचन देणे शक्य होत आहे. २०२४ - २५ मध्ये बीजोत्पादनाखालील क्षेत्र ८०० हेक्टर वरून १३०० हेक्टरपर्यंत वाढविण्यात आले. २०२३-२४ च्या खरीप व रबी हंगामामध्ये विद्यापीठाचे बीजोत्पादन साधारणत: ७००० क्विंटल वरून ९१५४.८४ क्विंटल झाले. म्हणजेच साधारणतः ३० टक्के बीजोत्पादन वाढ झाले. विद्यापीठाने सुरवातीस जमीन लागवडीखाली आणण्यावर भर दिला आणि पुढील टप्प्यात हेक्टरी उत्पादकता वाढीवर भर देण्यात येत आहे. यामध्ये पायाभूत सुविधा विकास, शेततळे निर्मिती करून सिंचन क्षेत्रात वाढ, ड्रोन सारख्या आधुनिक तंत्रज्ञाचा वापर, यांत्रिकीकरनावर भर देण्यात येत आहे.

**२० हजार क्विंटल बिजोत्पादनाचे लक्ष...**

यावर्षी प्रथमच २०० हेक्टर क्षेत्रावर ड्रोनद्वारे फवारणी करण्यात आली. या बाबींचा विचार करून कुलगुरू डॉ. मणि यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाने २०२४ मध्येही बीजोत्पादन २०,००० क्विंटल करण्याचे लक्ष ठेवले आहे, यामध्ये सोयाबीनचे साधारणत: ८५०० क्विंटल बियाणे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील विद्यापीठाच्या ५१ संशोधन आणि बीजोत्पादन केंद्राच्या विविध प्रक्षेत्रावर तसेच वेगवेगळ्या जमिनीमध्ये आणि हवामानामध्ये तयार झाले. यापैकी मध्यवर्ती प्रक्षेत्राच्या ३५० हेक्टरद्वारे ३५०० क्विंटल सोयाबीनचे बीजोत्पादन मिळाले आहे. विद्यापीठ गुणवत्तापूर्ण बियाणे शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यावर भर देत आहे. भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या उद्दिष्टानुसार सोयाबीनचे पैदासकार बीजोत्पादन उतार हा हेक्टरी १० क्विंटल असा असून विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावरील बीजोत्पादनाने तो पूर्ण केला आहे. तसेच काही केंद्रांनी हेक्टरी २० ते २५ क्विंटल उत्पादन घेतले आहे. २०२४-२५ च्या खरीप, रबी आणि उन्हाळी हंगामामध्ये निर्धारित २०,००० क्विंटलचे लक्ष गाठण्यास विद्यापीठास नक्कीच यश मिळेल असा विश्वास कुलगुरू डॉ. मणि यांनी व्यक्त केला आहे.

**बिजोत्पादनावर हवामानाचा परिणाम...**

विद्यापीठाचा बीजोत्पादन कार्यक्रम मराठवाड्यातील ८ जिल्ह्यात घेण्यात येतो तथापि मराठवाड्यातील हवामानात आंतरजिल्हा आणि आंतरजिल्ह्यातील विविधतेचा अनुभव येतो. वार्षिक ५०० ते ८३५ मिमी पाऊस पडतो आणि खात्रीशीर पर्जन्य क्षेत्र (६०%), मध्यम जास्त पर्जन्यमान झोन (२०%) आणि टंचाई क्षेत्र (२०%) अंतर्गत येतो. कृषी उत्पादन प्रामुख्याने मान्सूनच्या पावसाच्या अनियमित स्वरूपामुळे मर्यादित आहे. या सोबतच सद्य स्थितीमध्ये हवामान बदलामुले पर्ज्यन्यमानाची अनियमितता निर्माण झाली आहे. २०२४ मध्ये विद्यापीठाचे मध्यवर्ती प्रक्षेत्र येथील बलसा, सायाळा, तरोडा व शेंद्रा ङ्गकफ अश्या एकूण ०४ विभागावर पैदासकार सोयाबीन या पिकाच्या एमएयुएस ७१, एमएयुएस ६१२, एमएयुएस ७२५ व एमएयुएस ७३१ या वाणांचा एकूण ४२५ हे. क्षेत्रावर राबविण्यात आला होता. खरिप हंगामात माहे जुले व ऑगस्ट महिन्यात पिक फुलोऱ्यात असताना पाऊसाचा खंड (दि. २९.०७.२०२४ ते १८.०८.२०२४) या २० दिवसाचा असल्यामुळे त्याचा परिणामसोयाबीनच्याउत्पादनावर दिसून आला. माहे सप्टेबर महिन्यात सोयबीन पिकाच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना एकूण १५ दिवसाचा खंड (दिनांक ०६.०९.२०२४ ते २१.०९.२०२४) असल्यामुळे सोयबीनच्या उत्पादनात १५ ते २० टक्क्यांनी घट झाल्याचे आढळून आले आहे. सप्टेबरच्या शेवटच्या आठवड्यात अतिवृष्टी (१९६.६ मिमि) झाल्यामुळे सोयबीन पिकाच्या उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झालेला दिसून येतो. सदरील अतिवृष्टी मुळे प्रक्षेत्रावर राबविण्यात आलेले सोयबीनचे क्षेत्र एकूण ५० ते ६० हेक्टर क्षेत्रावरिल पिक पूर्णपणे नष्ट झाल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. यामुळे केवळ ३५० हेक्टरद्वारेच बीजोत्पादन मिळू शकले.

**हरित विद्यापीठ वृक्ष लागवड मोहिम...**

विद्यापीठाने मध्यवर्ती प्रक्षेत्रावर बिजोत्पादनासह हरित विद्यापीठ - वृक्ष लागवडीची विशेष मोहिम हाती घेतली आहे. विद्यापीठ परिसरात एक लक्ष वृक्षलागवडीस सुरूवात करण्यात आले आहे. गेल्या वर्षी पासुन वन विभागाच्या माध्यमातुन विद्यापीठातील रेल्वे लाईनच्या लगत ४.५ किलोमीटर फळपिके व वनपिकांची लागवड करण्यात आली आहे. यावर्षी १०० हेक्टरवर नवीन फळबाग लागवडीचे नियोजन करण्यात आले असुन, यात आंबा, आवळा, बेल, आव्होकोडा तसेच इतर महत्वाच्या फळपिकांच्या विविध ५० हून अधिक जातीची लागवड करण्यात येणार आहे. या फळबागेतून विविध प्रकारचे संशोधन करण्यात येणार असून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे व्यापारी लागवड साध्य करून निर्यातक्षम फळ उत्पादने घेण्यात येणार आहेत.

**बिजोत्पादनासाठी साऱ्यांचे प्रयत कारणीभूत....**

कुलगुरू डॉ. मणि यांनी प्रक्षेत्र विकासासाठी व्यक्तीश: लक्ष घातले आणि त्याांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन संचालक डॉ खिजर बेग यांनी प्रक्षेत्र विकासास कटीबद्ध राहून आवश्यक यंत्रसामुगी उपलब्ध करून दिल्याने एवढे मोठे प्रक्षेत्र लागवडीखाली आणता येऊ शकले, अशी माहिती प्रक्षेत्र विकासातील महत्वपूर्ण योगदान देणारे मध्यवर्ती प्रक्षेत्राचे प्रभारी अधिकारी डॉ. विलास खर्गखराटे यांनी दिली. सदर बीजोत्पादनाकरिता विद्यापीठातील ड्रायव्हर ते डायरेक्टर यांचे मोठया प्रमाणात योगदान लाभत आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### समीक्षक सुधीर रसाळ यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहिर

**परभणी,/प्रतिनिधी-** ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक सुधीर रसाळ यांना साहित्या अकादमीचा २०२४ चा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

साहित्या अकादमीच्या वतीने २०२४चे पुरस्कार जाहीर करण्यात आले असून त्या आठ कविता संग्रह, तीन कादंबरी, दोन कथासंग्रह, तीन निबंध, तीन साहित्या समीक्षा, एक नाटक व एक शोध पुस्तकास हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

साहित्या अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित अकादमीच्या कार्यकारी सदस्यांच्या बैठकीतून २१ भारतीय भाषांमधील साहित्यिकांसह साहित्याांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. पुरस्कार विजेत्याांमध्ये मराठी साहित्या क्षेत्रातील ज्येष्ठ साहित्यिक तथा समीक्षक सुधीर रसाळ यांचा समावेश असून या व्यतिरिक्त समीर तााीं (आसामी), दिलीप झांवेरी (गुजराती), गगन गिरी (हिंदी), के. जयकुमार (मल्ल्याळम), हाओबम सत्याबती देवी (मणीपूरी), पॉल कौर (पंजाबी), मुकुट मणिराज (राजस्थानी), दीपककुमार शर्मा (संस्कृत) यांना कवितासंग्रहाबद्दल तर अरण राजा (बोडो), ईस्टरिन किरे (इंग्रजी), सोहन कौर (काश्मिरी) यांना कादंबरीबद्दल तर युवा बराल (नेपाळ), हुंदराज बलवानी (सिंधी) यांना कथासंग्रहाबद्दल, मुकेश थकी (कोंकणी), महेंद्र मलगिया (मैथिली), वैष्णबचरण सामल (ओडीया) यांना निबंधाबद्दल के.व्ही. नारायण (कन्नड), सुधीर रसाळ (मराठी), पेनुगोंडा लक्ष्मीनारायण (तेलगू) यांना साहित्या समीक्षा तर महेश्वर सोरेल (संताली) यांना नाटक व ए.आर. व्यंकटचलपती (तामीळ) यांना शोध प्रबंधाबद्दल हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

हे पुरस्कार १ जानेवारी २०१८ ते ३१ डिसेंबर २०२२ या दरम्यान पहिल्यावेळी प्रकाशित झालेल्या पुस्तकांना प्रदान करण्यात आले आहेत. ८ मार्च २०२५ रोजी साहित्या अकादमीचा हा पुरस्कार सोहळा नवी दिल्लीत होणार असल्याची माहिती साहित्या अकादमीचे के. श्रीनिवासन यांनी दिली.

### कनिष्ठ लिपीक लाच लुचपतच्या जाळयात

**परभणी,/प्रतिनिधी-** गंगाखेड येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील कनिष्ठ लिपीक या पदाचा अतिरिक्त कारभार असणाऱ्या प्रकाश विठ्ठलराव टाक या कर्मचाऱ्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने संबंधित तक्रारकर्त्याकिडून ४ हजार रुपयांची लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याबद्दल गंगाखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. गंगाखेड येथील या तक्रारकर्त्याने नगरपरिषद हद्दीतील प्लॉट खरेदी करणे असल्याने ३ डिसेंबर रोजी दुय्यम निबंधक कार्यालयात किती शुल्क लागेल, अशी विचारणा केली. तेव्हा तेथील प्रकाश टाक या लिपीकाने खरेदीखत करण्याकरीता सहा ते सात हजार रुपये लागतील व त्याा व्यतिरिक्त १ हजार रुपये आणखीन लागतील, असे नमूद केले. संबंधित तक्रारकर्त्याने शुल्का व्यतिरिक्त मागितलेली १ हजार रुपयांची रक्कम द्यावयाची इच्छा नसल्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या परभणी कार्यालयाकडे तक्रार दाखल केली. या खात्याने ४ डिसेंबर रोजी पडताळणी केली तेव्हा संबंधित प्रकाश टाक याने खरेदी करावयाच्या असलेल्या प्लॉटच्या खरेदीखताकरीता ७ हजार ७०० शासकीय शुल्क आहे, असे नमूद करीत या व्यतिरिक्त इतर ५ हजार रुपये द्यावे लागतील, असे म्हटले. संबंधित तक्रारकर्त्याने काहीतरी कमी करा, अशी विनंती केली. त्यावेळी तडजोडीअंती टाक यांनी ४ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करुन ती स्विकारण्याची तयारी दर्शविली. पडताळणी दरम्यान ही गोष्ट लक्षात आल्याबरोबर संबंधित लिपीकाविरुध्द या खात्याने गंगाखेड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## शिक्षणाधिकाऱ्यांना धमकाविणाऱ्या शिक्षकाविरुध्द गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांना आमदारांच्या नावानिशी मोबाईलद्वारे धमकाविणाऱ्या मानवत जिल्हा परिषद प्रशालेतील निलंबित शिक्षक दत्ता होगे याच्या विरोधात मानवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी सुनील साईनाथ पोलास यांनी मानवत पोलिस ठाण्यात १७ डिसेंबर रोजी एक तक्रार दाखल केली. त्याा तक्रारीतून आपण प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणून १४ मार्च २०२४ पासून कार्यरत आहोत. जून २०२४ या महिन्यात कर्तव्यावर असतांना आपणास दोन क्रमांकावर वारंवार मोबाईल येवू लागले. मी शिक्षक आमदार कपील पाटील बोलतोय, अथवा त्यांचा पीए बोलतोय, असे म्हणत जिल्हा परिषदेच्या एका शिक्षीकेच्या प्रतिनियुक्तीची फाईल मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना पाठवा, असे म्हटले. पुन्हा दिवसांनी पुन्हा त्याापैकी एका क्रमांकावरुन आमदार पाटील यांच्याच नावाने जिल्हा परिषद मुख्याध्यापक पदाचा कारभार श्रीमती छाया गायकवाड यांच्याऐवजी इतरांना द्या, अशी धमकीवजा भाषा वापरली. माध्यमिक शिक्षकांच्या समायोजनाच्या बाबतीतही मोबाईल करुन मी एलएक्यू करील, असे धमकावून दबाव टाकण्याचा प्रयत केला. या प्रकारानंतर आपण मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयात जावून चौकशी केली असता वरील विषयाच्या अनुषंगाने कोणतीही फाईल किंवा काही विषय पटलावर नव्हताच, संबंधित यावरुन आपली विनाकारण दिशाभूल केली जात आहे, असे दिसून आले, असे पोलास यांनी म्हटले.

या दरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील शिक्षण उपसंचालक कार्यालयातील शिक्षण उपसंचालक अनिल साबळे यांनी आपणास १८ ऑक्टोंबर रोजी आमदार सुरेश वरपुडकर यांच्या नावे मोबाईल आल्याचे व त्याातून ते दत्ता होगे यांच्याविरुध्द दाखल झालेल्या गुन्ह्यासंदर्भात वस्तूस्थितीचा शोध घ्या, मुख्याध्यापिका छाया गायकवाड यांनी कट रचून होगे यांना अडकविले आहे, असे म्हटल्याचे साबळे यांनी आपणास सांगितल्याचे पोलास यांनी म्हटले. आपण लगेचच साबळे यांच्याकडून मोबाईल क्रमांक घेतला. तो क्रमांक व आपणास आमदार कपील पाटील यांच्या नावे आलेला मोबाईल क्रमांक एकच असल्याचे निदर्शनास आले. आपली कोणीतरी विनाकारण दिशाभूल करीत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर त्याा दोन्ही मोबाईल क्रमांकाची इतर सहकाऱ्यांकडून माहिती घेतली असता ते दोन्ही मोबाईल क्रमांक हे दत्ता होगे याचेच असल्याचे पोलास यांनी या तक्रारीतून नमूद केले. दरम्यान, आपली दिशाभूल करुन चूकीचे काम करण्याकरीता दबाव टाकणाऱ्या या निलंबित शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल करावा, अशी मागणी पोलास यांनी केली. त्याआधारे मानवत पोलिसांनी संबंधित शिक्षक दत्ता होगे याच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत.



### झरीच्या उपबाजारपेठेत कापूस खरेदी

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रांतर्गत झरी येथील उपबाजारपेठेत भारतीय कापूस निगम लिमिटेड (सीसीआय) मार्फत गुरुवारपासून कापूस खरेदी सुरु करण्यात येणार आहे.

झरी येथील व्यंकटेश्वरा ॲग्रो इंडस्ट्रीजच्या आवारातील केंद्रावर कापूस उत्पादकांनी कापूस विक्रीस आणावा, त्याचबरोबर चालू आर्थिक वर्षाचा ऑनलाईन सातबारा उतारा, कापूस पिकपेरा, बँकेला आणि मोबाईलला लिंक असणाऱ्या आधारकार्डची झेरॉक्सप्रत सोबत आणावी, असे आवाहन सभापती पंढरीनाथ घुले, उपसभापती अजय चव्हाण व अन्य संचालकांनी केले आहे. कापूस उत्पादकांनी कापूस आणतेवेळी सीसीआयच्या सर्व सूचनांचे पालन करावे, असे असेही म्हटले आहे.

## मालमत्ता कर विलंब शास्ती सूट अभय योजना जाहीर

**महापालिका आयुक्तांकडून योजनेचा कालावधीही निश्चित**

**परभणी,/प्रतिनिधी :** मालमत्ताकर विलंब शास्ती सूट अभय योजना महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केली आहे.

महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कराची अजून चांगल्या पध्दतीने वसूली व्हावी या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त यांना स्वेच्छा निर्णयानुसार महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ड प्रकरणात कराधान नियम ४१ खालील शास्ती किंवा नियम ५० खालील फि किंवा वसूलीचा पूर्णतः किंवा अंशतः माफ करता येईल, अशी तरतूद आहे.


त्या प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात मालमत्ता कर वसूलीत वाढ होण्याकरीता मालमत्ता कर विलंब शास्तीत सूट अभय योजना जाहीर करण्यात आली आहे. त्याा प्रमाणे शासकीय व निमशासकीय मालमत्तांना २८ डिसेंबर ते ३१ मार्च या दरम्यान १०० टक्के विलंब शास्ती सूटची टक्केवारी जाहीर करण्यात आली असून शासकीय निमशासकीय मालमत्ता वगळून इतर सर्व मालमत्तांना १८ डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यान १०० टक्के, १६ जानेवारी ते ३१ जानेवारीपर्यंत ९० टक्के, १ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी पर्यंत ७५ टक्के व १ मार्च ते १५ मार्च २०२५ या दरम्यान ५० टक्के सूट या अभय योजनेतून देण्यात येणार आहे.

अभय योजना ही केवळ थकीत व चालू वर्षापर्यंतच्या मालमत्ता कराचा विहित मुदतीत एकरकमी भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांनाच लागू राहील, अशी माहिती महापालिकेचे आयुक्त धैर्यशिल जाधव यांनी दिली.

## ग्रामीण महिलांना स्वावलंबी होण्यासाठी शेळीपालन करावे

### वनामकृविचे सहयोगी अधिष्ठता डॉ.राजूरकर यांचे प्रतिपादन

**परभणी,/प्रतिनिधी:** ग्रामीण महिलांना स्वावलंबी होण्यासाठी आणि अर्थार्जनासाठी शेळीपालन हा व्यवसाय फायदेशीर ठरू शकतो, असे मत पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर व महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने येथील पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालयात १७ ते २१ डिसेंबर या कालावधीत माविम प्रकल्प (मोड्यूल-२) अंतर्गत पाच दिवसीय निवासी शेळीपालन प्रशिक्षनाचे आयोजन करण्यात आले असून आज या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर, प्रमुख पाहुणे म्हणून महिला आर्थिक विकास महामंडळाचे जिल्हा समन्वयक अधिकारी बाळासाहेब झिंजाडे, जिल्हा प्रकल्प सल्लागार पुंडलिक धामोडे, मुख्य प्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख, प्रकल्प सह समन्वयक डॉ. संदीप रिंढे यांची उपस्थिती होती. माविम प्रकल्पाअंतर्गत शेळी पालन करणाऱ्या महिला बचत गटांचे सक्षमीकरण आणि पशुसखी महिलांचा क्षमता विकास करण्याकरिता मोड्यूल-२ अंतर्गत येथील पशूवैद्यकीय महाविद्यालयात या पाच दिवसीय निवासी शेळीपालन प्रशिक्षनाचे आयोजन



करण्यात आले आहे, अशी माहिती राजूरकर यांनी यावेळी दिली. प्रशिक्षण समन्वयक डॉ. संदीप रिंढे यांनी प्रशिक्षणादरम्यान देण्यात येणारे व्याख्यान व प्रात्याक्षिक विषयी सविस्तर माहिती दिली. पशु सखींना कौशल्य विकासांतर्गत पाच दिवसांच्या निवासी प्रशिक्षण उदघाट प्रसंगी साहित्या किटचे वाटप महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुधीर राजूरकर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूतसंचालन डॉ. अमोल पाटील यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. अनिता चप्पलवार यांनी केले. प्रशिक्षण यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच आणि मुख्यप्रकल्प समन्वयक डॉ. धनंजय देशमुख यांच्या सल्लयाने प्रकल्प तथा प्रशिक्षनाचे समन्वयक डॉ. संदीप रिंढे, सह समन्वयक, डॉ. अनिता चप्पलवार, डॉ. संजयकुमार लोंढे, डॉ. अमोल पाटील, डॉ. मकरंद खरवडकर, डॉ. कल्याण टेकाळे, सहाय्यक नियंत्रक संजय खेडकर, सहाय्यक कुलसचिव ऋषिकेश कांबळे आणि लिपिक तथा टंकलेखक अविनाश जाधव यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी आणि पदव्युत्तर विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.

**विविध विषयावर तज्ञांद्वारे मार्गदर्शन....**

या प्रशिक्षणात जिल्ह्यातील ३० पशुसखी महिला प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या शेळीपालन प्रशिक्षणा दरम्यान विस्तार कार्याचा आराखडा तयार करणे, संवाद कौशल्य, प्रमुख संचाराकाची निवड करणे, तंत्रज्ञान स्वीकार करणाऱ्यांचे वर्गीकरण व समूहाची कार्यपद्धती, रोगी शेळी ओळखणे व प्रथमोपचार, खच्चीकरणाचे महत्व, शेळीपालनातील रोजगार, उद्योजकतेच्या संधि, आदर्श उद्योजक कसा असावा?, शेळ्यातील, करडातील मरतुक व उपाय, गांडूळ खत व कंपोस्ट खत तयार करणे, कळपातील शेळ्या एकाच वेळी माजावर आणणे व शेळ्यातील कृत्रिम रेतन, ईदसाठी करा बकरी संगोपन, शेळ्यातील आदर्श परिचालन प्रणाली, मुरघास तयार करणे, शेळीच्या दुधाचे पदार्थ निर्मिती: चीज, पनीर, खवा, पेढा ई., रोग निदान प्रयोगशाळेचे महत्व व रोगनिदानासाठी नमुने गोळा करणे आणि शेळी व शेळीपासून मिळणारी विविध उत्पादने व त्यांची विक्री व्यवस्था अशा विविध विषयावर महाविद्यालयातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावर प्रात्याक्षिकासह देण्यात येणार आहे.

# अतिक्रमणात उठविण्यात आलेल्या जलेश्वर तलाव काठावरील लोकांना घरकुले द्या

## भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची विधानसभेत मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर.**
शहरातील प्राचीन जलेश्वर मंदिर परिसरात असलेल्या जलेश्वर तलावाचे सुशोभिकरणासाठी मागील ३० वर्षापासून वास्तव्यास असलेल्या अतिक्रमण धारकांना प्रशासनाने अतिक्रमण मोहीमेत हटविले आहे त्यामुळे सदरील गोरगरीब लोक बेघर झाले असून त्यांना म्हाडा किंवा इतर घरकुल योजनेंतर्गत तत्काळ घरे उपलब्ध करून द्यावीत अशी मागणी भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी विधानसभेत केली.

हिंगोली शहरातील जलेश्वर मंदिर आणि तलावाची सुमारे ४८ एकर जागा आहे. या तलावाच्या काठावर मागील ३० वर्षापासून २०० कुटुंबे कच्चे घर बांधून राहत होते. या तलावाच्या सुशोभिकरणासाठी प्रशासनाने तलावाच्या काठावरील अतिक्रमण धारकांना हटवले. तत्कालीन उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी या लोकांना कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळही दिला होता. अनेकांनी कागदपत्रे सादर केली होती. परंतु तलावाच्या सुशोभिकरणाच्या नावाखाली येथील सुमारे २०० कुटुंबांना हटवून त्यांना बेघर करण्यात आले. त्यामुळे या लोकांना आता घरे नसल्यामुळे ते बेघर झाले आहेत. अशाप्रकारे बेघर करण्याचा अधिकार कोणालाही नाही. गोरगरीब कुटुंबांना आता घरे उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. या लोकांच्या शासनाकडून अपेक्षा आहेत. बेघर झालेल्या लोकांना नवीन घरे बांधून देण्यासाठी जमीन उपलब्ध करून द्यावी आणि म्हाडा अंतर्गत किंवा इतर कोणत्याही योजनेत या २०० कुटुंबांना घरे उपलब्ध करून देण्याचे निर्देश शासनाला द्यावेत अशी मागणी विधानसभा अध्यक्षांकडे आ. मुटकुळे यांनी विधानसभेत केली.

तसेच २०१७ साली विधानसभेत लक्षवेधीमध्ये बळसोंड येथील २८ एकर गायरान जमीन हिंगोली शहराला लागून आहे. सदरील जमीन मातंग समाजाला शासनाने दिली होती परंतु खोटे कागदपत्रे तयार करून हडपण्याचा प्रयत्न केला. तत्कालीन महसूल मंत्र्यांनी उत्तर देतांना ही जमीन तीन महिन्याच्या आत शासन जमा करू असे आश्वासन देण्यात आले होते परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. त्यामुळे ही २८ एकर गायरान जमीन शासनाने त्वरीत ताब्यात घ्यावी अशी मागणीही यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी विधानसभेत केली आहे.

# प्रशासन गांव की ओर सप्ताहांतर्गत चर्चासत्र, कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
सुशासन सप्ताहांतर्गत प्रशासन गांव की ओर हा उपक्रम राबविण्यात येत आहे. कृषि विभागातर्फे हिंगोली तालुक्यात यानिमित्त बुधवार (दि.१८) रोजी मासिक चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या मासिक चर्चासत्रात मौजे डिग्रस क., दाटेगाव, सवड, देऊळगाव रा. , राहोली बु. आदी गावांना जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम, उपविभागीय कृषि अधिकारी प्रदीप कच्छवे, तालुका कृषि अधिकारी गोविंद काळे, सुनिल भिसे, कुंभार, मंडळ कृषि अधिकारी कमलाकर सांगळे, बालाजी गाडगे, अनंत मुळे, लिंबाळकर, नितीन घुगे, अमित सोळंके, मनोज लोखंडे, संघई, मराठवाडा कृषि विभागाचे शास्त्रज्ञ गजानन गडदे, मधुकर मांडगे, तोंडापूर कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ राजेश भालेराव, अनिल कोळंबे, तंत्र अधिकारी अनिता राहणे यांनी भेट देऊन हरभरा, तूर, करडई या रब्बी हंगामातील पारंपारिक पिकास मल्चींगवरील टरबूज व खरबूज पिकांची तसेच फळधारणा झालेल्या संत्रा फळबागांची पाहणी करुन उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देण्यात आली. तसेच राहोली बु. येथील प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेंतर्गत अनुसया राऊत यांनी स्थापन केलेल्या स्वानंद लाकडी तेलघाना उद्योगास भेट देण्यात आली.

क्षेत्रीय भेटीनंतर हिंगोली तालुक्यातील देऊळगाव रामा येथे उपस्थित शास्त्रज्ञांनी सद्यस्थितीतील पिक परिस्थितीबाबत उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषी पर्यवेक्षक अरुण पडघन, शंकर कोटे, कृषी सहाय्यक विलास गिरी, शुभांगी वाळुंज, दामोदर रोडगे यांनी विशेष प्रयत्न केले.

# हिंगोलीत मालमत्ता करवाढीस तात्पुरती स्थगिती

## ८ दिवसांत अहवाल सादर करण्याचे नगर विकासचे आदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
हिंगोली नगर पालिकेने केलेल्या मालमत्ता कर वाढीला तात्पुरती स्थगिती दिल्यानंतर याबाबत आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश राज्याच्या नगर विकास विभागाने जिल्हाधिकारी कार्यालयास दिले आहे. त्यामुळे ३२ हजार मालमत्ता धारकांना दिलासा मिळाला आहे.

हिंगोली पोलिकेने मालमत्तांची मोजणी करून मालमत्तेच्या बांधकाम व जागेनुसार कराची फेर आकारणी केली आहे. यामध्ये मालमत्तांचे बांधकामसोबतच शिक्षण, वृक्ष, अग्नीशमन कर असे वेगवेगळे कर लावण्यात आले. त्यामुळे मालमत्ता कराचा आकडा चांगलाच फुगला आहे. त्यानंतर पालिकेने फेरमुल्यांकनानंतर दिलेल्या नोटीसीमुळे नागरीकांमधून एकच खळबळ उडाली होती. त्यानंतर आक्षेप नोंदविण्यासाठी २४ डिसेंबरपर्यंत मुदत दिली आहे. त्यानुसार नागरिकांनी आक्षेपांचा अक्षरश: पाऊस पाडला. पालिकेकडे ५०० पेक्षा जास्त नागरिकांनी आक्षेप नोंदविले आहेत.

त्यानंतर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी सदर बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आणून दिली. त्यानंतर वाढीव मालमत्ता करास तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री फडणवीस यांनी तात्पुरती स्थगिती देण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर नगर विकास विभागाने नुकतेच जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र पाठविले आहे. यामध्ये प्रस्तावित केलेल्या मालमत्ता कर वाढ प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देण्यात येत आहे. सदर प्रकरणी वस्तुनिष्ठ अहवाल अभिप्रायासह आठ दिवसात सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार आता प्रशासनाने अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असून पुढील दोन दिवसांत शासनाकडे अहवाल सादर केला जाणार असल्याचे सुत्रांनी सांगितले.

दरम्यान शहरात पालिकेने वाढीव करवाढीच्या दिलेल्या नोटीसांना तात्परती का होईना स्थगिती मिळाल्यामुळे शहरातील ३२ हजार मालमत्ताधारकांना दिलासा मिळाला आहे. आता प्रशासनाकडून दिला जाणारा अहवाल आणि त्यावर नगर विकास विभागाकडून दिला जाणारा निर्णय याकडे मालमत्ताधारकांचे लक्ष लागले आहे.



**हिंगोली– केंद्रीय परिवलन मंत्री नितीन गडकरी यांची भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी भेट घेतली. यावेळी हिंगोली ते नर्सी टी पॉईंट रस्त्याचे चौपदरीकरण आणि कयाधू नदीवरील नवीन पुलाचे कामासाठी निधी देण्याची मागणी केली. यावेळी लवकरच निधी मंजूर करण्याचे आश्वासन नितीन गडकरी यांनी दिले. यावेळी नितीन गडकरी यांनी तिसऱ्यांदा निवडून आल्यामुळे आ. मुटकुळे यांचा सत्कार केला.**

# महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
राज्य शासनामार्फत यावर्षी मोठ्या प्रमाणात परीक्षा घेतल्या जाणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. प्रस्तावित परिक्षेचे वेळापत्रक निश्चित करताना संघ लोकसेवा आयोग, विविध विद्यापीठे, परीक्षा घेणाऱ्या इतर संस्था इत्यादींकडून आयोजित करण्यात येणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक विचारात घेऊन निश्चित करण्यात आले आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

नव्या वर्षात ५ जानेवारी रोजी महाराष्ट्र गट–ब अराजपत्रित सेवा संयुक्त पुर्वपरीक्षा होणार आहे. यामध्ये सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, दुय्यम निबंधक श्रेणी–१, मुद्रांक निरीक्षक या पदांचा समावेश आहे. महाराष्ट्र गट–क सेवा संयुक्त पूर्वपरीक्षा २ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार आहे. उद्योग निरीक्षक, दुय्यम निरीक्षक, तांत्रिक सहायक, कर सहायक, बेलिफ व लिपीक टंकलेखक, सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदांचा यामध्ये समावेश आहे. १६ मार्च रोजी दिवाणी न्यायाधीश व कनिष्ठ स्तर न्यायदंडाधिकारी या पदासाठीची पूर्वपरीक्षा आहे. महाराष्ट्र नागरी सेवा पूर्व परीक्षा नुकतीच झाली असून २६ एप्रिल रोजी ३५ संवर्गातील मुख्य परीक्षा होणार आहे. महाराष्ट्र वन सेवा मुख्य परीक्षा १० मे, २०२५, महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा १८ मे, २०२५, महाराष्ट्र कृषी सेवा मुख्य परीक्षा १८ मे, २०२५ समावेश आहे.

तसेच दिनांक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असलेल्या परीक्षामध्ये महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित पूर्व परीक्षा २८ सप्टेंबर, २०२५, राज्यसेवा मुख्य परीक्षा, महाराष्ट्र यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा, विद्युत अभियांत्रिकी मुख्य परीक्षा, स्थापत्य अभियांत्रिकी मुख्य परीक्षा आदिंचा समावेश आहे. याशिवाय यावर्षेभरात झालेल्या पुर्व परीक्षांच्या सर्व मुख्य परीक्षा या वर्षेभरात होणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी कळविले आहे. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी तयारी करावी, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### नैसर्गिक शेतीची आवड असणाऱ्यांनी संपर्क करावा

हिंगोली– तोंडापूर कृषि विज्ञान केंद्रांतर्गत डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक कृषि अभियानांतर्गत ५० हेक्टर क्षेत्रावर एक कार्यक्रम आयोजित केला जाणार आहे. कळमनुरी तालुक्यातील नैसर्गिक शेतीची आवड असणाऱ्या गावातील सरपंचांनी कृषि विज्ञान केंद्राशी ९७६५३९०९७६ आणि ७५८८१५३१९३ या क्रमांकावर संपर्क साधावा. या उपक्रमात सहभागी होऊ शकणाऱ्या ५० शेतकऱ्यांची (मोबाईल क्रमांकासह) ग्राम पंचायतीचा ठराव व यादी सादर करावी. यादीत प्रथम येणाऱ्या गावांना प्राधान्य दिले जाईल.

### महावितरण कार्यालयात सनदचे वाचन

हिंगोली– ग्राहकांना स्पर्धात्मक किंमती विश्वसनीय आणि दर्जेदार सेवा देऊन भारतातील सर्वोत्तम विज वितरण उपयुक्त बनने आणि राज्याच्या आणि राष्ट्राच्या शाश्वत विकासात योगदान करण्यासाठी महावितरण कंपनीच्या हिंगोली मंडळ कार्यालयात नागरिकाची सनद कार्यक्रम आयोजित केला होता. सुशासन सप्ताहानिमित्त प्रशासन गॉव की ओर या उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी अधीक्षक अभियंता राजेशसिंग माधोसिंग चव्हाण यांनी नागरिकाची सनद अधिकारी व कर्मचारी यांना वाचून उपस्थितांना शपथ देण्यात आली.

# औंढा पंचायत समितीतील कंत्राटी कर्मचाऱ्यास लाच घेतांना पकडले

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
औंढा नागनाथ तालुक्यातील एका तक्रारदाराच्या वडीलांच्या नावे घरकुलाचा पहिला हप्ता खात्यावर टाकण्यासाठी २ हजार रूपयांची लाच घेणाऱ्या पंचायत समितीच्या घरकुल विभागातील कंत्राटी संगणक ऑपरेटरला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने दि १९ डिसेंबर रोजी पंचायत समितीच्या आवारात रंगेहाथ पकडले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहीतीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील एका तक्रारदाराच्या वडीलांच्या नावे शबरी आवास योजनेंतर्गत घरकुल मंजुर झाले होते. सदर घरकुलाचा पहिला हप्ता १५ हजार बँक खात्यात टाकण्यासाठी पंचायत समितीच्या घरकुल विभागातील संगणक ऑपरेटर अजय पहारे याने २ हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदाराने या प्रकरणात हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली. यावरून दि ११ डिसेंबर रोजी पडताळणी देखील करण्यात आली होती. त्यानंतर सदर रक्कम दि १९ डिसेंबर रोजी देण्याचे ठरले. त्यानुसार लाचलूचपत प्रतिबंधक विभागाचे उपअधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक विनायक जाधव, पोनि अंकुशकर जमादार तान्हाजी मुंढे, ज्ञानेश्वर पंचलिंगे, भगवान मंडलीक, शेख अकबर, शिवाजी वाघ यांच्या पथकाने पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात सापळा रचला. दरम्यान, दुपारच्या सुमारास ऑपरेटर पहारे याने २ हजार रूपयांची लाच स्विकारताच पथकाने त्यास रंगेहाथ पकडले. या प्रकरणाची माहीती मिळताच कार्यालयातील अधिकाऱ्यांसह लिपीकांनी कार्यालयातून काढता पाय घेतला.

# मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा स्पर्धेत सांदीपनी पब्लीक स्कूलने पटकाविला द्वितीय क्रमांक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
मुख्यमंत्री 'माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धा २०२४ अंतर्गत, सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड यांनी तालुका बीट मधून दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषक पटकावले आहे. महाराष्ट्र शासनाच्या या उपक्रमांतर्गत, २६ जुलै २०२४ पासून 'माझी शाळा सुंदर शाळा' हे अभियान राबवण्यात आले.

या अभियानात तालुका, जिल्हा, विभाग आणि राज्यस्तरावर यशस्वी ठरलेल्या शाळांना रोख रकमेच्या स्वरूपात पारितोषिके देण्यात आली. या रकमेचा विनियोग शाळांच्या गरजेनुसार करण्याची मुभा शाळा व्यवस्थापनास देण्यात आली आहे. त्यामुळे शाळांना तातडीच्या गरजा भागविण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे. या भौतिक लाभापेक्षा विद्यार्थ्यांमध्ये आणि शिक्षकांमध्ये नवचैतन्य निर्माण होऊन अनेक सकारात्मक बदल निदर्शनास आले आहेत. विविध प्रकारच्या स्पर्धात्मक वृत्ती निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्व विकासास चालना मिळावी आणि त्यांना खऱ्या अर्थाने बाह्य जगाची ओळख व्हावी हा या अभियानाचा मूळ हेतू आहे.

सांदिपनी पब्लिक स्कूलच्या प्राचार्या क्रांती कुलकर्णी, उपप्राचार्या सौ. हरप्रीत कौर, लिपीक प्रशांत लोहाळे यांना माध्यमिक शिक्षणाधिकारी सविता बिर्गे यांच्या हस्ते दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषक देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला उपशिक्षणाधिकारी प्रिया डहाळे, केंद्र प्रमुख धोंडगे, राठोड, देशमुख, कल्याणकर, यांची प्रमुख उपस्थिती होती.

# महाराष्ट्र राज्य होमगार्ड संघटनेचा ७८ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० डिसेंबर**
जिल्हा प्रशिक्षण केंद्र होमगार्ड यांच्या वतीने महाराष्ट्र राज्य होम गार्ड संघटनेचा ७८ वा वर्धापन दिन जिल्ह्याचे जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १३ डिसेंबर ते १९ डिसेंबर या कालावधीत साजरा करण्यात आला आज दि. १९ डिसेंबर रोजी समारोप कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे केंद्र नायक नानासाहेब मोखडे तर प्रमुख पाहुणे म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नरेंद्र पाडाळकर व जिल्हा समादेशक होमगार्ड कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी वैशाली डावरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्र नायक यांनी संघटनेचा पूर्व इतिहास सांगून शुभेच्छा संदेश वाचून होमगार्डने भविष्यात शिस्त पाळावी व कर्तव्यावर असताना संघटनेचे नाव लौकिक होईल असे कर्तव्य करावे तर सूत्रसंचालन हिंगोली पथकाचे अंशकालीन लिपिक तथा वरिष्ठ पलटणनायक हरिशंकर जोशी यांनी केले त्यानंतर काही होमगार्डचे मनोगत झाले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता वसमत पथकाचे समादेशक अधिकारी शेख चांदपाशा कळमनुरी पथकाचे समादेशक अधिकारी विश्वनाथ बेद्रे कंपनी नायक संजय वसिया राजकुमार बांगर वरिष्ठ पलटणनायक भागवत देवरे, विठ्ठल राऊत, दीपमाला वाडे, फलटण नायक शंकर कांदे, वामन मगर, शंकर कंठे, द्रुपदा जयस्वाल, सुनील मुनेश्वर, वीरभद्र संगेकर, संतोष दुबाकलू, प्रभाकर मुंडे, अशोक बांगर, सुनिता जाधव, जवान विजय राटनालू, भारत मूल्यालू, यशवंत मोरे, गणेश ढेंबरे, नामदेव गायकवाड, शेख नूर जहा, शेख मुमताज, राधा ढगे, वर्षा दांडेगावकर, सुवर्णमाला तपासे, शितल बलखंडे, त्रिशीला खंदारे, ओंकार अवचार, शंकर अवचार, सुरक्षा गार्ड रामकिशन कोरडे, संदीप जाधव, बाळू शिरसागर, गजानन घोळवे, धुरपत हेंद्रे, शेख मोबीन, पंडित जाधव या कार्यक्रमासाठी अथक परिसरान करून यशस्वी केला आहे. यावेळी या कार्यक्रमाचे आभार हिंगोली पथकाचे फलटणनायक शंकर कांदे यांनी व्यक्त केले यानंतर सर्वांनी भोजनाचा स्वाद घेऊन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.